१९१३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं. २०८

ॐ

कर्मण्येवाधिकारस्ते

आर्यन एज्युकेशन सोसायटीची शाळा.

# धर्मविषयक
व
# भाषाविषयक वेंचे.

पहिल्या यत्तेपासून पांचवी पर्यंतचे वर्गांकरितां.

सन १९१३.

मुंबईंत,
'तत्त्वविवेचक' छापखान्यांत छापिले.

REFBK-0000916

किंमत ६ आणे.

तत्सत्

१९१३

९१२

आर्यन एज्युकेशन सोसायटीची शाळा.

# धर्मविषयक व भाषाविषयक वेंचे.

पहिल्या यत्तेपासून पांचवी पर्यंतचे वर्गांकरितां.

REFBK-0000916

मुंबई:—खेतवाडी ब्याकरोड घर नं. १–२ व ३ येथें "तत्त्वविवेचक" छापखान्यांत रा. भिवाजी हरी शिंदे यांनीं छापिलें, तें रा. बाळकृष्ण यशवंत रांगणेकर बी. ए. एल् एल् बी. सेक्रेटरी लोकलबोर्ड आर्यन एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल यांनीं मुंबई नं. ४, येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

१ पहिल्या आवृत्तींतील कांहीं दुर्बोध व क्लिष्ट वेंचे काढून त्यांच्या-बद्दल नवीन सुरस व सुलभ वेंचे घातले आहेत. कित्येक अभंगांत परमेश्वराचे अवतार व साधुसंत यांचा संबंध आला आहे त्याविषयीं प्रमाणभूत ग्रंथांच्या आधारें विवरण केल्यास विद्यार्थ्यांच्या मनांत एक प्रकारची सुविचार युक्त श्रद्धा जागृत होऊन, साधुसंतांचे ग्रंथ कसे व कां वाचावे व कशा प्रकारची चौकस वृत्ति ठेवावी या विषयीं [illegible]

## आभार.

पूर्वीच्या आवृत्तींत नसलेले असे या आवृत्तींत आधुनिक कवींमधून वेंचलेले कांहीं वेंचे आहेत ते 'मनोरंजन' मासिकाच्या व्हाल्यूम्समधून घेतलेले आहेत. त्यांचा उपयोग करण्यास परवानगी दिल्याबद्दल सदर मासिकाचे मालक रा. काशिनाथ रघुनाथ मित्र यांचे फार आभारी आहोंत.

प्रकाशक.

[illegible] जोड केली आहे. त्यामुळे कविता वाचनांत विषयांची विविधता, लेखन शैली व भाषा माधुर्य यांचा सहज परिचय होईल.

# प्रस्तावना.

१ पहिल्या आवृत्तींतील कांहीं दुर्बोध व क्लिष्ट वेंचे काढून त्यांच्याबद्दल नवीन सुरस व सुलभ वेंचे घातले आहेत. कित्येक अभंगांत परमेश्वराचे अवतार व साधुसंत यांचा संबंध आला आहे त्याविषयीं प्रमाणभूत ग्रंथांच्या आधारें विवरण केल्यास विद्यार्थ्यांच्या मनांत एक प्रकारची सुविचार युक्त श्रद्धा जागृत होऊन, साधुसंतांचे ग्रंथ कसे व कां वाचावे व कशा प्रकारची चौकस बुद्धि ठेवावी या विषयीं त्यांना बरीच योग्य दिशा लागेल.

२ प्रार्थनेचे अभंग प्रारंभीं एकत्र छापिले आहेत. केलेंडर मध्यें प्रार्थनेचे तीन अभंग छापिले आहेत त्यांखेरीज प्रार्थने करितां एकादा जास्त अभंग म्हणणें असल्यास या अभंगां पैकीं म्हणावा. या संबंधानें केलेंडरमध्यें प्रार्थनेच्या अभंगांखाली इंग्रजींत सविस्तर टीप दिली आहे, ती प्रमाणें व्यवस्था ठेवावी.

३ भाषाविषयक वेंच्यांत आधुनिक कित्येक प्रतिभासंपन्न कवींचे वेंचे जास्त घालून जुन्या नव्याची जोड केली आहे. त्यामुळें कविता वाचनांत विषयांची विविधता, लेखन शैली व भाषा माधुर्य यांचा सहज परिचय होईल.

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला—धर्मविषयक वेंचे.


| | | पान. |
|---|---|---|
| प्रार्थनेचे अभंग—सर्व यत्तां करितां | .... .... .... .... | १ |
| अर्थाकरितां धर्मविषयक वेंचे; | पहिली कच्ची .... .... .... | ९ |
| ,, ,, | पहिली पक्की .... .... .... | १२ |
| ,, ,, | दुसरी कच्ची .... .... .... | १६ |
| ,, ,, | दुसरी पक्की .... .... .... | २१ |
| ,, ,, | तिसरी कच्ची .... .... .... | २६ |
| ,, ,, | तिसरी पक्की .... .... .... | ३१ |
| ,, ,, | चवथी कच्ची .... .... .... | ३७ |
| ,, ,, | चवथी पक्की .... .... .... | ४६ |
| ,, ,, | पांचवी कच्ची .... .... .... | ५५ |


## भाषाविषयक वेंचे.


| | | पान. |
|---|---|---|
| पहिली कच्ची | .... .... .... .... .... .... | ६४ |
| ,, पक्की | .... .... ... .... .... .... | ७३ |
| दुसरी कच्ची | .... .... .... .... .... .... | ८१ |
| ,, पक्की | .... .... .... .... .... .... | ९० |
| तिसरी कच्ची | .... .... .... .... .... .... | ९७ |
| ,, पक्की | .... .... .... .... .... .... | १०८ |
| चवथी कच्ची | .... .... .... .... .... .... | १२४ |
| ,, पक्की | .... .... .... .... .... .... | १४३ |
| पांचवी कच्ची | .... .... .... .... .... .... | १५६ |
| ,, पक्की | .... .... .... .... .... .... | १[illegible]३ |

# भाग पहिला.

## धर्मविषयक वेंचे.

### प्रार्थना.

( १ )

न करीं उदास । माझी पुरवावी आस ॥ १ ॥
ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥ २ ॥
मायबाप बंधुजन । तूंचि सोयरा सज्जन ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुजविरहित । कोण करील माझें हित ॥ ४ ॥

( २ )

अहो कृपावंता । होईं बुद्धिचा ये दाता ॥ १ ॥
जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ २ ॥
वदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । माझें अंतर वसवा ॥ ४ ॥

( ३ )

शरण शरण नारायणा । मज अंगीकारा दीना ॥ १ ॥
भावें आलों लोटांगणीं । रुळें तुमचे चरणीं ॥ २ ॥
सांडियेली काया । वरी ओंवाळुनी पायां ॥ ३ ॥
तुका ह्मणे शिर । ठेवियेलें पायांवर ॥ ४ ॥

( ४ )

पतितपावना । दीनानाथा नारायणा ॥ १ ॥
तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ २ ॥
ब्रह्मांडनायका । भक्तजनांच्या पाळका ॥ ३ ॥
जीवांचिया जीवा । तुका ह्मणे देवदेवा ॥ ४ ॥

( ५ )

मी तों दीनाहूनि दीन । माझा तूज अभिमान ॥ १ ॥
मी तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित ॥ २ ॥
दिनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां । भलें नव्हे मोकलितां ॥ ४ ॥

( ६ )

कंठीं राहो नाम । अंगीं भरोनियां प्रेम ॥ १ ॥
ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ॥ २ ॥
संतांचिये पायीं । वेळोवेळां ठेवीं डोई ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरें । भवसिंधु एका सरें ॥ ४ ॥

( ७ )

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥
विठो माऊलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं न मागें आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

( ८ )

तूं आह्मां सोयरा सज्जन सांगाती । तुजलागीं प्रीति चालो सदा ॥ १ ॥
तूं माझा जिव्हाळा जीवाचा जीवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥
गणगोत मित्र तूं माझें जीवन । अनन्यशरण तुझ्या पायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे सर्वगुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ४ ॥

( ९ )

येणें मुखें तुझे वर्णीं गुण नाम । तेंचि मज प्रेम देईं देवा ॥ १ ॥
डोळे भरूनियां पाहें तुझें मुख । तेंचि मज सुख देईं देवा ॥ २ ॥
कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ति । ते मज विश्रांती देईं देवा ॥ ३ ॥
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां बळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥ ५ ॥

( १० )

मी दीन हीन शरणागत देवराया ।
दीनेश तूं पतितपावन दे वरा या ॥
हो नित्य शुद्ध मन भाषण आणि कर्म ।
चित्तीं स्वदेशहित वास करो स्वधर्म ॥

( ११ )

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ति धन संपदा । संतसंग देईं सदा ॥ ३ ॥
तुका ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें आह्मांसी ॥ ४ ॥

( १२ )

तुजविण कोणा । शरण जाऊं नारायणा ॥ १ ॥
ऐसा न देखें मी कोणी । दुजा तिहीं त्रिभुवनीं ॥ २ ॥
पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ॥ ४ ॥

( १३ )

माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा । केशवा माधवा नारायणा ॥ १ ॥
नाहीं नाहीं मज आणिक सोयरा । न करीं अव्हेरा पांडुरंगा ॥ २ ॥
अनाथाचा नाथ होशी तूं दयाळा । किती वेळोवेळां प्रार्थूं आतां ॥ ३ ॥
नामा ह्मणे जीव होतो कासावीस । केली तुझी आस आतां बरी ॥ ४ ॥

( १४ )

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥ १ ॥
आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ २ ॥
ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥ ३ ॥
तुका ह्मणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें ॥ ४ ॥

( १५ )

वायां जातों देवा । नेणें भक्ती करूं सेवा ॥ १ ॥
आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ॥ २ ॥
करावें तें काय । न कळे अवलोकितां पाय ॥ ३ ॥
तुका ह्मणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ ४ ॥

( १६ )

मागता भिकारी जालों तुझे द्वारीं । देईं मज हरी कृपादाना ॥ १ ॥
प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचारावें हृदयामाजी ॥ २ ॥
सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळू तूं जगामाजी एक ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां तुझा शरणागत । करावें सनाथ मायबापा ॥ ४ ॥

( १७ )

इतुकें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥
इतुकें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥
इतुकें करीं देवा विनवितों तूज । संतचरणरज वंदीं माथां ॥ ३ ॥
इतुकें करीं देवा ऐकें हें मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥ ४ ॥
भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका ह्मणे आतां शरण आलों ॥५॥

( १८ )

तुझा शरणागत झालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥ १ ॥
पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापा ॥ २ ॥
अनाथाचा नाथ बोलतील संत । ऐकोनियां मात विश्वासलों ॥ ३ ॥
न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥ ४ ॥
तुका ह्मणे मी तों पातकांची रासी । देईं पायापासीं ठाव देवा ॥ ५ ॥

( १९ )

माझ्या बोबडीया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ १ ॥
तुझ्या नामांची न लाज । जना संगें काय काज ॥ २ ॥

( ९ )

जन हांसतील लोक । पण मी गाईन निःशंक ॥ ३ ॥
वेडें वांकडें गाईन । परी तुझाची ह्मणवीन ॥ ४ ॥
नामा ह्मणे कमळापती । मांझी परिसावी विनंती ॥ ५ ॥

( २० )

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढभाव ॥ १ ॥
चरण न सोडीं सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा ॥ २ ॥
वदनीं तुझें मंगळ नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥
नामा ह्मणे केशवराजा । केला पण चालवीं माझा ॥ ४ ॥

( २१ )

हरी तुझें नाम गाईन अखंड । याविण पाखांड नेणें कांहीं ॥ १ ॥
अंतरीं विश्वास अखंड नामाचा । काया मनें वाचा देईं हेंचि ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना ॥ ३ ॥

( २२ )

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥ १ ॥
तूं माझी मावली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥ २ ॥
तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पांडुरंगे ॥ ३ ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगे ॥ ४ ॥
नामा ह्मणे होसी भक्तीचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी ॥ ५ ॥

( २३ )

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥
आतां ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥
उपजला भावो । तुमचे कृपें सिद्धी जावो ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां । लाभ नाहीं यापरता ॥ ४ ॥

( २४ )

अज्ञान बाळक कोमाइलें जनीं । जाणते जननी तान भूक ॥ १ ॥

तसें मजलागीं होऊनि कृपाळ । करीं गा सांभाळ अनाथाचा ॥ २ ॥
वत्सालागीं धेनु येतसे वोरसें । पान्हा स्तनीं जैसे वोसंडती ॥ ३ ॥
नामा ह्मणे तुज हे न साहे उपमा । मी कुडी तूं आत्मा केशवराजा ॥ ४ ॥

( २५ )

देवा आतां ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडीं मज ॥ १ ॥
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ॥ २ ॥
ठाव देई चित्ता राखें पायापाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ॥ ३ ॥
आस भय चिंत्ता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ॥ ४ ॥
मागणें तें एक हेंचि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देईं ॥ ५ ॥
तुका म्हणे नको वरपंग देवा । घ्यावी माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥

( २६ )

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥ १ ॥
आतां तूं उदास नव्हे नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥ २ ॥
धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥ ४ ॥

( २७ )

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूंचि माझें हित करिता देवा ॥ १ ॥
तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥ २ ॥
तूंचि माझा आचार तूंचि माझा विचार । तूंचि सर्व भार चालविसी ॥ ३ ॥
सर्व भावें मज तूं होसी प्रमाण । ऐसी तुझी आण वाहातसें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळे तो उपाव करीं आतां ॥ ५ ॥

( २८ )

जगत्रजीवना अगा नारायणा । कां नये करुणा दासाची हे ॥ १ ॥
आच्युता केशवा ये गा दीनानाथा । सर्वज्ञा समर्था कृपामूर्ती ॥ २ ॥
चिद्धना चिद्रूपा विरंचीच्या बापा । करावी जी कृपा सर्वांभूतीं ॥ ३ ॥
तुझें म्हणविलें उपेक्षिसी जरी । नामा म्हणे हरी ब्रीद काय ॥ ४ ॥

( २९ )

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ॥ १ ॥
धरोनियां बाहीं । भव तारीं दातारा ॥ २ ॥
चतुरा तूं शिरोमणी । गुण लावण्याची खाणी ॥ ३ ॥
मुगुट सकळां मणी । तूंचि धन्य विठोबा ॥ ४ ॥
करीं तिमिराचा नाश । दीप होउनि प्रकाश ॥ ५ ॥
तोडीं आशापाश । करीं वास हृदयीं ॥ ६ ॥
पाहें गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता ॥ ७ ॥
तुका ठेवी माथा । पांयीं आतां राखावें ॥ ८ ॥

( ३० )

एकांताचें सुख देईं मज दवा । आवात या जीवा चुकवूनि ॥ १ ॥
ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥ २ ॥
मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देईं देवा ॥ ३ ॥
कीर्ती ऐकोनियां जालों शरणागत । दासाचें तूं हित करितोसी ॥ ४ ॥
तुका ह्मणे मी तों दीन पापराशी । घालवें पाठीशी मायबाप ॥ ५ ॥

( ३१ )

येगा महाविष्णु अनंत भुजाच्या । आम्हां अनाथांच्या माहेरा ये ॥ १ ॥
भेटावया तुज ओढे माझा जीव । एकवेळा पाय दावीं डोळां ॥ २ ॥
आणीक हें आर्त नाहीं नारायणा । ओढे हे वासना भेटावया ॥ ३ ॥
वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पहावया ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझे पुरवीं मनोरथ । येईं गा त्वरीत पांडुरंगा ॥ ५ ॥

( ३२ )

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

( ३३ )

नको गा मोकलूं दीना पंढरीनाथा । तुजविण आतां कोण धांवे ॥ १ ॥
अपराधाच्या कोटी पाहूं नको कांहीं । येगे विठाबाई झडकरी ॥ २ ॥
माझ्या दोषासाठीं पाठमोरा होसी । पावन ब्रीदासी लागे बोल ॥ ३ ॥
नामा ह्मणे जननी तूंचि चराचर । तारिले अपार जडजीव ॥ ४ ॥

( ३४ )

शेवटची विनंती । ऐका ऐका कमळापति ॥ १ ॥
काया वाचा मन । चरणीं असो समर्पण ॥ २ ॥
जीवपरमात्मा ऐक्यासी । सदा वसो हृदयेंसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । कंठी वसावें केशवा ॥ ४ ॥

# भाग पहिला.

## धर्मविषयक वेंचे.

---

## पहिली ( कच्ची ).

### अर्थाकरितां.

( १ )

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुम्हांला ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥
दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ।
गुणश्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ २ ॥
बहू खेळ खोटा सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेलची तो करंटा ।
बहूतां जनांलागिं जीवीं भजावें । भल्यासंगतीं न्याय तेथें भजावें ॥ ३ ॥
हिशोबीं सदा न्याय सांडूं नये रे । कदाचीत अन्याय होतां धका रे ।
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । महासूख तेंही अकस्मात जातें ॥ ४ ॥
प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वांयां । विवेकेविणें सर्वही दंभ जाला ।
बहू सज्जला नेटका साज केला । विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥ ५ ॥
वरी चांगला अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ।
वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागिं कोणी तरी शोधिताहे ॥ ६ ॥
सदा अंतरीं गोड तें सांडवेना । कदा अंतरीं ओखटें देखवेना ।
म्हणूनी बरा गूण आधीं धरावा । महाघोर संसार हा नीरसावा ॥ ७ ॥
भला रे भला बोलती तें करावें । बहूतां जनांचें मुखें येश घ्यावें ।
परी शेवटीं सर्व सोडूनी द्यावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ८ ॥
बरा ओखटा सर्व संसार झाला । अकस्मात येईल रे काळघाला ।
म्हणोनि भले संगती सत्य चाला । जनीं दास तो बोधिताहे मुलांला ॥ ९ ॥

रामदास—श्रेष्ठांचे मुलांस पाठविलेलें पत्र.

( २ )

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥
तुम्ही घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचे मुख ॥ २ ॥
तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥
मना तेथें धांव घेईं । राहें विठोबाचे पायीं ॥ ४ ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

( ३ )

सांगड बांधोरे भक्तीची । रघुनाथ नामाची ॥ ध्रु० ॥
संसार सागर, सागर । भरला जातो पुर ॥ सांगड० ॥ १ ॥
लाटा उसळती विषयाच्या । बहुत प्रपंचाच्या ॥ सांगड० ॥ २ ॥
माणकोजी बोधला, बोधला । हरिनामीं रंगला ॥ सांगड ॥ ३ ॥

( ४ )

धन्य धन्य तोचि प्राणी । रामनाम जपे वाणी ॥ १ ॥
तोचि एक भाग्यवंत । तयापाशीं रघुनाथ ॥ २ ॥
तेणें तारियलें कुळा । तोचि दैवानें आगळा ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य धन्य । त्याचे भेटी थोर पुण्य ॥ ४ ॥

( ५ )

बोलासारखी करणी । तरी सार्थक जन्मोनी ॥ १ ॥
व्याधी पथ्य सांभाळितां । गुण येतसे तत्वता ॥ २ ॥
तयेपरी रामराया । देहा वर्तवीं माझिया ॥ ३ ॥
तुका म्हणे अवगुण । नेईं माझे देहांतून ॥ ४ ॥

( ६ )

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ॥ १ ॥
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥ २ ॥

गति तेंचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥ ३ ॥
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ॥ ४ ॥
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥

( ७ )

देव आमुचा देव आमुचा । जीव सकळ जीवांचा ॥ १ ॥
देव आहे देव आहे । जवळीं आम्हां अंतर पाहे ॥ २ ॥
देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंही कोड ॥ ३ ॥
देव आम्हां राखे । घाली कळिकाळासी काखे ॥ ४ ॥
देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥ ५ ॥

( ८ )

उंच निंच कांहीं नेणें हा भगवंत । तिष्ठे भावभक्ति देखोनियां ॥ १ ॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्याघरीं रक्षी प्रल्हादासी ॥ २ ॥
चर्म रंगू लागे रोहिदासासंगें । कबिराचे मागीं विणी शेले ॥ ३ ॥
सजन कसाया विकूं लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ॥ ४ ॥
नरहरिसोनारा घडूं फुकूं लागे । चोख्यामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥ ५ ॥
नामयाची जनी सवें वेची शेणी । धर्माघरीं पाणी वाहे झाडी ॥ ६ ॥
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगें ओढी ॥ ७ ॥
अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीतीं सुदाम्याचे ॥ ८ ॥
गौळियांचे घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळी द्वारीं झाला ॥ ९ ॥
यंकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी । आंबऋषीचे सोसी गर्भवास ॥ १० ॥
मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥ ११ ॥
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥ १२ ॥
पुंडलिकासाटीं अझूनी तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥ १३ ॥

# पहिली ( पक्की ).

( १ )

खरें बोले तरि । फुकासाठीं जोडे हरी ॥ १ ॥
ऐसें फुकाचे उपाय । सांडुनियां वायां जाय ॥ २ ॥
पर उपकार । एका वचनाचा फार ॥ ३ ॥
तुका ह्मणे मळ । मनें सांडितां शीतळ ॥ ४ ॥

( २ )

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन शुद्ध भावें ॥ ३ ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ४ ॥

( ३ )

तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥ १ ॥
आणिक कांहीं नेणे देवा । तुजवांचुनि केशवा ॥ २ ॥
हेंचि माझें गाणें । तुझें नाम संकीर्तन ॥ ३ ॥
तुझ्या नामाचीं भूषणें । तुका म्हणे ल्यालों लेणें ॥ ४ ॥

( ४ )

काय करावे ते संपत्तीचे लोक । जानकीनायक जेथें नाहीं ॥ १ ॥
जेथें नाहीं माझा श्रीराम समर्थ । त्याचें जिणें व्यर्थ कोटीगुणें ॥ २ ॥
कोटीगुणें व्यर्थ जिणें त्या नराचें । जानकीवराचें नांव नाहीं ॥ ३ ॥
नाम नाहीं मनीं नाहीं जो कीर्तनीं । तया कां जननी प्रसवली ॥ ४ ॥
प्रसवली परी झाला भूमीभार । दुस्तर संसार उलंघेना ॥ ५ ॥
उलंघेना येक रामनामेंवीण । रामदास खूण सांगतसे ॥ ६ ॥

( ५ )

अर्थेंवीण पाठ कासया करावें । व्यर्थ कां मरावें घोकुनीयां ॥ १ ॥
घोकुनीयां काय वेगीं अर्थ पाहें । अर्थरूप राहें होउनीया ॥ २ ॥
होउनीया अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे ॥ ३ ॥

( ६ )

साधुसंगें साधु भोंदुसंगें भोंदु । वादुसंगें वादु होत असे ॥ १ ॥
होत असे भला भल्याचे संगति । जाय अधोगति दुष्टसंगें ॥ २ ॥
दुष्टसंगें दुष्ट झाला महापापी । होतसे निःपापी संतसंगें ॥ ३ ॥
संग जया जैसा लाभ तया तैसा । होतसे आपैसा आनयासें ॥ ४ ॥
आनयासें गति चुके आधोगति । धारितां संगति सज्जनाची ॥ ५ ॥
सज्जनाची कृपा जया लागी होये । तया लागे सोये परत्रीची ॥ ६ ॥
परत्रीची सोये भक्तींचा उपाय । चुकती अपाय दास म्हणे ॥ ७ ॥

( ७ )

धाकटाचि धुरु तो नव्हे लेकरु । जया सर्वेश्वरु प्रगटला ॥ १ ॥
प्रगटला देव तया उपमन्या । भावार्थें अनन्या क्षीरसिंधु॥ २ ॥
क्षीरसिंधुवासी स्वयें नारायण । प्रल्हादारक्षण करीतसे ॥ ३ ॥
करितो रक्षण दासांसि संकटीं । त्याचें नाम कंठीं असों द्यावें ॥ ४ ॥
असों द्यावें मनीं देवाचें चिंतन । गजेंद्रपावन नाम घेतां ॥ ५ ॥

( ८ )

पहा ते पांडव अखंड वनवासी । परी त्या देवासी आठविती ॥ १ ॥
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि स्मरे मनीं नारायण ॥ २ ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥ ४ ॥

( ९ )

फिरविली पळी पायसांत पूर्ण । राहिली आपण उपवासी ॥ १ ॥
भक्षुनियां गेले इतर सकळ । दर्वीस तें फळ काय होय ॥ २ ॥

तये परी भूतां अंतर्बाह्य हरी । असोनी भिकारी न पाहती ॥ ३ ॥
तुका ह्मणे भोक्ते हरिदास होती । इतर जल्पती अभिमानें ॥ ४ ॥

( १० )

भाग्यपुरुषाची देखिली संपदा । आपली आपदा जाइचना ॥ १ ॥
कुणब्याचें शेत पाहे डोळेभरी । आपले ते घरीं अन्न नाहीं ॥ २ ॥
देह कष्टविना ज्ञानाचा अभाव । कैसी देवराव कृपा करी ॥ ३ ॥
ओळखीकारणें आर्जव करिती । तेव्हां याची रिती कळूं लागे ॥ ४ ॥
तुका ह्मणे आशा दुराशा त्यजावी । मुक्तीची पदवी पावतसे ॥ ५ ॥

( ११ )

विठ्ठलाचें नाम घ्यावें । पुढें पाऊल टाकावें ॥ १ ॥
अवघा मुहूर्त शकुन । हृदयीं विठ्ठलाचें ध्यान ॥ २ ॥
ऐसा पाहिजे हा योग । लाभा उणें काय मग ॥ ३ ॥
तुका ह्मणे हरिच्या दासा । शुभकाळ सर्व दिशा ॥ ४ ॥

( १२ )

रामकृष्ण नामें ये दोन्हीं साजरीं । हृदयमंदिरीं स्मरा करि ॥ १ ॥
आपुली आपण करा सोडवण । संसारबंधन तोडा वेगीं ॥ २ ॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण माळा । जिवीचा जिव्हाळा पांडुरंग ॥ ३ ॥

( १३ )

चोराचिया संगें क्रमितां पैं पंथ । ठकूनियां घात करितील ॥ १ ॥
काम क्रोध लोभ घेऊनियां संगें ॥ परमार्थासि रिघे तोचि मूर्ख ॥ २ ॥
बांधोनियां शिळा पोहुं जातां सिंधु । पावे मतिमंदु मृत्यु शीघ्र ॥ ३ ॥
देह गेह भ्रांति सोडुनियां द्यावें । साधन करावें शुद्ध मार्गें ॥ ४ ॥
ज्ञानदेव ह्मणे तरीच साधेल । नाहीं तरी चळेल मध्यभागीं ॥ ५ ॥

( १४ )

संत जेणें व्हावें । तेणें जगबोलणें सोसावें ॥ १ ॥
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥ २ ॥

थोरपण जेथें वसे । भूतदया तेथें असे ॥ ३ ॥
रागें निंदावें कोणासी । आपण ब्रह्म सर्वदेशीं ॥ ४ ॥
ऐसी सम दृष्टि करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

( १५ )

जेणें देवा आळविलें । तेणें तया मेळविलें ॥ १ ॥
जेणें विषयाला जोडिलें । तेणें तयाला तोडिलें ॥ २ ॥
जेणें दीना त्रास दिला । व्यर्थ जन्म लाधला ॥ ३ ॥
जेणें सन्मार्ग त्यागिला । व्यर्थ जन्म त्याचा गेला ॥ ४ ॥
विश्वाधारा तुझ्या पाया । न बा धरिल्या सर्व वाया ॥ ५ ॥

( १६ )

जोडोनियां धन उत्तम वव्हारें । उदास विचारें वेच करीं ॥ १ ॥
उत्तमाचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥
भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका ह्मणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

( १७ )

नाम घेतां मार्ग चाले । यज्ञ पाउलापाउलें ॥ १ ॥
नाम घेतां ग्रासोग्रासीं । तो नर जेविला उपवासी ॥ २ ॥
नाम घेतां करी धंदा । ध्यानीं समाधिस्त सदा ॥ ३ ॥
नाम घेतां भोगी त्यागी । पाप नाहीं त्याचे आंगीं ॥ ४ ॥
धन्य धन्य तें शरीर । तीर्थव्रताचें माहेर ॥ ५ ॥
ऐसें अखंड नाम गाय । तुका वंदी त्याचे पाय ॥ ६ ॥

# दुसरी ( कच्ची ).

( १ )

आडलिया जना होसी साहाकारी । आंधळियाकरीं काठी तूंचि ॥ १ ॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तू कैवारी नारायणा ॥ २ ॥
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुह्मी अपंगिला नानापरी ॥ ३ ॥
आपुलेंचि अंग तुह्मी वोडविलें । त्याचें निवारिलें महादुःख ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥ ५ ॥

( २ )

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिण बंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥
कृष्ण माझा गुरू कृष्ण माझें तारूं । उतरी पैलपारू भवनदीची ॥ २ ॥
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोइरा सज्जन कृष्ण माझा ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा श्रीकृष्ण विसावा । वाटे न करावा परता जीवा ॥ ४ ॥

( ३ )

वेद अनंत बोलिला । अर्थ इतकाचि साधला ॥ १ ॥
विठोबासी शरण जावें । निजनिष्ठे नाम गावें ॥ २ ॥
सकळ शास्त्रांचा विचार । अंतां इतकाचि निर्धार ॥ ३ ॥
अठरा पुराणीं सिद्धांत । तुका ह्मणे हाचि हेत ॥ ४ ॥

( ४ )

बरवी नामावळी । तुझी महादोषां होळी ॥ १ ॥
जालें आह्मांसी जीवन । धणीवरी हें सेवन ॥ २ ॥
सोपें आणि गोड । किती अमृताही वाड ॥ ३ ॥
तुका ह्मणे अच्युता । आमचा कल्पतरू दाता ॥ ४ ॥

( ५ )

देव भला देव भला । मिळोनी जाय जैसा त्याला ॥ १ ॥
देव उदार उदार । देतां नाहीं थोडें फार ॥ २ ॥

देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥ ३ ॥
देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवां ॥ ४ ॥
देव चांगला देव चांगला । तुका चरणीं लागला ॥ ५ ॥

( ६ )

करीं हेंचि काम । नाम जपें राम राम ॥ १ ॥
लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥ २ ॥
तुका ह्मणे मना । मज भीक द्यावी दीना ॥ ३ ॥

( ७ )

गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि ह्मणें हरीं ॥ १ ॥
माझ्या बोबडीया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ २ ॥
मज हांसतील लोक । परी मी गाईन निःशंक ॥ ३ ॥
तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी विनंती । ऐका तुम्ही कमळापती ॥ ५ ॥

( ८ )

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
थोरीव सांडिली आपुली परीसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सूख पराचिया सूखें । अमृत हें मूखें स्रवतसे ॥ ५ ॥

( ९ )

अनंत ब्रम्हांडें व्यापक तें नाम । अनादि निष्काम विश्वंभर ॥ १ ॥
तोचि कृष्ण परब्रम्ह द्वारकेसी । पांडवां मानसीं ठसावला ॥ २ ॥
ठसावला तोचि पहावा अनुभव । पांचालागीं ठाव मग कैंचा ॥ ३ ॥
नामदेव म्हणे संपूर्ण आघवा । नामाचिया गांवा सींव नाहीं ॥ ४ ॥

( १० )

अन्न अन्न म्हणतां जरी जाय भूक । तरीच उद्धरती लोक या रामनामें ॥१॥
पाणी पाणी म्हणतां जरी जाय तान । तरीच उद्धरती मूढजन या रामनामें ॥२॥
तुका म्हणे नाम आहे तें वेगळें । कोणासी न कळे सद्गुरूवीण ॥ ३ ॥

( ११ )

सत्य बोले निरंतर । तोच पुण्याचा सागर ॥ १ ॥
देव त्यानें जिंकीयेला । तिहीं लोकीं मानवला ॥ २ ॥
सर्वां भूतीं झाला लीन । टाकुनियां अभिमान ॥ ३ ॥
तुका म्हणे जन्मुनियां । शांतीसुख लाभे तया ॥ ४ ॥

( १२ )

चोरा संगतीनें गेला । वाटे जातां नागवला ॥ १ ॥
ऐसी सांडोनियां भक्ति । धरी विषयाची संगती ॥ २ ॥
अग्निसवें खेळे । न जळे तो परी पोळे ॥ ३ ॥
विश्वासला चोरा । जनी म्हणे घाला खरा ॥ ४ ॥

( १३ )

जप तप ध्यान नलगे धारणा । विठ्ठल कीर्तनामाजी सर्व ॥ १ ॥
राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥ २ ॥
कीर्तन समाधि साधन ते मुद्रा । राहतील थारा धरोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । वोगळती चारी ऋद्धि सिद्धि ॥४॥

( १४ )

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥ १ ॥
कुळीं कन्या पुत्र होतीं जीं सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ॥ २ ॥
गीता भागवत ऐकती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज घडे त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥

( १५ )

इंद्रियांसी लाड देणेंचि ओंगळ । घातक केवळ परमार्थासी ॥ १ ॥
व्याघ्रासी संसर्ग सर्पासी खेळणें । इंद्रियां पाळणें तैशापरी ॥ २ ॥
ह्मणोनि भल्यानें दमोनी चालावें । लोलुप्य न व्हावें इंद्रियांसी ॥ ३ ॥
तुका म्हणे धोका चौऱ्याशींचा घ्यावा । विषयाच्या भावा आतळीतां ॥ ४ ॥

( १६ )

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माय प्रसवली ॥ १ ॥
कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणे पराचें दुःख कांहीं ॥ २ ॥
आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ ३
तुका म्हणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥ ४ ॥

( १७ )

ज्यांनीं विठ्ठल मात्रा घ्यावी । त्यानीं पथ्यें सांभाळावीं ॥ १ ॥
काम क्रोध तिखट मिरची । ह्यांची घेऊं नये रुची ॥ २॥
आशा मनीशा तेलकट । त्यांचा येऊं द्यावा वीट ॥ ३ ॥
रामकृष्ण घ्यावा विडा । तेणें हरे सर्व पीडा ॥ ४ ॥
तुका म्हणे घ्या औषध । ज्ञान जोडे ब्रम्हपद ॥ ५ ॥

( १८ )

शब्दानें सांगतां देव नये हाता । शब्दा त्या कथा बा उगाची ॥ १ ॥
मुखें जें बोलावें अंतरीं असावें । त्या देव स्वभावें जवळीच ॥ २ ॥
मुखें बोले एक अंतरीं अनेक । वायां करी शोक तुका म्हणे ॥ ३ ॥

( १८ )

काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ १ ॥
काय द्यावें त्यांचें व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥
सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥ ३ ॥
तुका म्हणे वत्स धेनुवेच्या चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

( १९ )

शांति परतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥
म्हणऊनि शांति धरा । उतराल पैलतीरा ॥ २ ॥
खवळलिया काम क्रोधीं । अंगी भरती आधि व्याधि ॥ ३ ॥
तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ॥ ४ ॥

# दुसरी ( पक्की ).

( १ )

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥ १ ॥
आपुलालें तुम्ही करारे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥ २ ॥
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥ ३ ॥
देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥ ४ ॥
सुख तरी होय गातां आईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥ ५ ॥
तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची ॥६ ॥

( २ )

तुज मागणें तें देवा । आम्हां तुझी चरणसेवा ॥ १ ॥
आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ २ ॥
संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥

( ३ )

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥
खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापसाला वोध कैंचा ॥२॥
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥

( ४ )

जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥ १ ॥
दुःख पावायाचें मूळ । रहणी ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥
माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥ ३ ॥
तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥

( ५ )

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गी ॥ १ ॥
चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ॥ २ ॥

भावाचा पै हाव धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥ ३ ॥
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥ ४ ॥
तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु झाला ॥ ५ ॥

( ६ )

तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनियां संतीं ॥ १ ॥
मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांठवीन पोटीं ॥ २ ॥
नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावासंधी ॥ ३ ॥
तुका म्हणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ ४ ॥

( ७ )

नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥
न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व । अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥
करोनियां साह्य पुरवीं मनोरथ । व्हावें कृपावंत तुका म्हणे ॥ ४ ॥

( ८ )

पाप ताप दैन्य जाय उठाउठी । जालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥
ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तीर्थें जगीं दानें व्रतें ॥ २ ॥
चरणींचें रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ॥ ३ ॥
भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे मन झालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

( ९ )

भक्तिसुखें जे मातले । ते काळिकाळा शूर झाले ॥ १ ॥
हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ २ ॥
महादोषां आला त्रास । जन्ममरणां केला नास ॥ ३ ॥
सहस्रनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ॥ ४ ॥

नाही आणिकांचा गुमान । ज्याचे अंकित त्यावांचून ॥ ५ ॥
तुका म्हणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥ ६ ॥

( १० )

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥ १ ॥
आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥ २ ॥
आणिकां अंतरीं न द्यावी वसती । करावी हे शांती वासनेची ॥ ३ ॥
तुका म्हणे बाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥ ४ ॥

( ११ )

करूनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥ १ ॥
तरीच हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनियां ॥ २ ॥
तेथें सरे शुद्ध साचें । अंतरीचें बीज तें ॥ ३ ॥
तुका म्हणे लवणकळी । पडतां जळी तें होय ॥ ४ ॥

( १२ )

सत्य आठवितां देव । जातें भेव पळोनी ॥ १ ॥
नलगे कांहीं करणें चिंता । घरी सत्ता सर्व तो ॥ २ ॥
भावें भाव राहे पायीं । देव तैं संनिध ॥ ३ ॥
तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ॥ ४ ॥

( १३ )

न करितां भजन होइल तर्जन । तेथें कोण जन सोडवील ॥ १ ॥
सोडवील देव अनाथांचा नाथ । तो येक समर्थ मनीं धरा ॥ २ ॥
मनीं धरा गोष्टी आपुल्या हिताची । भक्ति स्वहिताची दास म्हणे ॥३॥

( १४ )

पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं ॥ १ ॥
ज्यांचा आवडता देवा । अखंडित प्रेमभाव ॥ २ ॥

तींच भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

( १५ )

नसावें ओशाळ । मग मानीति सकळ ॥ १ ॥
जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥
राहों नेदि बाकी । दान ज्याचें त्यासि टाकी ॥ ३ ॥
होवा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणा ॥ ४ ॥

( १६ )

टिळा टोपी ऊंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥
अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥ २ ॥
मुद्रा लावितां कोरोनी । मान व्हावयासि जनीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

( १७ )

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ १ ॥
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मिळे जिवाचियेसाटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये ॥ ३ ॥

( १८ )

सुपुत्र संसारीं कुळाचें मंडन । वंश उद्धरण हरिभक्त ॥ १ ॥
भक्त तरे तारी बेचाळीस कुळें । भक्तिचेमुळें जगोद्धार ॥ २ ॥
जगोद्धार करि सुपुत्र संसारीं । येर अनाचारी पापरूपी ॥ ३ ॥
पापरूपी नर अभक्त जाणावे । जयासि नेणवे देवराणा ॥ ४ ॥
देवराणा बोळे देखोनीयां भाव । दास ह्मणे माव कामा नये ॥ ५ ॥

( १९ )

आपणा लागे काम वाण्या घरीं गूळ । त्याचें याति—कुळ काय कीजे ॥ १ ॥
उकरड्यावरी वाढली तुळशी । टाकावी ते कैशी ठाया गुणें ॥ २ ॥

( २९ )

गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दुग्ध काय सेवूं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय सळपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥ ४ ॥

( ३० )

आतां आम्हां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें झालें असे ॥ १ ॥
धीर दिला आम्हां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा कैवारी हा देव । नाहीं भवभय त्याच्या संगें ॥ ३ ॥

---

# तिसरी ( कच्ची ).

( १ )

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥ १ ॥
सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥ २ ॥
शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥ ३ ॥
तुका ह्मणे कळे । परि होताती आंधळे ॥ ४ ॥

( २ )

भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥
नारायण ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥ २ ॥
चित्त वित्त देवा । समर्पून रहा देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन । असों द्यावें समाधान ॥ ४ ॥

( ३ )

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥
येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥ २ ॥
अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण ॥ ४ ॥

( ४ )

वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपती ॥ १ ॥
विश्वासिया घडे लाभ । देईल तरी पद्मनाभ ॥ २ ॥
भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळा देव । परि हा नागवी संदेह ॥ ४ ॥

( ५ )

धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ॥ १ ॥
भार घातलियावरी । दासां नुपेक्षील हरी ॥ २ ॥

याच्या ऐसी आटी । द्यावी द्रव्याचिये साठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे पोटें । देवा बहु केलें खोटें ॥ ४ ॥

( ६ )

जतन करीन जीवें । शुद्धभावेंकरूनी ॥ १ ॥
विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन अंतकाळींचें ॥ २ ॥
वर्देळ हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ॥ ३ ॥
तुका म्हणे हृदयपेटी । ये संपुटीं सांटवूं ॥ ४ ॥

( ७ )

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥
पढियें देहभावें पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥ २ ॥
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ ३ ॥
योगक्षेम त्याचें जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥५॥

( ८ )

नको दुष्टसंग । पडे भजनामधीं भंग ॥ १ ॥
काय विचार देखिला । सांगा माझा तो विठ्ठला ॥ २ ॥
तूज निषेधितां मज । न साहे सर्वथा ॥ ३ ॥
एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें ॥ ४ ॥
तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्टजन ॥ ५ ॥
काय करूं एका । मुखें सांग म्हणे तुका ॥ ६ ॥

( ९ )

उपासा सेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥
पुरवीं वासना साच सर्व जाणा । आम्हां नारायणा अंकिताची ॥ २ ॥
बहुदिसां पुत्रा मातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीति उभड ॥ ३ ॥
तुका म्हणे धन कृपणा सोइरें ॥ यापरि दुसरें नहो आतां ॥ ४ ॥

( १० )

कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥ १ ॥
कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्यनवा ॥ २ ॥
नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेला ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी जळो जळो काया । विठ्ठलसखयावांचूनिया ॥ ४ ॥

( ११ )

राम कृष्ण ऐसीं उच्चारितां नामें । नाचेन मीं प्रेमें संतांपुढें ॥ १ ॥
काय घडेल तें घडो ये सेवटीं । लाभ आणि तुटी देव जाणे ॥ २ ॥
चिंता मोह आशा ठेवुनि निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं उरों नेदी उरी । सांडीन हे थोरी ओवाळूनी ॥ ४ ॥

( १२ )

रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥
जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य करी ॥ २ ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥३॥

( १३ )

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥ ४ ॥

( १४ )

राम म्हणतां तरे जाणता नेणता । हो कां याति भलता कुळहीन ॥१॥
राम म्हणतां नलगे आणिक सायास । केले महा दोष तेहि जळती ॥२॥
राम म्हणे तया जवळ नये भूत । कैंचा यमदूत म्हणतां राम ॥ ३ ॥
राम म्हणतां तरे भवसिंधु पार । चुके येरझार म्हणतां राम ॥ ४ ॥
तुका म्हणे हें सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ५ ॥

( १५ )

विठ्ठल आमचें जीवन । आगम निगमाचें स्थान ॥
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥ १ ॥
विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्तगोत चित्त ॥
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तहि पाताळें भरुनि ॥
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥ ३ ॥
विठ्ठल जिवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ॥
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियेलें चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ॥
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका आतां नाहीं दुसरें ॥ ५ ॥

( १६ )

लाज हे पापिणी लागलीसे पाठीं । तेणें नव्हे भेटी राघवाची ॥ १ ॥
राघवाची भेटी तरीच लाहीजे । कीर्तनीं राहिजे क्षण एक ॥ २ ॥
क्षण एक मन राघवीं असावें । दुश्चित्त नसावें सर्व काळ ॥ ३ ॥
सर्व काळ गेला देवा न भजतां । कैसे परी आतां परलोक ॥ ४ ॥
परलोका पुण्यसीळ होती धन्य । रामदासी मान्य हरीभक्ति ॥ ५ ॥

( १७ )

चिंतनासि नलगे वेळ । सर्वकाळ करावें ॥ १ ॥
सदा वाचे नारायण । तें वदन मंगल ॥ २ ॥
पढिये सर्वोत्तम भाव । येर वाव पसारा ॥ ३ ॥
ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥ ४ ॥

( १८ )

झांकूनियां नेत्र काय जपतोसी । जों नाहीं मानसीं प्रेमभाव ॥ १ ॥
रामराम म्हणा उघड मंत्र जाणा । चुकती यातना गर्भवास ॥ २ ॥

मंत्र यंत्र संध्या करिसी जडीबुटी । तेणें भूतसृष्टी पावसील ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐक सुंदर मंत्र एक । भवसिंधु तारक रामनाम ॥ ४ ॥

( १९ )

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥ १ ॥
डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥ २ ॥
सरसावलें मन । केलें सोज्वळ लोचन ॥ ३ ॥
तुका म्हणे सवें । आतां आसिजेत देवें ॥ ४ ॥

( २० )

लागोनियां पायां विनवितों तुम्हांला । करें टाळी बोला मुखें नाम ॥१॥
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गीं नाहीं ॥ २ ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ॥ ३ ॥
सकळासी येथें आहे अधिकार । कलयुगीं उद्धार हरिनामें ॥ ४ ॥
तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुग्रंथीं बोलियेलें ॥ ५ ॥

( २१ )

काय बा करीसी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वाउगेंचि ॥ १ ॥
काय बा करीसी पुस्तकांची मोट । घोकितां हृदयस्फोट हातां नये ॥ २ ॥
काय बा करीसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥ ३ ॥
काय बा करीसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥ ४ ॥
काय बा करीसी दंभ लौकिकातें । हित नाहीं मात तुका म्हणे ॥ ५ ॥

( २२ )

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥ २ ॥
दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे बळी । तेचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥

# तिसरी पक्की.

( १ )

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधू ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

( २ )

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥ १ ॥
येऊनि अंतरीं राहिल गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारी । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥ ४ ॥

( ३ )

मैत्र केले महाबळी । कामा न येती अंतकाळीं ॥ १ ॥
आधीं घेरे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ २ ॥
नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥ ३ ॥
धन मिळविल्या कोडी । तूज घेतल्या न सोडी ॥ ४ ॥
कामा नये हा परिवार । सैन्य लोक बहुफार ॥ ५ ॥
तंववरी तुमचें बळ । जंव आला नाहीं काळ ॥ ६ ॥
तुका म्हणे बापा । चुकवी चौऱ्याशींच्या खेपा ॥ ७ ॥

( ४ )

वरतें करूनीयां तोंड । हाका मारितो प्रचंड ॥ १ ॥
राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥ २ ॥

आशा धरोनि मनीं । कांहीं देईल म्हणऊनी ॥ ३ ॥
पोटा एका साटीं । तुका म्हणे झाले कष्टी ॥ ४ ॥

( ५ )

निर्वैर व्हावें सर्व भूतांसवें । साधन बरवें हेंचि एक ॥ १ ॥
तरीच अंगीकार करिल नारायण । बडबड तो सीण येणेंविण ॥ २ ॥
सोइरें पिशुन समानचि घडे । चित्त पर ओढे उपकारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्त जालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥ ४ ॥

( ६ )

नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धी ॥ १ ॥
ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ॥ २ ॥
कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ॥ ३ ॥
तुका म्हणे नानाछंदें । या विनोदें न पडावें ॥ ४ ॥

( ७ )

जग तरि आम्हां देव । परि हें निंदितों स्वभाव ॥ १ ॥
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हून काळा ॥ २ ॥
नाहीं कोणी सखा । आम्हां निपराध पारिखा ॥ ३ ॥
उपक्रमें वदे । तुका वर्मासि तें भेदे ॥ ४ ॥

( ८ )

सर्वसुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ॥ १ ॥
सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥ २ ॥
ऐसी उभारिली बाहे । वेदीं पाहें पुराणीं ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरवसा ॥ ४ ॥

( ९ )

चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम वर्णावे गुण ॥ १ ॥
हेंचि एक देवा तुम्हां मागणें दातारा । उचित तें करा माझा भाव जाणूनि ॥ २ ॥

खुंटली जाणीव माझें बोलणें आतां । करूं यावी तैसी करावी बाळकाची चिंता॥३
तुका म्हणे आतां नको देऊं अंतर । न कळे पुढें काय बोलों विचार ॥ ४ ॥

( १० )

प्रेमाविण जें जें केलें । निरर्थक वांयां गेलें ॥ १ ॥
मुखें करितों कीर्तन । मनीं विषयांचें ध्यान ॥ २ ॥
ऐसें श्रवण कीर्तन । गेलें ओहळीं वाहोन ॥ ३ ॥
तुका म्हणे पांडुरंग । जाणतसे अंतरंग ॥ ४ ॥

( ११ )

वृद्धपणीं माळ धरी । ज्ञान नाहीं तिळभरी ॥ १ ॥
प्राप्त झाला तृषाकाळ । कूप खणीतो गयाळ ॥ २ ॥
क्षुधा लागली गव्हारा । तेव्हां पेरी तो बाजरा ॥ ३ ॥
आधीं बुडविलें सर्व । अंतीं आलें यम पर्व ॥ ४ ॥
तुका म्हणे माझा हरी । अभाग्यासी राहे दुरी ॥ ५ ॥

( १२ )

ऐका कलीचा आचार । रिझे असत्यासी नर ॥ १ ॥
शुचिरभूत संध्यास्नान । दावी वरी वरी जन ॥ २ ॥
जप मंत्र नित्य नेम । दावी लोकांसी संभ्रम ॥ ३ ॥
मुखें बोले फार । तैसा न करी आचार ॥ ४ ॥
सर्व बाह्य रंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ५ ॥
तुका म्हणे तेथ । कैसा राहे दीनानाथ ॥ ६ ॥

( १३ )

स्वरूपाचे ठायीं चित्त तें बैसेना । जाणावी वासना गेली नाहीं ॥ १ ॥
काया वाचा चित्त जडे भगवंतीं । तेव्हां होय शांति वासनेची ॥ २ ॥
तुका म्हणे रामनामाचा हो घोष । तेणें वासनेस क्षय होय ॥ ३ ॥

( १४ )

बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली हे हातीं ॥ १ ॥
मनुष्य देहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ॥ ॥ २ ॥
बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥ ३ ॥
तुका म्हणे जाणें । ऐसें भलें तें शहाणें ॥ ४ ॥

( १९ )

पापाचीं संचितें देहासी दंडणा । तुज नारायणा काय बोल ॥ १ ॥
पेरी कडू जिरें मागे अमृत फळें । अर्का झाडा केळें केवीं येई ॥ २ ॥
सुख आणि दुःख भोग हा देहाचा । सोस वासनेचा करूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ॥ ४ ॥

( १६ )

दो दिवसांचा पाहुणा चालतो उताणा । कांरे नारायणा न भजसी ॥ १ ॥
तूं अखंड दुश्चिता तुज नेति अवचिता । मग पंढरीनाथा भजसी केव्हां ॥२॥
तुका म्हणे ऐसे आहेत उदंड । तयां केशव प्रचंड केवीं भेटे ॥ ३ ॥

( १७ )

देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी ॥ १ ॥
मोडिले या रांडे सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ॥ २ ॥
परिचारी केली आपुलीच रूढी । अंतरीचे कुडी ठावी नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ॥ ४ ॥

( १८ )

डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥ १ ॥
तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ २ ॥
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥ ३ ॥
तुका म्हणे मैंद । नाहीं त्यापाशीं गोविंद ॥ ४ ॥

( १९ )

भोळे भक्त भाव धरिती मानसीं । त्यांसी हृषीकेशी जवळीच ॥ १ ॥
भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया मी खेदा काय सांगों ॥२॥
गणिकेसारिखीं नामें उद्धरिलीं । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ॥ ३ ॥
तुका म्हणे काय शुद्ध माझी जाति । थोर केली ख्याती हरिनामें ॥४॥

( २० )

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥
तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकांच्या ॥ २ ॥
काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे देव भक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ४ ॥

( २१ )

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं भाव वाड असो ॥ १ ॥
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥ २ ॥
जन निंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वांभूतीं ॥ ४ ॥

( २२ )

हरी गीतीं गावा हरी चित्तीं ध्यावा । विठ्ठल पहावा विटेवरी ॥ १ ॥
अनाथांचा बंधु हरि कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ॥ २ ॥
शरणागतासी हरी मुक्तिदाता । विठ्ठल या संता समागमें ॥ ३ ॥
हरी गुणनिधी हरी सर्व सिद्धी । लागली समाधि अखंडित ॥ ४ ॥
विठोबाचें नांव घेतां झालें सुख । गोडावलें मुख तुका म्हणे ॥ ५ ॥

( २३ )

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥ १ ॥
सर्व साधनाचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ २ ॥
योग याग तपें । केलीं तयानें अमुपें ॥ ३ ॥
तुका म्हणे जपा । मंत्र तीअक्षरी सोपा ॥ ४ ॥

( २४ )

नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥
येथें नाहीं वेष सरतें आडनांवें । निवडे घाव डाव व्हावा अंगीं ॥ २ ॥
नव्हती ते संत धरितां भोंपळा । करितां वाकळा प्रावरण ॥ ३ ॥
नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥
नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥
नव्हती संत करितां तप तीर्थाटणें । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥
नव्हती संत माळा मुद्रांच्या भूषणें । भस्म उद्धळणें नव्हती संत ॥ ७ ॥
तुका म्हणे नाहीं निरसला देह । तों अवघे हे संसारिक ॥ ८ ॥

( २५ )

यालागीं आवडी म्हणा रामकृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ ॥ १ ॥
सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा रामहरी ॥ २ ॥
न लगती कष्ट नलगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ ३ ॥
नलगें तपतीर्थ करणे महादन । केल्या एक मन जोडे हरी ॥ ४ ॥
तुका म्हणे कांहीं न वेंचितां धन । जोडे नारायण नामासाठीं ॥ ५ ॥

( २६ )

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ॥ १ ॥
नलगे हालावें चालावें बाहेरी । अवघेंचि घरीं बैसलिया ॥ २ ॥
देवाचींच नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ॥ ३ ॥
तुका म्हणे होय भावेंचि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ॥ ४ ॥

# चौथी ( कच्ची ).

( १ )

हरीकीर्तनें चित्त शुद्ध । जाय भेद निरसुनी ॥ १ ॥
कामक्रोध पळती दुरी । होत भोंवरी महापापा ॥ २ ॥
गजरें हरीचें कीर्तन । पशुपक्षी होती पावन ॥ ३ ॥
स्त्रीपुरुषां अधिकार । कीर्तन सार कलियुगीं ॥ ४ ॥
एकाजनार्दनीं उपाय । तरावया भवनदीसी ॥ ५ ॥

( २ )

ऐका ऐका वचन माझें । तुम्ही वदा विठ्ठल वाचे ॥ १ ॥
नामापरतें साधन नाहीं । वेदशास्त्रें देती ग्वाही ॥ २ ॥
चार वेद सहा शास्त्र । अवघा नामाचा पसर ॥ ३ ॥
अठरा पुराणांचे पोटीं । नामेंविण नाहीं गोष्टी ॥ ४ ॥
नामें तारिले पातकी । मुक्त झाले इहलोकीं ॥ ५ ॥
अजामेळ तारिला । वाला कोळी ऋषी केला ॥ ६ ॥
गणिका नेली निजपदा । रामनाम वदे एकदा ॥ ७ ॥
ऐसी नामाची ती थोरी । पूतना तारिली निर्धारीं ॥ ८ ॥
आवडीनें नाम गाय । एकाजनार्दनीं वंदी पाय ॥ ९ ॥

( ३ )

भवरोगासी वोखद । रामनाम हेंचि शुद्ध ॥ १ ॥
येणें तुटे रोगव्यथा । भुक्ति मुक्ति वंदिती माथा ॥ २ ॥
न लगे आणिकाचें काम । वाचे वदे रामनाम ॥ ३ ॥
पथ्य एक शुद्ध क्रिया । एकाजनार्दनीं लागे पायां ॥ ४ ॥

( ४ )

ऐसें आत्मज्ञान उधरी जगासी । पाहेना तयासी काय करुं ॥ १ ॥
काय करुं जना जन विवरेना । नेणतां सरेना जन्म मृत्य ॥ २ ॥

जन्म मृत्य बाधी मानीना तयासी । कल्पतरु ज्यासी तुछे वाटे ॥ ३ ॥
तुछे वाटे देव तोची तो निदैंव । तयासी सदैव कोण करी ॥ ४ ॥
कोण करी येका राघवा वांचुनी । राम धरा मनीं सर्व काळ ॥ ५ ॥
सर्व काळ गेला दरीद्र भोगीतां । वैराग्य पाहातां तेथें नाहिं ॥ ६ ॥
नाहिं भक्ती ज्ञान परमार्थाचें सुख । संसारींही दुख दरीद्राचें ॥ ७ ॥
दरीद्राचें दुख केलें देशधडी । रामराज्यगुढी उभविली ॥ ८ ॥
उभविली गुढी भक्तीपंथें जावें । सीघ्रची पावावें समाधान ॥ ९ ॥
समाधान रामी रामदासी जालें । सार्थकानें केलें सार्थकची ॥ १० ॥

( ५ )

वरी दिससी शुद्ध अंतरीं मळीन । तोंवरी हें स्नान व्यर्थ होय ॥ १ ॥
तीर्थयात्रा योगें कीर्तिही पावली । बुद्धि शुद्धि झाली नाहीं तेणें ॥ २ ॥
शांति क्षमा दया नाहीं पै अंतरीं । वायां येरझारी कष्ट केले ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं सद्गुरु पाय धरी । शांतीचे जिव्हारीं पावशील ॥ ४ ॥

( ६ )

देव सर्वाठायीं वसे । परि न दिसे अभाविकां ॥ १ ॥
जळीं स्थळीं पाषाणीं भरला । रिता ठाव कोठें उरला ॥ २ ॥
जिकडे पाहे तिकडे देव । अभाविकां दिसे वाव ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं नाहीं भाव । तंव तया न दिसे देव ॥ ४ ॥

( ७ )

मृगजळाचेनि काय तृषा हरे । क्षुधा निर्धारें अर्कफळें नोहे तृप्ति ॥१॥
पाहतां गोजिरें दिसे वृंदावन । कैं गोडपण नये त्यासी ॥ २ ॥
बचनाग खातां आधीं लागे गोड । शेवटीं अवघड देहपीडा ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं दुर्जन अभाविक । खळ अमंगळ देख संसारांत ॥ ४ ॥

( ८ )

पराचे ते दोष आणूं नये मनीं । जयाची ते करणी त्याजसवें ॥ १ ॥
विषाचिया अंगीं नोहे अमृतपण । मारक तें जाण विष होय ॥ २ ॥
सर्पाचिये अंगीं शांतीचा कळवळा । कोणा पाहे डोळा भरूनि दृष्टी॥३॥
एकाजनार्दनीं जैसा त्याचा गुण । तैसें तें लक्षण वद्धक त्यासी ॥ ४ ॥

( ९ )

हृदयस्थ असोनी कां रे फिरसी वांयां । दीप आणि छाया जयापरी ॥ १ ॥
आत्मतीर्थीं सुस्नात झालिया मन । आणिक साधन दुजें नाहीं ॥ २ ॥
साधन तें मन करीं आपुलें आधीन । यापरतें कारण आन नाहीं ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं मनासी आवरीं । मग तूं संसारीं धन्य होसी ॥ ४ ॥

( १० )

अभिमानासाठीं । वेंचिती तपांचिया कोटी ॥ १ ॥
अभिमान दुर्वासासी । व्यर्थ शापिला अंबऋषी ॥ २ ॥
अभिमान ब्रह्मियासी । नेलें गोप वत्सांसी ॥ ३ ॥
अभिमानें नाडला पूर्ण । विश्वमित्र ऋषि जाण ॥ ४ ॥
एकाजनार्दनीं शरण । समूळ सांडावा अभिमान ॥ ५ ॥

( ११ )

जिव्हा रस चाखी अवलोकी नेत्र । प्रेरक पवित्र आत्माराम ॥ १ ॥
बोलतसे मुख त्वचे कळे स्पर्श । प्रेरक परेश आत्माराम ॥ २ ॥
सुखदुःख ज्ञान होतसे पैं चित्ता । प्रेरक पंढरीनाथावीणनाहीं ॥ ३ ॥
घ्राणा परिमळ ऐकती श्रवण । प्रेरक नारायण सर्व साक्षी ॥ ४ ॥
हस्तें घेणें देणें चरणीं गमन । प्रेरक ईशान आत्माराम ॥ ५ ॥
ज्याच्या सत्ताबळें हाले वृक्षपान । प्रेरक भगवान सर्वांचा तो ॥ ६ ॥
एकाजनार्दनीं पाय हे धरावे । ध्यान हें करावें हृदयीं त्याचें ॥ ७ ॥

( १२ )

असत्याचा शब्दा नको वाचे माझे । आणिक होका वोझें भलतैसें ॥ १ ॥
परि संतरज वंदीन मी माथां । असत्य सर्वथा नोहे वाणी ॥ २ ॥
अणुमात्र रज डोळां न साहे । कैसा खुपताहे जन दृष्टीं ॥ ३ ॥
एकाजनार्दनीं असत्याची वाणी । तोचि पापखाणी दुष्टबुद्धि ॥ ४ ॥

( १३ )

ज्यासी करणें चित्तशुद्धि । कर्में आचरावीं आधीं ॥ १ ॥
तरीच होय मनःशुद्धि । सहज तुटती आधिव्याधि ॥ २ ॥
चित्ताची स्थिरता । होय उपासने तत्वतां ॥ ३ ॥
चित्त झालिया निश्चळ । सहज राहील तळमळ ॥ ४ ॥
एकाजनार्दनीं मन । होय ब्रह्मरूप जाण ॥ ५ ॥

( १४ )

समुद्र क्षोभे वेळोवेळीं । योगिया क्षोभेना कोण्हाकाळीं ॥ १ ॥
समुद्रा भारितें पर्वसंबंधें । योगी परिपूर्ण परमानंदें ॥ २ ॥
समुद्र सर्वदा तो क्षार । तैसा नव्हे योगीश्वर ॥ ३ ॥
समुद्रीं वरुषतां घन । जीवनीं मिळतसे जीवन ॥ ४ ॥
योगियांची योग स्थिति । सदा परमार्थे भक्ति ॥ ५ ॥
एकाजनार्दनीं शरण । योगियांचें जें योग चिन्ह ॥ ६ ॥

( १५ )

हेंचि माझें तप हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥
हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥
हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म । हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ३ ॥
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि जप ध्यान नाम तुझें ॥ ४ ॥
हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन । हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥ ५ ॥
हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ६ ॥

हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ॥ ७ ॥
तुका म्हणे दुजें सांगायासी नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ॥ ८ ॥

( १६ )

भवसिंधुचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें ॥ १ ॥
तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ॥ २ ॥
मागें उतरिले बहुत । पैल तीरीं साधु संत ॥ ३ ॥
तुका म्हणे लागवेगें । जाऊं तयाचिया मागें ॥ ४ ॥

( १७ )

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीव भाव ॥ १ ॥
येणें सोसें मन झालें हांव भरी । परती माघारी घेत नाहीं ॥ २ ॥
बंधनापासूनि उकलली गांठी । देतां आली मिठी सावकाशें ॥ ३ ॥
तुका ह्मणे देह भरिला विठ्ठलें । काम क्रोधें केलें घर रितें ॥ ४ ॥

( १८ )

याति गुणें रूपें काय ते वानर । तयांच्या विचारें वर्ते राम ॥ १ ॥
ब्रह्महत्या राशी पातकी अनेक । तो वंद्य वाल्मीक तिहीं लोकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे चोरीचा व्यापार । म्हणा रघुवीर वेळोवेळां ॥ ३ ॥

( १९ )

मनासी लावावी स्वरूपाची गोडी । इतर आवडी सोडवावी ॥ १ ॥
पळ पळ नाम विठोबाचें घ्यावें । कोठेंही नसावें आसक्तता ॥ २ ॥
अहंकार आदि वैरी हे सकळ । गुरु कृपा बळें आवरावे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन उफराटें होय । तरीच अपाय मावळती ॥ ४ ॥

( २० )

नाशवंत देह नासेल हा जाणा । कांरे उच्चाराना वाचे नाम ॥ १ ॥
नामेंचि तारले कोट्यानकोटी । नामें वैकुंठीं बैसविलें ॥ २ ॥
नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । तें कां तुम्ही मनीं आठवाना ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाम वेदांसि आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाठीं ॥ ४ ॥

( २१ )

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसेचि खळ ॥ १ ॥
कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ २ ॥
मान दंभासाठीं । केली अक्षरांची आटी ॥ ३ ॥
तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ॥ ४ ॥
वांटिलें तें धन । केली अहंता जतन ॥ ५ ॥
तुका ह्मणे चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥ ६ ॥

( २२ )

संसारसागर भरला दुस्तर । विवेकी पोहणार विरला संत ॥ १ ॥
कामाचिया लाटा अंगीं आदळती । नेणों गेले किती पाहोनियां ॥ २ ॥
भ्रम हा भोंवरा फिरवी गरगरा । एक पडिले धरा चौऱ्यांशींच्या ॥ ३ ॥
नावाड्या विठ्ठल भवसिंधु तारूं । भक्तां पैल पारू उतरीतो ॥ ४ ॥
नामा म्हणे नाम स्मरा श्रीरामाचें । भय कळिकाळाचें नाहीं तुह्मां ॥ ५ ॥

( २३ )

पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीचि होसी । केशव न होसि अरे मना ॥ १ ॥
आप ध्यासी तरी आपाचि होसी । केशव न होसि अरे मना ॥ २ ॥
वायु ध्यासी तरी वायुचि होसी । परी केशव न होसि अरे मना ॥ ३ ॥
आकाश ध्यासी तरी आकाशाचि होसी । परी केशव न होसि अरे मना ४
नामा म्हणे जरी केशवासी ध्यासी । तरी केशवचि होसी अरे मना ॥ ५ ॥

( २४ )

गति अधोगति मनाची हे युक्ती । मन लावीं एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥
मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशींचा ॥ ४ ॥

( २५ )

तुझे पाय माझे राहियेले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ॥ १ ॥
आह्मां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालवितां ॥ २ ॥
मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥ ३ ॥
पाप पुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुण शरीर सांडियेलें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥ ५ ॥

( २६ )

जाली होती काया । बहु मळिन देवराया ॥ १॥
तुझ्या उजळलीं नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ २ ॥
अनुतापें झाला झाडा ॥ प्रारब्धांनीं केला तोडा ॥ ३ ॥
तुका म्हणे देह पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥ ४ ॥

( २७ )

लपलासि तरी नाम कैसें नेसी । आम्ही अहर्निशीं नाम गाऊं ॥ १ ॥
आम्हांपासूनियां जातां नये तुज । तें हें वर्म बीज नाम घोकूं ॥ २ ॥
आम्हांसी तों तुझें नामचि पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे ॥ ३ ॥
भोळीं भक्तें आम्ही चुकलों होतों वर्म । सांपडलें नाम नामयासी ॥ ४ ॥

( २८ )

तूं तंव नेणता परी हरि जाणता । आहे तों समता सर्वभूतीं ॥ १ ॥
सर्व ब्रम्ह हरी एकचि निर्धारीं । होसील झडकरी ब्रम्ह तूंचि ॥ २ ॥
अच्युत माधव अमृताच्या पाठें । लागतांची वाटे वंदी यम ॥ ३ ॥
नामा म्हणे होसील जिवलग विष्णूचा । दास त्या हरीचा आवडता ॥४॥

( २९ )

कासया करावे तयाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी ॥ १ ॥
कासया फिरावे अनेक ते देश* । दावितील आस पुढें लाभ ॥ २ ॥

* केवळ तीर्थयात्रेच्या निमित्तानें, ज्ञानार्जनाच्या निमित्तानें नव्हे.

कासया पुजावीं अनेक दैवतें । पोट भरे तेथें लाभ नाहीं ॥ ३ ॥
कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुकासाठीं ॥ ४ ॥
तुका म्हणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥ ५ ॥

( ३० )

व्रत तप दान हवन पूजन । नलगे साधन नाम म्हणतां ॥ १ ॥
राम कृष्ण हरी मुकुंद मुरारी । जिव्हे क्षणभरी न विसंबें ॥ २ ॥
कळिकाळ दारुण करीतसे विघ्न । परजी नारायण नाम जिव्हे ॥ ३ ॥
शरण आलों जिव्हे तुवां नुपेक्षावें । नामा ह्मणे गावें हरीनाम ॥ ४ ॥

( ३१ )

पोटा पुरतें काम । परि अगत्य तो राम ॥ १ ॥
कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥ २ ॥
प्रारब्धीं हेवा । जोडीं देवाची ते सेवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे बळ । बुद्धी वेंचूनि सकळ ॥ ॥ ४ ॥

( ३२ )

थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥ ३ ॥
तुका ह्मणे धरा निष्ठावंत भाव । जरि पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

( ३३ )

अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजिती ॥ १ ॥
नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ॥ २ ॥
विष तांब्या वाटी । भरली लावूं नये होटीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ॥ ४ ॥

( ३४ )

लाजों नको मना हरीच्या कीर्तना । संसार पाहुणा दो दिवसांचा ॥ १ ॥
बाळकाचे बोल माउली प्रीति करी । तैसी कीर्ति हरी परिसें चित्तें ॥ २ ॥
भलतिया परी बोले बा श्रीहरी । तो भवसागरीं तारील जाणा ॥ ३ ॥
येणें तारुण्यपणें भ्रमलासी झणीं । भोगिसी पतनी जन्मांतरीं ॥ ४ ॥
तूं होय मागता हरि होय दाता । शरण जाईं अनंता ह्मणे नामा ॥ ५ ॥

( ३५ )

तोडीं हें बिरडें मोह ममता आधीं । विषयबाधा व्याधी गुंफों नको ॥ १ ॥
असे घराश्रमीं भजे सर्वांभूतीं । मी माझें पुढती* म्हणों नको ॥ २ ॥
तूं तंव लटिका आलासी कोठुनी । मी माझें म्हणोनी म्हणतोसी ॥ ३ ॥
नामा म्हणे मूळ राम परब्रम्ह । जगाचा विश्राम त्यासी भजें ॥ ४ ॥

---

* पुन्हां.

# चौथी ( पक्की ).

( १ )

दासांची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम येक ॥ १ ॥
राम येक माता राम येक पीता । राम सर्व भ्राता सोहदरु ॥ २ ॥
सोहदरु विद्या वैभव कांचन । सर्वहि स्वजन राम येक ॥ ३ ॥
राम येक स्वामी रामची कैवारी । लाभ तो संसारीं राम येक ॥ ४ ॥
राम येक ज्ञान राम येक ध्यान । रामें समाधान रामदासीं ॥ ५ ॥

( २ )

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥ १ ॥
हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥
आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरी जीवा घातक हें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाले जे मनाआधीन । तयांसी बंधन यम करी ॥ ४ ॥

( ३ )

कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥ १ ॥
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥
कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥ ३ ॥
कैं बसावें वाहनीं । कैं पायीं अनवाणी ॥ ४ ॥
कैं उत्तम प्रावणें । कैं वसनें तीं जीर्णें ॥ ५ ॥
कैं सकळ संपत्ति । कैं भोगणें विपत्ति ॥ ६ ॥
कैं सज्जनासि संग । कैं दुर्जनासि योग ॥ ७ ॥
तुका ह्मणे जाण । सुखदुःख तें समान ॥ ८ ॥

( ४ )

वेदाध्ययन करिसी तरी वैदिकाचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ १ ॥
पुराण सांगसी तरी पुराणीकाचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ २ ॥

गायन करिसी तरी गुणीजन होसी । परी वष्णैव न होसी अरे जना ॥ ३॥
यज्ञ करिसी तरी याज्ञिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ ४ ॥
कर्म आचरसी तरी कर्मठचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ ५॥
तीर्थ करिसी तरी कापडीच होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ ६ ॥
नामा म्हणे नाम केशवाचें घेसी । तरीच वैष्णव होसी अरे जना ॥ ७ ॥

( ५ )

सर्व धर्मातें टाकोन । मातें शरण येई पूर्ण ॥ १ ॥
मोक्ष इच्छा आहे तुज । तरी शरण यावें मज ॥ २ ॥
अहंता हें पाप थोर । तुवां जाणावें निर्धार ॥ ३ ॥
तुका म्हणे मायेकरून । बोले गीतेंत हे खुण ॥ ४ ॥

( ६ )

क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥ २ ॥
संतसमागमीं धरुनि आवडी । करावी तांतडी परमार्थाची ॥ ३ ॥
तुका म्हणे यहलोकींच्या वेव्हारें । नये धुरें डोळे भरूं देऊं ॥ ४ ॥

( ७ )

देह ही पंढरी आत्मा पांडुरंग । करितसे संग अहर्निशीं ॥ १ ॥
मन पुंडलीक आवरुनी धरा । तेणें होय सोयरा आत्माराम ॥ २ ॥
चहूं या देहाची करूनियां वीट । विटेवरी नीट उभा असे ॥ ३ ॥
तुका म्हणे लक्ष लक्षूनी अंतरीं । तोचि वारकरी पंढरीचा ॥ ४ ॥

( ८ )

नमस्कारी भूतें विसरोनी याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ १ ॥
परउपकारीं वेचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ २ ॥
द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ३ ॥
जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ४ ॥

उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ ॥
तुकयाबंधु ह्मणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥ ६ ॥

( ९ )

सत्य आम्हां मनीं । नव्हो गाबाळाचे धनी ॥ १ ॥
ऐसें जाणारे सकळ । भरा शुद्ध टांका मळ ॥ २ ॥
देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥ ३ ॥
तुका ह्मणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ॥ ४ ॥

( १० )

परपीडक तो आह्मां दावेदार । विश्वीं विश्वंभर म्हणऊनि ॥ १ ॥
दंडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळां । राखूं तो चांडाळा ऐसा दुरी ॥ २ ॥
अनाचार कांहीं न साहे अवगुणें । बहु होय मन कासावीस ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी एकविध सेवा । विमुख ते देवा वाळी चित्तें ॥ ४ ॥

( ११ )

ऐसें भाग्य कई लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥
मग तुझ्या सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ २ ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ ३ ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगितो ज्वाळ अग्नि जैसा ॥ ४ ॥
भक्ति नवविधा भावशुद्ध बरी । अळंकारावरी मुगुटमणी ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझी पुरवीं वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ६ ॥

( १२ )

सर्वां भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ॥
उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरिजे ॥ १ ॥
पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ॥
करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ॥ २ ॥
भूमी पाहतां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ॥

उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ॥ ३ ॥
म्हणोनि विवेकें । कांहीं करणें निकें ॥
तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥ ४ ॥

( १३ )

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥ १ ॥
धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ २ ॥
द्रव्य आणि कन्या । येथें कुळ कर्म शोधण्या ॥ ३ ॥
तुका म्हणे पुण्य गांठीं । तरीच उचितासी भेटी ॥ ४ ॥

( १४ )

चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितां दूर तोंचि भलें ॥ १ ॥
ऐसी परंपरा आलीसे चालत । भलत्याची नीत त्यागावरी ॥ २ ॥
हो कां पिता पुत्र बंधु कोणी तरी । विजाति संग्रहीं धरूं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥ ४ ॥

( १५ )

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ १ ॥
तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥ २ ॥
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ॥ ३ ॥
प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥ ४ ॥
तुका ह्मणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ५ ॥

( १६ )

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥ १ ॥
उपाधि तें अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ॥ २ ॥
आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ ३ ॥
तुका ह्मणे वृत्ति । अविट हे सहजस्थिति ॥ ४ ॥

( १७ )

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंहि तेणें वंद्य केलें ॥ १ ॥
अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥
ब्रम्हहत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥

( १८ )

दया क्षमा शांति । तेथें देवाची वसती ॥ १ ॥
पावे धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ॥ २ ॥
कीर्तनाचे वाटे । बराडिया ऐसा कोटे ॥ ३ ॥
तुका म्हणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥ ४ ॥

( १९ )

काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरीनाथा कष्ट नाहीं ॥ १ ॥
सर्वकाळ वाचे उच्चारितां हरी । तया सुखा सरी पाड नाहीं ॥ २ ॥
रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृताची उकळी नाम तुझें ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥ ४ ॥

( २० )

मस्तकीं सहावें टांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥
आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ २ ॥
सद्गुरुसेवन तेंचि अमृतपण । करूनि प्राशन बैसावें गा ॥ ३ ॥
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजिती करूं नये ॥ ५ ॥

( २१ )

तुटे मायाजाळ बिघडे भवसिंधु । जंरि लागे छंदु हरिनामें ॥ १ ॥
येर कर्म धर्म करितां ये काळीं । माजी तरला बळी कोण सांगा ॥ २ ॥

६१६

न पठवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ॥ ३ ॥
न साधवे योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥ ४ ॥
नव्हे अनुष्ठान न कळे ब्रम्हज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ॥ ५ ॥
तुका म्हणे वर्म दावियेलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं ॥ ६ ॥

( २२ )

माझें मन पाहीं कसून । चित्त न ढळे तुज पासून ॥ १ ॥
कापून देईन शीर । पहा कृपण कीं उदार ॥ २ ॥
मजवरी घालीं घण । परि न सोडी चरण ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंतीं । तुजवांचोनी नाहीं गती ॥ ४ ॥

( २३ )

जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम ते ठाय रम्य स्थळ ॥ १ ॥
रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त तें ते घडी ॥ २ ॥
धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहतां संकल्प गोविंदाचे ॥ ३ ॥
तुका म्हणे लाभकाळ तेंचि जीणें । भाग्य नारायण उत्तम तें ॥ ४ ॥

( २४ )

ब्राह्मणाही नकळे आपुलें तें वर्म । गंवसे परब्रम्ह नामें एका ॥ १ ॥
लहान थोरांसी करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा ॥ २ ॥
सर्वांप्रति माझी हेचि असे विनंती । आठवा श्रीपती मनामाजी ॥ ३ ॥
केशव नारायण करितां आचमन । तेचि संध्या स्नान कर्म क्रिया ॥ ४ ॥
नामें करा नित्य भजन भोजन । ब्रम्हकर्म ध्यान याचे पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि निर्वाणींचें शस्त्र । म्हणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ॥ ६ ॥

( २५ )

जीवें जीव नेणे पापी सारिखाची । नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥
आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशूमध्यें काय कळों नये ॥ २ ॥

देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात वाहती कैसे ॥ ३ ॥
तुका म्हणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महादुःखें ॥ ४ ॥

( २६ )

पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंतावरी बोल ॥ १ ॥
भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥
नाठवी तो खळ आपुली करणी । देवासि निंदोनि बोलतसे ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो काटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं ॥ ४ ॥

( २७ )

या रे नाचों अवघे जण । भावें प्रेमें परिपूर्ण ॥ १ ॥
गाऊं पंढरीचा राणा । क्षेम देउनि संतजना ॥ २ ॥
सुख फुकासाठीं । साधे हरिनाम बोभाटीं ॥ ३ ॥
प्रेम वांटितो उदार । देतां नाहीं साना थोर ॥ ४ ॥
पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी ॥ ५ ॥
तुका म्हणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ॥ ६ ॥

( २८ )

श्रम परिहारा । मूळ हें आलें दातारा ॥ १ ॥
देह निवेदूनि पायीं । जालों रिकामा उतराई ॥ २ ॥
आपली ते सत्ता । येथें असों नेदीं आतां ॥ ३ ॥ ॥
राहिला निराळा । तुका कटकटे वेगळा ॥ ४ ॥

( २९ )

अवघें निरंतर करा हा विचार । भवसिंधु पार तरीजे ऐसा ॥ १ ॥
अवघे जन्म वांयां गेले विषयसंगें । भुललेति वाउगे मायामोहा ॥ २ ॥
अवघा वेळ करितां संसाराचा धंदा । वाचे वसो सदा हरीचें नाम ॥ ३ ॥
अवघ्या भावीं एका विठ्ठलातें भजा । आतें करा पूजा हरिदासांची ॥ ४ ॥

अवघें सुख तुम्हां होईल आपैतें । न याल मागुते गर्भवासा ॥ ५ ॥
नामा म्हणे अवघे अनुभवूनि पाहा । सर्व काळीं रहा संतसंगें ॥ ६ ॥

( ३० )

माझ्या मुखें मज बोलवितो हरी । सकळां अंतरीं नारायण ॥ १ ॥
न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आह्मीं ॥ २ ॥
तुका म्हणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरे शिकवितां ॥ ३ ॥

( ३१ )

देवाची पूजा हे भूतांचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥
रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरि सकळही ॥ २ ॥
तुका म्हणे संतपण याचि नांवें । जरि होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

( ३२ )

असंतलक्षण भूतांचा मत्सर । मनास निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥
अंतरींचा रंग उमटे बाहेरी । बोळखियापरी आपेंआप ॥ २ ॥
संत ते समय वोळखती वेळ । संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे हित उचित अनुचित । मज लागे नित आचरावें ॥ ४ ॥

( ३३ )

आपुलें स्वहित करावें पैं आधीं । विचारुनि बुद्धि समाधान ॥ १ ॥
मागें पाहों नये वाट फिरोनियां । दुसरा संगिया साहाकारी ॥ २ ॥
आपुलिया बळें घालावि हे कास । न येणेंची आस आणिकांची ॥ ३ ॥
तुका म्हणे ब्रह्मरसीं द्यावी बुडी । वासना हे कुडी सांडोनियां ॥ ४ ॥

( ३४ )

एकविध आह्मी न धरूं पालट । न संडूं ते वाट सांपडली ॥ १ ॥
ह्मणऊनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धिबळ पाय तुझे ॥ २ ॥
बहुत न कळे बोलतां प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ ३ ॥
तुका म्हणे अगा जीवीच्या जीवना । तूंचि नारायणा साक्षी माझा ॥ ४ ॥

( ३५ )

दिला जीव भाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥ १ ॥
आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ॥ २ ॥
माझिया मरणें । तुह्मी बैसविलें ठाणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं । मी हें माझें येथें नाहीं ॥ ४ ॥

( ३६ )

बळियाचे अंकित । आह्मी झालों बळिवंत ॥ १ ॥
लाता हाणोनि संसारा । केला षडूर्मींचा मारा ॥ २ ॥
जन धन तन । केलें तृणहि समान ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां । आह्मी मुक्तीचिया माथां ॥ ४ ॥

## पांचवी ( कच्ची ).

### मनाचे श्लोक.

( १ )

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ १ ॥

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
पुढें वैखरीं राम आधीं वदावा ।
सदाचार हा थोर सांडू नये तो
जगीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥ २ ॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें
मना बोलणें नीत सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावें
मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ३ ॥

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ४ ॥

जनीं सर्वसूखी असा कोण आहे
विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ।
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥ ५ ॥

मना सांग पां रावणा काय झालें
अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें ।
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं
बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥ ६ ॥

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी
जितां बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव ते सर्वही मानिताती
अकस्मात सोडूनियां सर्व जाती ॥ ७ ॥

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे
अकस्मात तोही पुढें जात आहे ।
पुरेना जनीं लोभरे क्षोभ होतो
म्हणोनी जनीं मागुती जन्म घेतो ॥ ८ ॥

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे ।
मना सत्य तें सत्य वाचे वदावें
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥ ९ ॥

देहेरक्षणाकारणें यत्न केला
परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।
करीं रे मना भक्ति या राघवाची
पुढें अंतरीं सोड चिंता मनाची ॥ १० ॥

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ११ ॥

सदा सर्वदा देव सन्नीध आहे
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहें ।
सुखानंद आनंद कैवल्यदानी
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२ ॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा
वसे हो तया अंतरीं देव तैसा ।
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १३ ॥

बहू हिंडतां सूख होणार नाहीं
शिणावें परी नातुडे हीत कांहीं ।
विचारें बरा अंतरीं बोध कीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥ १४ ॥

मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी
कथा आदरें राघवाची करावी ।
नसे राम तें धाम सोडोनि द्यावें
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥ १५ ॥

जयाचेनि संगें समाधान भंगे
अहंता अकस्मात येऊनि लागे ।
तया संगतीची जनीं कोण गोडी
जिये संगतीनें मती राम सोडी ॥ १६ ॥

रघूनायकावीण वायां शिणावें
जनासारिखें व्यर्थ कां वोसणावें ।
सदा सर्वदा नाम वाचे वसो दे
अहंता मनीं पापिणी ते नसो दे ॥ १७ ॥

जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें
तयाचेनि योगें समाधान होणें ।
तयालागिं हें सर्व चांचल्य दीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥ १८ ॥

मना जे घडी राघवावीण गेली
जगीं ते तुवां आपुली हानि केली ।
रघूनायकावीण तो शीण आहे
जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥ १९ ॥

बरा निश्चयो शाश्वताचा करावा
ह्मणे दास संदेह तो नीरसावा ।
घडीनें घडी सार्थकाची करावी
सदा संगती सज्जनाची धरावी ॥ २० ॥

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ २१ ॥

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना
अती काम त्या राम चित्तीं वसेना ।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा
अती विषयी सर्वदा दैन्यवाणा ॥ २२ ॥

सुखानंदकारी निवारी भयातें
जनीं भक्तिभावें भजावें तयातें ।
विवेकें त्यजावा अनाचार हेवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ २३ ॥

सदा रामनामें वदा पूर्ण कामें
कदा बाधिजे नापदा नित्य नेमें ।
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ २४ ॥

जयाचेनि नामें महा दोष जाती
जयाचेनि नामें गती पाविजेती ।
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ २५ ॥

अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं
तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ।
महाराज तो स्वामि कैवल्यदाता
वृथा वाहणें देहसंसारचिंता ॥ २६ ॥

मना मत्सरें नाम सोडूं नको हो
अती आदरें हा निजध्यास राहो ।
समस्तां मतें नाम तें सार आहे
दुजी तूळणा तूळितां हें न साहे ॥ २७ ॥

बहू चांगलें नाम या राघवाचें
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें
जिवा मानवा हेंचि कैवल्य साचें ॥ २८ ॥

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें
अती आदरें नाम घोषें म्हणावें ।
हरी चिंतनीं अन्न सेवीत जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ २९ ॥

नये राम वाणीं तया थोर हानी
जनीं व्यर्थ प्राणी न ज्या नाम कर्णीं।
हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं
बहू आगळी बोलिली वेदवाणी ॥ ३० ॥

नको वीट मानूं रघूनायकाचा
अती आदरें बोलिजे राम वाचा।
न वेंचे मुखीं सांपडे रे फुकाचा
करा घोष त्या जानकीवल्लभाचा ॥ ३१ ॥

मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची
अहंतागुणें यातना ते फुकाची।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा
म्हणोनि म्हणा रे म्हणा देवराणा ॥ ३२ ॥

यथासांग रे कर्म तेंही घडेना
घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना।
दया पाहतां सर्व भूतीं असेना
फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥ ३३ ॥

क्रियेवीण नानापरी बोलिजेतें
परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें।
मना कल्पना धीट सैराट धांवे
तया मानवा देव कैसेनि पावे ॥ ३४ ॥

विवेकें क्रिया आपुली पालटावी
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी।
जगीं बोलण्यासारिखें चाल बापा
मनीं कल्पना सोड संसारतापा ॥ ३५ ॥

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारीं
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ३६ ॥

विचारूनि बोले विवंचूनि चाले
तयाचेनि संतप्त तेही निवाले ।
बरें शोधल्यावीण बोलों नये हो
जनीं बोलणें शुद्ध नेमस्त राहो ॥ ३७ ॥

हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी
जेथें मानसीं स्थापिलें निश्चयासी ।
तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे
तया भाषणें नष्ट संदेह मोडे ॥ ३८ ॥

नसे गर्व अंगीं सदा वीतरागी
क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी ।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा
इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥ ३९ ॥

जया मानला देव तो पूजिताहे
परी देव शोधोनि कोणी न पाहे ।
जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी
जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥ ४० ॥

तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले
तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरिलासे
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥ ४१ ॥

गुरू पाहतां लक्ष कोट्यानुकोटी
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।
मना कल्पना चेटके घातपाता
जनीं व्यर्थरे तो नव्हे मुक्तिदाता ॥ ४२ ॥

नव्हे वाउगी चावटी काम पोटीं
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।
मुखीं बोलल्यासारखें चालताहे
मना सद्गुरू तोचि शोधोनि पाहें ॥ ४३ ॥

जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ।
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे
तयाचेनि योगें समाधान बाणे ॥ ४४ ॥

मना संग हा सर्व सोडोनि द्यावा
अती आदरें सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगें महादुःख भंगे
जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥ ४५ ॥

मना सज्जना हीत माझें करावें
रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।
महाराज तो स्वामि वायूसुताचा
जनां उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥ ४६ ॥

न जायें जपासी न जायें तपासी
न जायेंचि काशी न जायें गयेसी ।
हरीचिंतनेवीण कोठें न जायें
त्रिकाळीं सदा पाय तूं तेचि पाहे ॥ ४७ ॥

फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे
दिसंदिस अभ्यंतरीं गर्व साचे ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
विचारी मना तूंचि शोधूनि पाहें ॥ ४८ ॥
मना गूजरे तूजला प्राप्त झालें
परी पाहिजे अंतरीं यत्न केले ।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी
धरीं संगती सज्जनीं धन्य होसी ॥ ४९ ॥

---

# भाग दुसरा.

## भाषाविषयक वेंचे.

## पहिली ( कच्ची ).

### कुशलवाख्यान.

तें यज्ञकंकण करांबुजिं राघवातें ॥
शत्रुघ्न ते भरत बांधिति नीजहातें ॥
सोडूनि भूमिवरि त्या मग श्यामकर्णा ॥
झांकी रवी नयन देखुनि कांतिवर्णा ॥ १ ॥

श्रीराम वंदुनि सहोदर ते निघाले ॥
वाजीं गजारुढ रथीं दळभार चाले ॥
पादाति चालति नव्हे गणना तयाची ॥
कीं काढिली वरुनि कांति हिमालयाची ॥ २ ॥

तो श्यामकर्ण मग चालतसे पुढारां ॥
मागूनि सैन्यरज पाडित अंधकारा ॥
सोडूनियां चमु तुरंगम तेजराशी ॥
आला त्वरेंकरुनि वाल्मिकि-आश्रमासी ॥ ३ ॥

क्रीडा तिथें करितसे लहु बाळवेशें ॥
गेला असे वनफळां कुश तो अवेशें ॥
त्या बाळकाजवळ अग्रज तो नसोनि ॥
पाहे हयासि मन निर्भय तें करोनी ॥ ४ ॥

अश्व देखतांचि बाळकासि चोज वाटलें ॥
रुक्मरत्नभूषणीं म्हणे कसें सुशोभलें ॥

ते क्षणींच देखिली शिरीं सुवर्णपात्रिका ॥
पाहि बाळ वाचुनी बहुत अर्थ नेटका ॥ ५ ॥
सूर्यवंशि राघवेंचि हा तुरंग सोडिला ॥
यासि जो धरी बळें नृपांत वीर आगळा ॥
सैन्य हें करील युद्ध सोडिना तयावरी ॥
मीच राम येउनी करीन शत्रुमोहरी ॥ ६ ॥

पत्रिकार्थ पाहुनी लहूकुमार हांसला ॥
सोडुनी करांबुजें चुरा करोनि टाकिला ॥
अश्वकंठिंची करें सुरम्य माळ काढिली ॥
जानकीसुनंदनें गळ्यांत शीघ्र घातली ॥ ७ ॥

तुरंगकंठ वेष्टुनी सुरम्यवस्त्रपल्लवें ॥
कर्दळीवनांत आणुनी तयासि गौरवें ॥
बांधुनी रणांगणांत संगराशि ठाकला ॥
अश्व तो न देखतांचि सैन्यभार लोटला ॥ ८ ॥
अश्वरक्षपाळ येउनी कुमार पाहती ॥
चाप सज्जुनी उभा लहान फार आकृती ॥
दीसतो कुमार हा जसा सकाळचा रवी ॥
धाकुटा परंतु हावभाव फार दाखवी ॥ ९ ॥

एक जाउनी सांगती सिते ॥ अनर्थ मांडिला तूझिया सुतें ॥
कर्दळीवनीं अश्व बांधिला ॥ त्या निमित्त सैन्यभार लोटला ॥ १०
प्रार्थिलें अम्हीं बाळकोत्तमा ॥ देइं सोडूनी या तुरंगमा ॥
नायकेच तो हट्ट मांडिला ॥ चाप सज्जुनी बाण लाविला ॥ ११ ॥
येणें का उगें हयासि बांधिलें ॥ रावणारिशीं वैर लाविलें ॥
सैन्य येउनी लुटिल आश्रमा ॥ नारि बाळकें पावती श्रमा ॥ १२ ॥

तुम्हिच बांधिला अश्व तो जरी ॥ सैन्य येउनी करिल बोहरी ॥
कासयास तूं येथ आलिशी ॥ सर्व तापसां काय भोंवशी ॥ १३ ॥
आश्रमीं महाऽकांत वर्तला ॥ एक बोलती येथुनी चला ॥
त्यावरी सुबुद्धिवंत बोलती ॥ सर्व आयका आमची मती ॥ १४ ॥
देऊं त्यां करीं हीं तिघेजणें ॥ निर्भयें मठीं तुम्हिच राहणें ॥
बोलिली सिता बहुत हें निकें ॥ द्या तुम्ही आम्हां धरुनि हस्तकें ॥ १५ ॥
रुदन ते करितसे जनकात्मजा ॥ कुमति हे उपजली काशि आत्मजा ॥
तुरग बांधुनि जिवावरि ऊठला ॥ पडतसे जननि होउनि व्याकुला ॥ १६ ॥
दीर्घ रोदन वनीं लहु आयके ॥ कोण गांजित असे मम अंबिके ॥
तीक्ष्ण सायक शिरीं धनु तें करीं ॥ येउनी नमुनि प्रार्थित सुंदरी ॥ १७ ॥
कासया धरियला हय तो तुवां ॥ काय होय न कळे तुझिया जिवा ॥
येरु वीनवी तुझा सुत मी जरी ॥ सैन्य कां करि न संगरिं बोहरी ॥ १८ ॥
आत्मजें जननिशी समजावुनि ॥ सैन्य बाहिर असे मठ वेष्टुनी ॥
अश्व हिंसति बळें घनगर्जना ॥ किंकळ्या द्विरद फोडिती आनना ॥ १९ ॥
एक गजावरि एक हयावरि एक रथावरि बैसुनि आले ॥
घालुनियां कवचें धरुनियां बरच्या करिं सेवक पेलिति भाले ॥
गर्जति वीर धुधाटसमीरण ते रणधीर उतावीळ झाले ॥
वस्त्र सवारुनि शस्त्र विकल्पुनि अस्त्रहि मंत्रुनि युद्धिं निघाले ॥ २० ॥
दुंबळ सैन्य विलोकुनियां लहुशीं मग तो मुनि वाल्मिकि बोले ॥
हें चमु फार लहू ! सुकुमार तुं राहिं उगा तुजलागिं न तोले ॥
येरु वदे चमु मारिन आज ऋषी ! तुमचे निववीन मि डोळे ॥
ऐकुनि शब्द ऋषी मग स्तब्धचि होउनियां हृदयांतरि डोले ॥ २१ ॥
वंदुनियां ऋषिमायपदांबुज वोढुनि कार्मुक बाहिर नीघे ॥
सैन्यसमुद्र विलोकुनि दृष्टिस भूतनुपासुनि धांवत वेगें ॥

छेदितसे परवीरशिरें उडवी नभिं सोडुनि बाण अमोघे ॥
येरिकडे चमुमाजि उतावीळ दाशरथी निघडे रणिं दोघे ॥ २२ ॥
देखुनियां अति मार दयाकुळ वाल्मिकि सांगतसे लहुवातें ॥
सन्निध साह्य नसे कुश तो तुज यास्तव सोडुनि दे तुरगातें ॥
येरु म्हणे मज साह्य कृपा तुमची मग काय असे भय मातें ॥
धन्य म्हणे ऋषि जानकिच्या कुशीं जिंकुनि ये रिपुशी निजहातें ॥ २३ ॥
बोलतसे शुभवाक्य ऋषीश्वर हो विजयी रणिं तूं लहुबाळा ! ॥
त्यावरि युद्ध करी समरांगणिं पाहतसे भरतानुज डोळां ॥
प्रेरुनियां रथ गर्जतसे म्हणे हे मज दाविशि कौतुक काळा ॥
खेळशि अग्निसवें लहु ! केवि तुं वोढिसि पुच्छ धरूनि सुव्याळा ॥ २४ ॥
बोले लहू त्या भरतानुजासी ॥ मी धाकुटा अद्भुत रे तुम्हांसीं ॥
भक्षी जसा तो वडवाग्नि सिंधू ॥ कीं तो करी हस्ति अगस्ति बिंदू ॥२५ ॥
द्रोणाद्रि कैसा हनुमंत आणी ॥ पायें जगा वामन तो उमाणी ॥
न मानणें अंबरिं सूक्ष्म भानू ॥ अन्यत्र गाईसम कामधेनू ॥ २६ ॥
ऐकोनि शब्द त्याचे मग निजहृदयीं काय शत्रुघ्न बोले ॥
पृथ्वीमाजी दिसेना लहुसम परि हा मीपणें फार डोले ॥
शिक्षा मी यासि लावूं परि लघु मुल हें काय होईल कीर्ति ॥
यालागीं स्तब्ध झाला मग लहु उठला संगरा शूरमूर्ति ॥ २७ ॥
सांभाळीं बाण माझा मग रघुपतिचें नाम गर्जोनि कर्णीं ॥
वोढूनि सोडि तेव्हां गगन गडगडी जेविं वीजा सुवर्णी ॥
जाती झांकूनि डोळे पडति हय तळीं वीर मूर्च्छीत यानें ॥
शत्रुघ्ना थोर चिंता मृतिसमयिं म्हणे रक्षिजे राघवानें ॥ २८ ॥
झाले कोट्यान कोटी नाभिं महिवरूनी बाण एक्या शराचे ॥
जैशा त्या मेघधारा वरुषति अवनी, प्राण घेती परांचे ॥

शत्रुघ्नें धैर्य चित्तीं धरुनि म्हणितलें थोर हा वीरराणा ॥
मोठी या साध्य विद्या; अति गुणपुरता हे गती नाहिं कोणा ॥ २९ ॥

आता या पाठि देऊं निजमुख फिरवूं अग्रजा काय दावूं ॥
मारूं हा तीव्र बाणें जरि मज न मरे संगराशीं समाऊं ॥
तेव्हां तो बाण सोडी गगन परवडी जाहले लक्ष कोडी ॥
देखोनी जानकीचा तनय भुजबळें बाण बाणेंचि तोडी ॥ ३० ॥

असंख्या बाणांचें करुनि तुकडे पाडित शरें ॥
तळीं भेदीं वीरां गगनिं उडवी तो किती शिरें ॥
कृतघ्नें शत्रुघ्नें प्रबल रिपु पाहोनि नयनीं ॥
निमंत्री मार्तंडास्त्रहि मग धनुष्या चढवुनी ॥ ३१ ॥

त्यजीं त्या अस्त्रातें मग रवि नभीं कोटि दिसती ॥
लहू तैं मेघास्त्रा त्यजि दिनमणी सर्व लपती ॥
बुझाले ते भानू न दिसति कदा अभ्रपटलीं ॥
प्रसंगें शत्रुघ्ना कुतुहल दिसे नेत्रकमळीं ॥ ३२ ॥
अवेशें शत्रुघ्नें समरिं मग मोहास्त्र त्यजिलें ॥
लहूनें तें दृष्टी समुख निरखोनी न गणिलें ॥
मुखीं श्रीरामाचें स्मरण करितां मौन्याचि पडे ॥
न चाले अस्त्राचें सकळ बळ भूसापरि उडे ॥ ३३ ॥
सुचिंता शत्रुघ्ना हृदयीं पडली त्याशि बघतां ॥
विलोकोनी बंधू भरत मग बोले नृपसुता ॥
त्यजीं निर्वाणास्त्रा अजुनि नयनीं काय बघसी ॥
रिपू हा नाटोपे यश मज गमे तूं न पवशी ॥ ३४ ॥
निमंत्री शैलास्त्रा त्यजित मग शत्रुघ्न समरीं ॥
म्हणे वीरा ! आतां समरिं न पळें संगर करीं ॥

निघे तों गर्जोनि धरणिनभ व्यापूनि भरलें ॥
कुमारें देखोनी त्यजुनि शर मध्येंच खुडिलें ॥ ३५ ॥
साध्य ज्या असति छत्तिस विद्या ॥ केविं बांधिल तयासि अविद्या ॥
शस्त्र अस्त्र न चले मग बुध्या ॥ तो करीं करुं म्हणे मल्युद्धा ॥ ३६ ॥
ते करें धरिति हस्तक वोढुनी ॥ पाडिति मग परस्पर मेदिनी ॥
लाविती रग बहू करपंकजीं ॥ हाणिती दुरुनि धांवुनियां भुजीं ॥ ३७ ॥
लहु लघू दशरथात्मज मोठा ॥ फिरुनि जाउनि धरी करिं पोटा ॥
उचलुनी मग रथावरि घाली ॥ सकळही चमु सुशीघ्र निघाली ॥ ३८ ॥
हर्ष मानिति नृपात्मज दोघे ॥ जाहलों म्हणती आजि अमोघे ॥
घेउनी निघति राघवपुत्रा ॥ चालली निजपुरा चमुयात्रा ॥ ३९ ॥

**अनंत.**

---

## दिवाळी.

विश्वेशें करुनी कृपा सकरुणें दुष्काळ दैत्यावरी ॥
पर्जन्यास्त्र नियोजुनी पळविलीं आहेत दुःखें दुरी ॥
आतां मंगल पातले दिवसही दीपोत्सवाचे भले ॥
गाणें सुस्वर पाहिजे तर तुवां हे शारदे गाइलें ॥ १ ॥
दीनें ज्यांविण वाटतात सुदिनें साऱ्याहि वर्षांतलीं ॥
नांवानें जरि दुर्दिनें, सुखद जीं होती पुढें चांगलीं ॥
तीं येऊन बरींच, वृष्टि करुनी त्यांहीं दिली भूवरी ॥
तेणें सांप्रत पाहतां दिसतसे सृष्टी अहा साजिरी ॥ २ ॥
सस्यांचा बरवा अनर्घ्य हिरवा शालू असे नेसली ॥
जाईची जुइची गळां धरितसे जी रम्य पुष्पावली ॥
ती भाळीं तिलकांकिता शशिमुखी आतां शरत्सुंदरी ॥
माथां लेउनि केवडा विचरते घेऊनि पद्में करीं ॥ ३ ॥
जो गोपाल गमे प्रभातसमयीं गाई वनीं चारितां ॥
वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यास जो अर्पितां ॥

जो भासे दिवसा कृषीवल शिरीं खोंवूनियां लोंबरें ॥
तो आतां ऋतु शारदीय बहुधा शेतांतुनी संचरे ॥ ४ ॥

राजा जो धनधान्यदायक असे साचा कुबेरापरी ॥
त्या श्रीमंडित शारदीय ऋतुची राणी दिवाळी खरी ॥
रूपैश्वर्यगुणाढ्य ती जवळ ये; द्याया तिला स्वागता ॥
सारेही शुभ योजनांत गढले — कांहीं नुरो न्यूनता ॥ ५ ॥

भिंती रंगविल्या नव्या, फिरुनियां केलीं नवीं अंगणें ॥
वीथी झाडुनि, रान काढुनि, दिसे सर्वत्र केराविणें ॥
दारीं उंच दिले दिवे चढवुनी, हंड्या घरीं लाविल्या, ॥
लोकीं शक्त्यनुरूप आत्मसदनीं भूषा नव्या जोडिल्या ॥ ६ ॥

बाजारांत जमाव फार मिळुनी गर्दी उडाली असे ॥
गंध्याला निजसंग्रहास विकितां विश्राम कांहीं नसे ॥
उंची कापड, दागिने सुबकही, मेवे, फटाके चिनी, ॥
यांचा विक्रय होतसे धडकुनी — वस्तू न चाले जुनी ॥ ७ ॥

माहेराप्रत कन्यका स्मितमुखी उत्कंठिता पातल्या ॥
त्या मातापितरां सहर्ष दुहिता, भावां स्वसा भेटल्या ॥
आले सांप्रत भेटण्यास वडिलां दूरस्थ ते पुत्रही ॥
सोहाळे श्वशुरालयीं अनुभवूं आले नवे जांवई ॥ ८ ॥

बाळांहीं निजपुस्तकांस अवघ्या आहे दिलेली रजा ॥
कांहीं काढुनि खेळ नाचुनि मुलें तीं मारितातीं मजा ॥
तों गेहामधुनी खमंग निघुनी ये वास, तेणें उगीं ॥
तीं होऊन, हळूच आंत शिरतीं "दे माउली वानगी" ॥ ९ ॥

आतां भौमचतुर्दशी पुढलिया वारीं असे पातली ॥
तों रात्रीं निजतां बनी छबकुली मातेप्रती बोलली ॥

"माला आइ उर्थीव लौकल वलें, अंगास मी लाविन ॥
दादाच्या, म्हनुनी गळे ! उथव्र तूं हांका मळा मालुन" ॥ १० ॥

सारेही पहिल्या दिनीं उठुनियां मोठ्या पहाटे जन ॥
स्नानें मंगल लौकरी उरकिती सौगन्धिकें चर्चुन ॥
ज्या ठायीं असती दिवाळसण ते तेथून वाद्यें पहा ॥
निद्रेंतून दिवाळिला उठविण्या तीं वाजताती अहा ॥ ११ ॥

त्यांच्या मंजुरवें न जागृत क्षणीं होईल ती वाटलें ॥
यालागीं शिलगावुनी जणुं गमे देती फटाके मुलें ॥
"ठो ठो" आणिक "फाड फाड" उठती तों नाद अभ्यंतरीं ॥
त्यांहीं सत्वर जाहली हंसत ती जागी दिवाळी पुरीं ॥ १२ ॥

रांगोळ्या रमणीय काढुनि पहा, त्या मांडल्या पंगती ॥
पक्वान्नें कदलीदलांवरि अहा नेत्रांस संतोषिती ॥
पाटांच्या मधुनी जलार्थ असती पात्रें रुप्याचीं, तिथें ॥
नेसूनी जन मोलवान वसनें होतात कीं बैसते ॥ १३ ॥

घेऊनी घृत, दुग्ध तें, विपुल तें गोधूमही साखर ॥
प्रेमानें महिलाजनीं बनविलीं खाद्यें किती सुंदर ॥
त्यांची सांप्रत रेलचेल अगदीं पात्रांत जी होतसे ॥
तुष्टी आणिक पुष्टि ती वितरुनी प्रीती दुणावीतसे ॥ १४ ॥

रांगोळ्या दिसती प्रदोषसमयीं दारांपुढें काढिल्या ॥
दीपांच्या सदनांपुढें उजळुनी पंक्ती तशा लाविल्या ॥
त्यांच्या ज्योति असंख्य त्या बघुनियां वाटे असें अंतरीं ॥
तारा या गगनांतुनी उतरल्या कीं काय भूमीवरी ॥ १५ ॥

बाळें सर्व फटाकड्या उडविती चित्तांत आनन्दुनी ॥
जाडे बारहि लाविती, धडधडा त्यांचा उठे तो ध्वनी ॥

मोठे बाणहि, चंद्रज्योति मधुनी, त्या फूलबाज्या, नळे, ॥
दारू–काम असें अनेकविध तें दृष्टी पडे लाविलें ॥ १६ ॥
लक्ष्मीपूजन तें द्वितीय दिवशीं रात्रौ जधीं होतसे ॥
सोनें आणि वह्या धनीजन तधीं मांडून अर्चीतसे ॥
साध्याला विसरूनि लोक धरिती भक्ती कसे साधनीं ॥
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तांत तें पाहुनी ॥ १७ ॥
आतां भार नसे कुणास, पण तो शिक्यांस भारी असे ॥
हातां काम नसे, परंतु पडतें तोंडास तें फारसें ॥
कोणा मार नसे, तरी पण शिरीं तो सोंगव्यांच्या बसे ॥
कोणा त्रास नसे, परंतु नयनां तो जागरें होतसे ॥ १८ ॥
भ्राते ते भगिनीगृहांप्रत सुखें जाती बिजेच्या दिनीं ॥
त्यांचा बेत सुरेख ठेवुनि तयां ओंवाळिती भामिनी ॥
तेही त्यांस उदार होउनि मनीं ओंवाळणी घालिती ॥
प्रेमग्रंथिस दार्ढ्य बन्धुभगिनी या वासरीं आणिती ॥ १९ ॥
खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि, वा खेळणें, ॥
जस ज्यांस रुचेल त्यापरि तुम्ही या उत्सवीं वागणें ॥
मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी ॥
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी ॥ २० ॥

"केशवसुत."

# पहिली ( पक्की ).

## भरतभाव.

मग भरत वसिष्ठें आणिला जों अयोध्ये ॥
नगरि गतधवा तों आणि निर्वीर्य योद्धे ॥
जन मृतसम देखे हेतु कांहीं कळेना ॥
जननिकृत कुचेष्टा बुद्धितें आकळेना ॥ १ ॥

वृत्तांत सांगे भरतासि माय ॥ स्वानंद जीचा त्रिजगीं न माय ॥
भेदूनि वक्षःस्थल शब्द तीचा ॥ करी महाक्षोभ महामतीचा ॥ २ ॥
वना धाडिलें जेधवां रामराया ॥ तुवां हेतु केला स्वभर्ता मराया ॥
अहा, रामसीता अशा दंपतींतें ॥ वना धाडिलें, मारिलें कां पतीतें ॥ ३ ॥
धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे ॥ कौसल्येच्या ये गृहा सानुरागें ॥
त्यातें देखे जेधवां रामराय ॥ श्रीरामाचा शोक लोकीं न माय ॥ ४ ॥
मोकळा करुनि कंठ तेधवां ॥ आठवूनि मनिं जानकीधवा ॥
ते रडे भरतही तसा रडे ॥ जोंवरी नयन होती कोरडे ॥ ५ ॥
म्हणे वासरा घात झाला असारे ॥ तुझ्या माउलीचेच हे खेळ सारे ॥
वृथा धाडिला राम माझा वनासी ॥ न देखों शके त्या जगज्जीवनासी ॥ ६ ॥
अरे राघवें व्यापिले लोक सारे ॥ तरी नावरे शोक माझा कसा रे ॥
तृषाक्रांत डोळे घनश्याम रामा ॥ पहायास रे सर्वलोकाभिरामा ॥ ७ ॥
जानकी जनकराजकुमारी ॥ पाय कोमळ जिचे, सुकुमारी ॥
चालली जसि वना अनवाणी ॥ बोलली कटकटा जनवाणी ॥ ८ ॥
भरत शोक अनेक तिचे असे ॥ परिसतां मग बोलत तो असे ॥
जननि गोष्टि समस्तहि हे खरी ॥ परिस येविषयीं मम वैखरी ॥ ९ ॥
मी ब्रह्महत्याशतपाप लाहें ॥ ठावें असे लेश जरी मला हें ॥
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें ॥ वधीं जरी ठाउक हें मतीतें ॥ १० ॥

म्हणे राममाता अरे वासरा मी ॥ तुझा जाणतें प्रेम-उल्हास रामीं ॥
तुला रामसेवेविणें काम नाहीं ॥ न राज्यादिकांची जया कामनाही ॥ ११ ॥
तों वसिष्ठ वदला भरतातें ॥ रामपादनिजलाभरतातें ॥
पाळिं यावरि समस्त धरा हे ॥ राजनीतिकरिं, सावध राहें ॥ १२ ॥

रायें तुतेंचि दिधलें स्वनृपासना रे ॥
संपूर्ण तूं जननिची करिं वासना रे ॥
शव्दार्थ हे न कळती गुरुलाघवाचे ॥
साचे म्हणूनि पद आठवि राघवाचे ॥ १३ ॥

## घनाक्षरी

म्हणे भरत हा राम ॥ त्राहे त्राहे मेघश्याम ॥
वसिष्ठ हा गुरु नाम ॥ तोही मज कोपला ॥ १ ॥
अंतरले तुझे पाय ॥ तया राज्याचे उपाय ॥
सांगे मज हाय हाय ॥ नव्हे गुरु आपला ॥ २ ॥
अग्नितुल्य वाटे राज्य ॥ मज जाळिल सामराज्य ॥
वरी ऋषी घाली आज्य ॥ त्याणें जीव तापला ॥ ३ ॥
दावीं सत्वर चरण ॥ किंवा स्वामी दे मरण ॥
तुझ्या नामाचें स्मरण ॥ त्याचा भव संपला ॥ ४ ॥ १४ ॥

स्मरोनि ऐसें रघुनंदनातें ॥ त्या राघवाच्या पदवंदनातें ॥
जावें असा भाव धरूनि साच ॥ बोले वसिष्ठाप्रतिही तसाच ॥ १५ ॥

राजाधिराज रघुराजचि एक जाणा ॥
पाहों चला सकळ जाउनि त्या सुजाणा ॥
आम्ही समस्त जन किंकर राघवाचे ॥
जे रामनाम जपतों अजि नित्य वाचे ॥ १६ ॥

विना राक्षसीकैकयी काननातें ॥ चला सर्व पाहूं मृगांकाननातें ॥
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें ॥ न येतां समर्पूं शरीरें स्वहातें ॥ १७ ॥

येणार ते या अथवा नका ही ॥ राहेन मी हें न घडेचि कांहीं ॥
बोलेनियां स्पष्टचि चालिला हो ॥ शोकांत ही घे प्रभुनामलाहो ॥ १८ ॥
हा राम हा राम असेंचि वाचे ॥ चित्तांत पाय प्रभु राघवाचे ॥
त्यजी कुलाचार्यहि रामवाटे ॥ कीं तो गुरु त्यास गुरू न वाटे ॥ १९ ॥
तो बाप जो राघवभक्ति दावी ॥ तसीच जे मायहि ते वदावी ॥
जो राम दावी गुरु तोचि साच ॥ श्रुत्यर्थ-इत्यर्थ असे असाच ॥ २० ॥
वसिष्ठ घे राज्य म्हणेचि साच ॥ परंतु भावार्थ नव्हे तसाच ॥
त्याच्या परीक्षार्थचि बोलिला हो ॥ त्याहूनि आधीं मुनि चालिला हो ॥२१॥
वसिष्ठ, तो, आणि समस्त माया ॥ रामार्थ टाकूनि समग्र माया ॥
सेना प्रजा सर्वहि त्याच वेळे ॥ जाती, जसे लंघिती सिंधु वेळे ॥ २२ ॥

पायीं निघे भरत सानुज रामवाटे ॥
रामाविणें इतर इष्ट न काम वाटे ॥
माथां जटा मुकुट, वल्कल नेसला हो ॥
श्रीरामवेष, वदनीं प्रभुनामलाहो ॥ २३ ॥

रामवल्कलजटादिकरीती ॥ वेष तो उभय बंधु करीती ॥
राम सानुज तसें भरतातें ॥ देखती सकळ रामरतातें ॥ २४ ॥
पादचिन्हित तये वसुधेतें ॥ देखतां तृषित जेविं सुधेतें ॥
रामचंद्रपदसारसमुद्रा ॥ वाढवी भरतसौख्यसमुद्रा ॥ २५ ॥

घालूनि घे भरत देखुनि त्या रजातें ॥
शत्रुघ्नही अनुसरोनि निजाग्रजातें ॥
चित्तीं स्मरे प्रभुचिया पदनीरजातें ॥
प्रेमप्रवाह नयनीं सुखनीर ज्या तें ॥ २६ ॥

भरत पदरजीं त्या घोळला दीर्घ काळ ॥
त्रिभुवनिं हि सुखाचा होय तेव्हां सुकाळ ॥

न मिळती पदरेणू जे विरिंच्यादिकांही ॥
सुलभ मज म्हणे हें भाग्य माझेंचि कांहीं ॥ २७ ॥

वाम-अंकगत भूमिकुमारी ॥ वामबाहुसुरता सुकुमारी ॥
वल्कलांबरजटा-अभिरामा ॥ देखतो भरत त्या अभिरामा ॥ २८ ॥

दूर्वादलश्यामल दीप्ति देहीं ॥ सेवी पदें लक्ष्मण तो विदेही ॥
गंगातटीं सेवित मंदवातें ॥ देखे अशा श्रीरघुपुंगवातें ॥ २९ ॥

मांडिये उपरि बैसविला हो ॥ अश्रुनीर पुसि, दे सुखलाहो ॥
वासरा न रड, सांग सुवार्ता ॥ शब्द हा निववि, दुःखदवार्ता ॥ ३० ॥

तों देखिला गुरु वसिष्ठ तयासि वंदी ॥
ब्रह्मण्य देव जडला चरणारविंदीं ॥
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो ॥
भेटोनियां तिघिहि सत्वर सेविल्या हो ॥ ३१ ॥

पिता सुखी कीं म्हणतांचि रामा ॥ रडोनि त्या सांगति सूपरामा ॥
रडे अहो रामहि लोकरीती ॥ स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ॥ ३२ ॥

सपिंडीक्रिया राम गंगातटाकीं ॥ करी, आणि ते पिंड गंगेंत टाकी ॥
रडे लोकदृष्टीस शोकश्रमातें ॥ प्रभू दाउनी ये पुन्हा आश्रमातें ॥ ३३ ॥

तों वदे भरत गोष्टि मनाची ॥ प्रार्थना बहुत आगमनाची ॥
मांडिली, परि न राघव मानी ॥ देखतां सुरवरांस विमानीं ॥ ३४ ॥

आज्ञा पित्याची मज मोडवेना ॥ वत्सा तुझी गोष्टहि तोडवेना ॥
घालूं नको बा मज संकटांत ॥ नको पडों या सहसा हटांत ॥ ३५ ॥

असी आयके जेधवां रामवाणी ॥ मुखश्री करी बंधु तो दीनवाणी ॥
म्हणे तात-आज्ञा मृगांकानना रे ॥ मला सांग जाईन मी कानना रे ॥ ३६ ॥

बापा ऐसें वर्ततां तों विशेषें ॥ आज्ञाभंग प्राप्त दोघां अशेषें ॥
एवं राज्यातें तुवां रे भजावें ॥ ताताज्ञेनें कानना म्यांच जावें ॥ ३७ ॥

येना असें भरत देखुनि रामराया ॥
गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया ॥
पाहे वसिष्ठमुनिवक्त्रसरोरुहातें ॥
श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्वहातें ॥ ३८ ॥
कीं सांग गुह्य अवतारचरित्र याला ॥
जें तारितें चहुं युगांत जगत्रयाला ॥
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनियां ॥
कां प्राण टाकिसि म्हणे समजावुनीयां ॥ ३९ ॥
हा राम मारील दशाननासी ॥ यालागिं जातो प्रभु काननासी ॥
नको निवारूं भरता तयाला ॥ ब्रह्मादिकांच्या पददातयाला ॥ ४० ॥
हें आयकोनि जरि शोकहि दूर केला ॥
प्रत्यक्ष दर्शनसुखास बहू भुकेला ॥
तेव्हां उठोनि भरतें पदवंदनातें ॥
केलें, दुरूनि म्हणतो रघुनंदनातें ॥ ४१ ॥
देखोनियां गमननिग्रह राघवाचा ॥
बोले उभा भरत निश्चयरूप वाचा ॥
वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा ॥
त्यानंतरें त्यजिन यास निरोप दे हा ॥ ४२ ॥
वर्षें चतुर्दशहि रक्षिन शासनातें ॥
अंगीकरीन न बसेन नृपासनातें ॥
सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी ॥
पूजीन तों तत्र पदांबुजलाभकामी ॥ ४३ ॥
पादुका जडित आणुनि हातें ॥ रामचंद्रचरणांबुरुहांतें ॥
लावुनी निजशिरीं भरतानें ॥ वंदिल्या रघुवरांघ्रिरतानें ॥ ४४ ॥

**वामनपंडित.**

---

## कवींस.

न या जगीं मृत्यु कवी तुम्हांला ॥ त्यजूनियां हा जरि लोक गेलां ॥
वाटे मला मी जरि हो अजाण ॥ आत्मे तुम्हांला असतात दोन ॥ १ ॥

पृथ्वीतलीं त्यांतिल एक राहे ॥ स्वर्गीं दुजा दिव्य विशाल पाहे ॥
शोभा नरां जी इतरां दिसेना ॥ असूनिही दृष्टि नसे तयांनां ॥ २

कधीं बसाना कविराज शांत ॥ साधूनियां स्वार्थच एक फक्त ॥
शोभा जशी दिव्य तुम्ही पहातां ॥ जनां तशी वर्णुनि दाखवीतां ॥ ३ ॥

स्वर्गांतला पाहत सर्व गोल ॥ ज्यांनीं असे हा भरला खगोल ॥
सभेंत ज्या बैसति शक्र, सूर्य ॥ त्या तत्प्रवेशीं नच अंतराय ॥ ४ ॥

ऐके सदा गायन किन्नरांचें ॥ सौंदर्यही पाहत अप्सरांचें ॥
वक्तृत्व ऐकोनि बृहस्पतींचें ॥ पुन्हा वदे तें मनुजां स्ववाचे ॥ ५ ॥

यांच्याहूनी सुंदर फार गोष्टी ॥ आत्मा दुजा पाहत भूमिपृष्ठीं ॥
त्या कल्पनेच्या कृति भासताती ॥ दृष्टीपुढें या परि सर्व होती ॥ ६ ॥

माता कशी ते ममता करीते ॥ पिता कसा लालन पालनातें ॥
मुलें फुलें हीं कशिं हांसताती ॥ वेली मुली या किती हालताती ॥ ७ ॥

खेळें कसें बाल्य निघून जाई ॥ तारुण्य आनंद विलास यांहीं ॥
दुःखें कशीं जाचिति वर्णुनी तें ॥ नेत्रीं जनांच्या जल आणितां तें ॥ ८ ॥

स्वार्थीं कसें लावुनि सर्व चित्त ॥ कितीक संपादिति फार वित्त ॥
परार्थ अर्पी परि देह कोणी ॥ त्याची जनां ओळख द्या करूनी ॥ ९ ॥

विपत्तिचे क्लेश कसे मनाला ॥ जाळूनियां जाचिति या जनाला ॥
तें वर्णुनी पाझर हो दयेचा ॥ आणा तुम्ही सत्य हृदीं नराच्या ॥ १० ॥

दुःखी जनां धीर अपार देतां ॥ तैशीच द्या शांतिहि तप्त चित्ता ॥
कां संकटें ओढवती कुमार्गीं ॥ नेतां जनां दावुनि तें सुमार्गीं ॥ ११ ॥

तुम्हांहुनी या जगतांत कोणी ॥ मी " श्रेष्ठ ऐसा " दुसरा न मानी ॥
केला पदीं नम्र म्हणोनि माथा ॥ आश्वासुनी धन्य करा अनाथा ॥ १२ ॥

" मार्गण "

---

## साऱ्या जगांत फुलेंच फुलें.

आकाशांत फुलें धरेवर फुलें वाऱ्यावरीही फुलें ॥
माझ्या गेहिं फुलें मनांतहि फुलें भूगर्भि सारीं फुलें ॥
माझें चित्त भुले सुगंधित भलें हें विश्व हो जाहलें ॥
कोणाला कळलें किती पसरलें उद्यान हें शोभलें ॥ १ ॥
नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी हीं जरी ॥
नांवें भिन्न, तरी फुलें सकल हीं रूपें निराळीं तरी ॥
घेतों यांतुन थोडका रस पुन्हा त्याच्याकडे धांवतों ॥
देवाला स्तवितों सदा भ्रमर मी पुष्पांमधें राहतों ॥ २ ॥
जातीच्या भ्रमरास " सोडुन फुलें ये फोड हीं लांकडें " ॥
ऐसें कोण म्हणेल, कोण भलतें घालील हें सांकडें ॥
देवानेंच जयास पुष्पहृदयीं खेळावया निर्मिलें ॥
त्याला अन्य कृती रुचेल कुठुनी प्राणा जरी घेतले ॥ ३ ॥
बोला "चंचल, हा क्षणांत गगनीं धांवे क्षणें भूत्ररी ॥
ठायीं एक कदापि हा न वसतो, ही वृत्ति नाहीं बरी " ॥
हांसा मानुनियां निरर्थ मम हो या गोड गुंजारवा ॥
विश्वेशा स्मरुनी फुलांत रमतों, भीतों न मी मानवा ॥ ४ ॥

फुलवितो अवघ्याच जगाप्रती ॥
मज गमे मजसाठिं जगत्पती ॥
मज-समान रसज्ञ नसे कवी ॥
भ्रमर मी रस चाखुन सांठवी ॥ ५ ॥

जाइन सोडुन या जगताला ॥
ठेवुन हा मधुकोश तुम्हांला ॥
दिव्य मला भ्रमरा सुविलोला ॥
स्वर्गि मिळेल नवी सुममाला ॥ ६ ॥

**नारायण वामन टिळक.**

# दुसरी ( कच्ची ).

## गुलाबाचें फूल.

आमोद तूझा कारि चित्त दंग ॥ सौंदर्य साक्षात् तव अंग-रंग ॥
तो पारिजातद्रुम वंदनातें ॥ करील नेतां तुज नंदनातें ॥ १ ॥
परंतु दीना सुमना गुलाबा ॥ सौंदर्य वैरी ठरलें तुला बा ॥
तदर्थ तूतें खुडिलें नरांनीं ॥ लवोनियां तीक्ष्ण नखीं पराणी ॥ २ ॥
आतां न तूतें शिकवी, सुगंध ॥ नाचावया मारुत मंद मंद ॥
पाहून तें नृत्य लतांगना त्या ॥ न डोलती प्रेमभरें सभोंत्या ॥ ३ ॥
मोहेनियां मोहक सौरभानें ॥ न भेटती ते आलि संभ्रमानें ॥
भृगांगनांचें श्रवणीय साचें ॥ गाणें न लाभे तुज सद्रसाचें ॥ ४ ॥
समीरणाच्या लहरीसमेत ॥ उद्यानभूमीमधिं जेथ तेथ ॥
सुगंध तूझा दरवाळुनीयां ॥ न सौख्यबीजा विखरी जनीं या ॥ ५ ॥
स्वातंत्र्य सर्वप्रिय नष्ट झालें ॥ सौंदर्य-सत्तेज गमे विझालें ॥
स्वार्थप्रमत्तीं तुजला खलांनीं ॥ ह्या तोडिलें दुष्टमती नरांनीं ॥ ६ ॥
जपोनि माळी तुज उष्ण काळीं ॥ सप्रेम पाळी खत तोय घाली ॥
तो तूज तोडी अजि काय हाय ॥ माता वधी कोण तरी सहाय ॥ ७ ॥
वाटे असंबद्ध नर-स्वभाव ॥ कधीं करी तो न पर-स्व-भाव ॥
कधीं वधी व्यर्थ परंतु अन्य ॥ कधीं दयाळू, कधिं सत्व वन्य ॥ ८ ॥
हा! हा! तुझ्या कष्टतरीं वियोगीं ॥ डसे तरूला सुत-शोकभोगी ॥
ढाळीतसे हंत! मिषे रसाचे ॥ त्वदर्थ हा टपटप अश्रु साचे ॥ ९ ॥
तूं भूषवीसील, पुढें पित्याच्या ॥ वसोनि, देहा न कदापि त्याच्या ॥
त्याचा तुला होय तुझा तयाला ॥ वियोग हा नित्य न अंत याला ॥ १० ॥
अपत्य लाभोनि परंतु अन्य ॥ होईल हा सत्य पुन्हा सुधन्य ॥
तूतें न आतां परि ती सुखाशा ॥ मनुष्य आहे सम काल-पाशा ॥ ११ ॥

सेवूनि तूझा अति रम्य मोद ॥ पावे मनीं निर्भर हा प्रमोद ॥
म्हणूनियां संतत ढुंगुनीच ॥ करील नष्टप्रभ तूज नीच ॥ १२ ॥
अशोक, कोरंटक, जासवंत, ॥ निर्गंध धत्तूर सदैव हंत ! ॥
देवेशशीर्षीं जनिं शोभतात ॥ क्वचित् स्थलें तीं तुज लाभतात ॥ १३ ॥
मोहोनि सारे नर बा सुमेशा ! ॥ हे लाविताती तुज आत्मवेशा ॥
दासंस्थिती ही तुजला अणीती ॥ करीति नानाविध जाचणी ती ॥ १४ ॥
शोभार्थ लावीति पटादिकांस हा ॥ स्वार्थ दैत्याधिप होय खास ॥
हे टांचणी टोंचिति सोस बाबा ॥ संसार दुःखोदधि हा गुलाबा ॥ १५ ॥
चंद्रानना चारुसरोजनेत्रा ॥ सप्रेम तूतें वरितील मित्रा ॥
सानंद खोवीतिल केशपाशीं ॥ जाणेंच तें जाण मृतेश-पाशीं ॥ १६ ॥
बारीकशा रेशिमरज्जुनें हा ॥ बांधोनियां ह्या सुकुमार देहा ॥
कोणी करें चोळवटील याला ॥ जाईल सौंदर्य-भटी लयाला ॥ १७ ॥
तूं शोभसी सुंदर घोंसदार ॥ गंधें तुझ्या नासिक डोलणार ॥
परी सुमा ! तूं गतसत्वसार ॥ अल्पावकाशामधिं कोमणार ॥ १८ ॥
तूं भूवरी जेंवि नभांत तारे ॥ परंतु लोपूनि सतेजता रे ॥
केरामध्यें तूं मग लोळणार ॥ तेणें न कां मन्मन पोळणार ॥ १९ ॥

**मनोरंजन पुस्तक ९.**

---

## निद्रेप्रत.

निद्रे ! ये झडकरि धांव ॥
कर कृपा मला तूं पाव, जिवलगे ॥ध्रु.॥

तूं झरी गडे शांतीची ॥ तूं जननी सुविचारांची ॥
तूं दुःखार्ते हरणारी ॥ तूं गरिबां सुख देणारी ॥

तुजसवें सुखें रमतांना ॥ बंदिजनां बंध कळेना ॥
उच्चनीच लघुगुरु यांचा ॥ तुजजवळी भेद न साचा, ॥
॥ जिवलगे! ॥ १ ॥

ही दुष्ट निराशा जाची ॥ मम हृद्या संतत टोंची ॥
देईन गोड मोबदला ॥ तुज, तरी शांति दे मजला ॥
घे गिरदी किनखापाची ॥ घे शय्या मृदुल रुईची ॥
घे शांतस्थल रमण्यातें ॥ जें देई स्थान तमातें, ॥
॥ जिवलगे! ॥ २ ॥

घे गुच्छ फुलांचा ताजा ॥ स्वीकार कर परी माझा ॥
सर्वही मला हें देती ॥ मोबदला का या म्हणती?" ॥
ऐसें जरि वदशी तूं गे ॥ घे अन्य तुला देतों गे ॥
पूर्वी न कुणीं तुज असला ॥ मोबदला कधिंही दिधला ॥
॥ जिवलगे! ॥ ३ ॥

मम हृदयमयी जी झाली ॥ देहीं जी पूर्ण मिळाली ॥
जी स्फूर्ती मम काव्याची ॥ जी खनी सर्व सौख्यांची ॥
त्या प्रेममया प्रिय-सखिचा ॥ लाभ तुला होइल साचा ॥
तद्दर्शन हा मोबदला ॥ योग्य न का वाटे तुजला? ॥
॥ जिवलगे! ॥ ४ ॥

निद्रे! तरि झडकरि धांव ॥
कर कृपा मला तूं पाव, जिवलगे! ॥

**नरहर शंकर रहाळकर.**

---

## शबरीची रामभक्ति.

निघे दंडका राम कोदंडपाणी ॥ सवें चालिली जानकी कीरवाणी ॥
कराया वनीं स्वामिसेवा स्वभावें ॥ सवें चालिला लक्ष्मण स्वानुभावें ॥१॥

तीर्थे यापरि चंडदंडकवनीं स्वच्छंदशीं हिंडती ॥
तों तेथें शबरी अखंड विचरे पापें तिचीं खंडती ॥
वाचे राघवनाम संतत जपे तें घ्यानही अंतरीं ॥
वांछी दर्शनलाभ होइल कधीं शोधी अरण्यान्तरीं ॥ २ ॥
आला राम वना म्हणोनि ललना ऐकोनि आनंदली ॥
मी वंदीन पदारविंद म्हणुनी जातां पथीं मंदली ॥
माझा राम असेल तो क्षुधितसा चंडांशुच्या आतपें ॥
त्यातें मी दृढ चित्ति ठेविन वरा ज्या कारणें हीं तपें ॥ ३ ॥
ज्या वनीं करिति झिंकृत झिल्ली ॥ दाट तें हुडकि कानन भिल्ली ॥
जेथ वृक्ष बहु पक्क फळांचे ॥ प्रांत तेथ फिरती अबलांचे ॥ ४ ॥
मोठ्या श्रमें वळघुनी सफळा तरूतें ॥ तोडी फळें वदनिं गात जगद्गुरूतें ॥
ओटी भरी चतुर ते उतरोनि भूमी॥ भेटी निघे, 'नयनिं पाहिन तो विभू मी'॥५
दाही दिशा देउनियां निरीक्षा ॥ मार्गीं फळाची करिते परीक्षा ॥
चाखी मुखें गोड कडू फळा या ॥ टोंचोनि दांतें रसही कळाया ॥ ६ ॥
कटुम्ल त्याहि रसहीन फळासि टाकी ॥ लागे मधू सरस तें वसनांत झांकी ॥
आली वनानिकट उत्तम भिल्लिणी ते ॥ जेथें जगज्जनक लक्ष्मण जानकी ते॥७॥
ज्याच्या मस्तकिं दीर्घ नूतन जटा फेटा दिसे टोप तो ॥
माजी वेष्टित वल्कलें झळकती दूजा म्हणे कोण तो ॥
आश्चर्या अति पावली बघुनियां तूणीर पाठीवरी ॥
राजीवाक्ष असा विलोकुनि वधू धांवे जशी बावरी ॥ ८ ॥
देखोनि डोळां हृदयाभिरामा ॥ रामापुढें धांवतसे सुकामा ॥
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया ॥ साष्टांग वंदी रघुराजपाया ॥ ९ ॥
रामांघ्रि वंदुनि नमी न उठेचि कांहीं ॥ रामें करांबुज युगें उचलोनि बाहीं ॥
आलिंगिली स्वहृदयीं शबरी बरी ते ॥ आनंदले अमर भाविति बावरी ते॥ १० ॥
'बहू दीससी राघवा, तूं भुकेला ॥ तुवां पाहिजे बा फळाहार केला ॥

तुझ्या कारणें म्यां फळें गोड रामा ! ॥ अगा आणिलीं, सेविं सीताभिरामा' ॥ ११ ॥
सारीं क्षतांकित फळें निरखोनि डोळां ॥ 'कांहो ! अशीं ?' तिस पुसे रघुराज भोळा ॥
चंचूपुटेंचि बहु चोखिलिं पांखरांनीं ॥ नेणो दिला प्रतिफळास नखांक रानीं ॥ १२ ॥
'चंचूक्षतें हीं नव्हती कृपाळा ! ॥ मी कां तशीं आणिन हा कपाळा ॥
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें ॥ चाखूनि घे मीच करें तुम्हांतें ॥ १३ ॥
मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी ॥
मग मज रघुनाथा ठेविता होय खोडी' ॥
निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा ॥
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा ॥ १४ ॥
भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे रामाकरीं तीं फळें ॥
घाली नेणुनि शास्त्रषिद्ध पुरुषा उच्छिष्ट देतां बळें ॥
प्रेमें प्रेमभरें प्रसन्नहृदयें भक्ताजनाचा पिता ॥
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पिता ॥ १५ ॥
भिल्लिच्या वनफळें मन धालें ॥ लोकनायक म्हणे 'सुख झालें !' ॥
प्रेम रामहृदयीं बहु आलें ॥ बाष्पतोय नयनांत निघालें ॥ १६ ॥
रामचंद्र–विभु–आचरणासी ॥ लक्षुनी विनटली चरणासी, ॥
वंदितां बहु सुखेंच वधू ते ॥ बाष्पकें करुनि ते पद धूते ॥ १७ ॥
आलिंगिली पुनरपि प्रमदा किराती ॥ जे अंतरीं सतत चिंतित दीसराती ॥
जोडूनि अंजलि नमी स्तवितां तयेतें ॥ मागे म्हणे वरद जें स्वमनास येतें ॥ १८ ॥
'माझें मनोगत वियोग तुझा न व्हावा ॥ रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा' ॥
स्वामी म्हणे 'तुज वियोग कधीं न वाटे ॥ जा शेवटीं मिळसि चिन्मयराजवाटे' १९
देतां असें वर तिसी रघुनायकानें, ॥ झाली कृतार्थ शबरी परिसूसि कानें ॥
आलिंगुनी मग तिघें निघती वनातें, ॥ आनंदनंदन म्हणे परिसा जनातें २०

आनंदतनय.

# मयूरकविकृत कर्णार्जुनयुद्ध.

## ( कर्णपर्व. )

ऐसा निश्चय केला पार्थें कर्णेंहि मांडिलें समर ॥
कौतुक पाहति कौरवपांडवपक्षस्थ आणखी अमर ॥ १ ॥
पार्थाकडील कटकें कर्णें कर्णाकडील त्या पार्थें ॥
केलीं भग्न शरांहीं भग्नें मग्नें भयीं हतस्वार्थें ॥ २ ॥
वर्षति अन्योन्यावरि कर्णार्जुन ते घनावरी घनसे ॥
पुरुहूतदूतवातद्युमणिकरां शरगृहांत रीघ नसे ॥ ३ ॥
तों आला वधसमय द्विजशापहि भूमुखेंचि तो डावें ॥
गिळवी रथचक्र म्हणे रामास्त्रा प्रेम तूंहि सोडावें ॥ ४ ॥
चक्र क्षितिनें गिळितां न स्मरतां भार्गवास्त्र रविजाला ॥
स्पर्शे विषाद म्हणती बळ-तेजोनाश-हेतु कवि जाला ॥ ५ ॥
तो वृष भूमिग्रस्तस्यंदनचक्रासि उद्धरायातें ॥
उतरे स्वरथाखालें करुनि असें अतुल युद्ध राया तें ॥ ६ ॥
उद्धरण करूं पाहे कर्ण भुजांनीं धरूनि चक्राचें ॥
परि पृथ्वी सोडीना जाणों व्रत घेतलेंचि नक्राचें ॥ ७ ॥
सप्तद्वीपा पृथ्वी वृष उचली चार अंगुळें वरि ती ॥
बडिशासि जशी मत्स्यी नुगली चक्रासि कांपली परि ती ॥ ८ ॥
सद्रसना नामातें कीं सोडी बंधुता न दायातें ॥
तैशी क्षिति चक्रातें श्रम झाला फारसा तदा यातें ॥ ९ ॥
त्या व्यसनीं तो पाणी आणी नेत्रांसि वृष ह्मणे हाय ! ॥
काय करील न साहे ते बहु मर्मीहि साहिले घाय ॥ १० ॥
स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे बळ तुझें अनंत रहा ॥
स्वस्थ मुहूर्तभरि रणश्रद्धा पुरवील गा अनंतर हा ॥ ११ ॥

रथचक्र उद्धरूं दे श्रुतिशास्त्रज्ञा ! महारथा ! कुलजा ! ॥
साधु न हाणिति अरिला पाहति अधृतायुध व्यथाकुल जा ॥ १२ ॥
तूं स्वरथीं क्षितिवरि मी तं सायुध मी अशस्त्र कवच रणीं ॥
न वधावें मज जों मी रथचरणीं लाग तूंहि भवचरणीं ॥ १३ ॥
भ्यालों न तुज, हरीसहि, जो न तुला विमुख काय कातर तो ॥
कथितों यास्तव कीं जन धर्में भवसिंधुनायका तरतो ॥ १४ ॥
रक्षावा धर्म बुधें कुशळाचा धर्म हा निधी राहे ॥
स्थिर जें करिसि निरायुधमथन करिल धर्महानि धीरा हें ॥ १५ ॥
कृष्ण म्हणे राधेया भला बरा स्मरसि आजि धर्मातें ॥
नीचव्यसनीं बुडतां निंदिसि दैवास न स्वकर्मातें ॥ १६ ॥
जेव्हां तूं दुर्योधन दुःशासन शकुनि एकमति झालां ॥
कैसें कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ॥ १७ ॥
जेव्हां सभेसि नेली पांचाळी मानिलें मनीं शर्म ॥
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ॥ १८ ॥
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग ॥
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां वृषा सांग ॥ १९ ॥
चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले असें नृपें खोटें ॥
कर्म करवितां कर्णा होता तव धर्म तेधवां कोठें ॥ २० ॥
केल दग्ध जतुगृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां ॥
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना तेव्हां ॥ २१ ॥
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म ॥
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ॥ २२ ॥
पूर्वीं धर्म न रुचला त्यजिला निपटूनि जो जसा कुचला ॥
आतांचि बरा सुचला काळगृहा सर्व व्हा परासु चला ॥ २३ ॥
मागेंचि धर्म करितां जरि देतां राज्य धर्म वांचविता ॥

न जगे जो दुर्भिक्षव्यसनापूर्वी न धान्य सांचविता ॥ २४ ॥
आतां रक्षील कसा धर्म तुम्हीं वित्तमद्यमत्तांनीं ॥
जो लोटिलां दहादां स्वहितहि मानूनि अहित लत्तांनीं ॥ २५ ॥
रक्षावा धर्म असा करिशी उपदेश तरि असे मान्य ॥
रक्षितसों धर्मातें आम्हांला धर्म ठाउका नान्य ॥ २६ ॥
आश्रितजनाभिमानी प्रभु बोले जेधवां असें रागें ॥
निश्वास वृषें लज्जावनतमुखें सोडिला जसा नागें ॥ २७ ॥
न वदे काहींच रथीं वेंधे घे सूर्यसुनु चापातें ॥
सोडी बाण कराया मूर्छित शक्रासि सूनुच्या पातें ॥ २८ ॥
तेंव्हां परपुरुष म्हणे पार्था दिव्यास्त्रवात सोडावा ॥
झोडावा मोडावा वैरद्रुम कर्ण बाण जोडावा ॥ २९ ॥
शर सोडितां रविसुतें धीरजनेंहि स्वधीर यामागें ॥
जो सोडिलाचि नव्हता व्यसनांत कधींहि मणि जसा नागें ॥ ३० ॥
तो शरगरधरवरसा पविसा रविसा स्मरारिसायकसा ॥
पार्थभुजांतरिं शिरला वल्मीकामाजि नागनायकसा ॥ ३१ ॥
त्या खरशरप्रहारें विव्हळ झाला महेंद्रसुत राया ॥
जरि होता निकट कुशल मंत्री प्रभु बाणसर्प उतराया ॥ ३२ ॥
ऐसा निजभुजविक्रम दावुनि सर्वा भटांसि शुद्र रणीं ॥
उतरे वृष दावाया भूग्रस्तरथांघ्रिच्याहि उद्धरणीं ॥ ३३ ॥
देव म्हणे पहिलें गुरुनाम मग स्वधनुबाण बरवें घे ॥
खंडीं शिर रिपु पुनरपि जों रथरत्नाचिया न वर वेंघे ॥ ३४ ॥
प्रभुची आज्ञा होतां पार्थ प्रखरेषु सोडुनी त्वरित ॥
रणदक्षा स्वविपक्षा करि कक्षाकेतु खंडुनी ज्वरित ॥ ३५ ॥
तुटला ध्वजचि न केवळ विजयाचा भरंवसाहि तुटला हो ॥
सुहृदश्रुबिंदुसह तो पडला बळधैर्यसेतु फुटला हो ॥ ३६ ॥

केतु च्छेदुनि पार्थ द्युमणिसुताचे हरावया प्राण ॥
जोडी गांडीवगुणी शत्रुहर हरायुधा असा बाण ॥ ३७ ॥
योजुनि महास्त्रमंत्रित शर विजय म्हणे जरि स्वगुरु सर्व ॥
तोषविले असतील ज्ञानबळाचा नसेल तिळ गर्व ॥ ३८ ॥
विधिनें जोडुनि नेलें असेल जरि कीर्तनें न तप नाशा ॥
तरि या शरें वृष मरो हरिचीच पुरो पुरो न तपनाशा ॥ ३९ ॥
ऐसें वदोनि पार्थें ओढुनियां सगुणबाण कर्णांत ॥
पाठविला काळें निजदूत तसा न्हावयासि कर्णांत ॥ ४० ॥
नयनाग्निकील नीलग्रीवाचा मीनकेतुत्तरि जैसा ॥
अरिवरि सायकनायक जाय कराया क्षय त्वरित तैसा ॥ ४१ ॥
तो शर कृत्यानळसा दुर्घट चक्रोद्धृतिक्रियानळसा ॥
गांठी कुरुबळविजयप्रासादाच्या रविप्रभा कळसा ॥ ४२ ॥
शाणनिशितमुखबाण प्राणभृदीड्यार्कसूनुच्या अमळा ॥
खंडी नाळापासुनि कमळा मारुत तसा शिरःकमळा ॥ ४३ ॥
सास्राश्रु शिर वृषाचें प्रथम क्षोणीतळीं गळालें हो ॥
मग सकुसुमवृष्टि तनू सधर्मभय शत्रुबळ पळालें हो ॥ ४४ ॥
कर्णशरीरापासुनि तेज निघालें दिवाकरीं शिरलें ॥
गुरुद्दच्छोकतमावरि जाणों सत्पुत्ररत्न तें फिरलें ॥ ४५ ॥

# दुसरी ( पक्षी ).

## हंसकाकीयकथानक.

पूर्वी सागरतीरीं साधुनृपाच्या पुरांत एक धनी ॥
सन्मान्य वैश्य होता नांदे ज्याच्या स्वधर्म नीति मनीं ॥ १ ॥
त्या धनिका वैश्याचे होते बहु पुत्र पौत्र गुणवंत ॥
त्यांतें आशीर्वादें गौरविती सर्वदा सदय संत ॥ २ ॥
त्या वैश्यकुमारांचें भक्षी उच्छिष्ट एक काक सदा ॥
बाळक उदारमतिनें न वदति वाणी कदापि साध्वसदा ॥ ३ ॥
देती वैश्यकुमारक मांसौदन सेवया वडे मांडे ॥
मधु घृत पायस वायस खाय सदा पक्षिपांसवें भांडे ॥ ४ ॥
सागरतीरीं तेथें आले दैवें कदाचित मराळ ॥
जे मुक्ताफळ भोजन करिती बिसतंतु भक्षन फराळ ॥ ५ ॥
पाहुनि हंसांतें ते बाळ स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें ॥
म्हणती तंचि विहंगा सर्वखगश्रेष्ठ त्या सुदुष्टातें ॥ ६ ॥
गर्वें मूर्खपणें तो मानी बाळोक्त सर्व साचार ॥
अधिकाचि माजे स्तवनें न विचार करी मलीमसाचार ॥ ७ ॥
गेला उडोनि गगनीं मग नीच सगर्व काक तो त्यांत ॥
साधूंत खळ जसा कीं काचमणी परमशुद्ध मोत्यांत ॥ ८ ॥
जाणे त्या हंसांत श्रेष्ठ जया त्यासि तो म्हणे काक ॥
दोघे उडों तुझें बळ पाहों दे मत्समीप ये ठाक ॥ ९ ॥
ऐसें वायस वदतां हांसति ते हंस त्या खगापसदा ॥
कीं शुद्धासीं मत्सर मूर्ख करी ज्यांत ताप पाप सदा ॥ १० ॥
म्हणती हंस तयातें गर्वभरें करिसि वायसा चार ॥
आम्ही मानसवासी सर्व खगांचेहि राय साचार ॥ ११ ॥

रे बलिपुष्टा दुष्टा कैसा हंसासमेत उडशील ॥
साहस करितां सहसा स्पष्ट व्यसनार्णवांत बुडशील ॥ १२ ॥
वायस बहु हंसाच्या हितवचनाची करूनि कुत्सा हें ॥
वदता झाला त्यांशीं पुनरपि तो गर्वराशि उत्साहें ॥ १३ ॥
शतपात जाणतों मी उडेन एकैक पात शतगांवें ॥
मजसीं उडतां अन्या खगमाचें पक्षिवीर्य न तगावें ॥ १४ ॥
उड्डीन एक दुसरें अवडीन तिजें प्रडीन संडीन ॥
इत्यादि पात शत मी दावूनि विपक्षगर्व खंडीन ॥ १५ ॥
गगनीं तुम्हांत एका भलत्यासीं मी उडेन हो खग तीं ॥
सांगावी जी माने किंवा म्यां दाविजे शत स्वगती ॥ १६ ॥
हांसोनि एक हंस ध्वाक्षासी म्हणे तुझ्या गती शतशा ॥
आम्ही हंस समस्तहि एकचि गति जाणतों दुज्या न तशा ॥ १७ ॥
जाणें एका गतिला त्याचि गतीनें उडेन आकाशीं ॥
माने तिनें उडें तूं बोले ऐसें मराळ काकाशीं ॥ १८ ॥
हंस उडे तो त्यासीं स्पर्धेनें कावळा उडे व्योमीं ॥
शतपात पातकालय दावी सांगों प्रकार किति तो मी ॥ १९ ॥
उड्डीनप्रमुखें जीं होतीं शतसंख्य ठाउकीं पतितें ॥
तीं सारीं दाखविलीं हंसप्रवरापुढेंचि त्या पतितें ॥ २० ॥
स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांची काकांनीं ॥
हर्षभरें नभ भरिलें का का का का अशा स्वहांकांनीं ॥ २१ ॥
मृदुपातें हंस उडे काकाहूनि हीनशक्तिसा भासे ॥
ऐसें मुहूर्तभरि तो दावी तों काकमंडळी हांसे ॥ २२ ॥
हंसांसि काक म्हणती हा हारविलाचि कीं भवज्ज्ञाती ॥
आयकिली दूरुनि त्या सर्व मराळोत्तमें अवज्ञा ती ॥ २३ ॥

मग पश्चिमदिग्देशीं शीघ्र शिरे हंस काकही मळधी ॥
जिकडे होता कर्णी गंभीर अपार खोल तो जलधी ॥ २४ ॥
मार्गे धांवे वायस हंस पुढें सोडिला जसा तीर ॥
स्पर्धेत काक नेणे कीं केवळ दूर राहिलें तीर ॥ २५ ॥
पक्षांचें बळ सरलें गर्व मनींचा मनांतचि जिराला ॥
घे धाक काक सागर सर्वत्र दिसे निराश्रय विराला ॥ २६ ॥
न दिसे अग नग मग तग गगनीं खग नीच काय काढील ॥
चित्तीं म्हणे समय हा मज काळाच्या मुखांत वाढील ॥ २७ ॥
जाऊनि दूर आला किंवा नाहीं असें फिरे पाहे ॥
राहे न करि उपेक्षा हंस खळाचीहि काळजी वाहे ॥ २८ ॥
आला हंसापाशीं प्रतिक्षण क्षीणशक्ति करटपती ॥
आतां पडेल ऐसें जाणुनि त्या खावया मकर टपती ॥ २९ ॥
अवलोकिला मराळें अत्यंतासन्नपतन पामर तो ॥
मग आणिलें मनीं कीं यावरि मी न करितां कृपा मरतो ॥ ३० ॥
रक्षावाचि उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत ॥
पाहों नयेंचि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत ॥ ३१ ॥
ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें मग म्हणे मराळ अगा ॥
बहुगतिचतुरा पतितें शत कथिलीं त्वां स्वयेंचि काकखगा ॥ ३२ ॥
परि जें निजगुह्यपतित आम्हांसि न सांगसीच कां गा तें ॥
झालें सख्य परस्पर दूर उडालों नभांत सांगातें ॥ ३३ ॥
तुंडाग्रें पक्षयुगें शिवसी काका क्षणक्षण जळाला ॥
या गतिचें नाम कथीं दे टाकुनि सर्व संशयमळाला ॥ ३४ ॥
वद काय नाम काका या पाताचें शतीं असे हा कीं ॥
त्याहूनि वेगळाची स्पष्ट कथीं मौन एकदा टाकीं ॥ ३५ ॥
ये ये झडकरि हा मी हंस तुझी वाट पाहतों करटा ॥

या लक्षयोजनांबुधिपरतीरीं आमुचा असे घरटा ॥ ३६ ॥
नेत्रीं नाकीं कानीं क्षारोदक पक्ष जाहले ओले ॥
केवळ विव्हळ दुर्बळ तो खळ आर्तस्वरें असें बोले ॥ ३७ ॥
का का शब्द करूनी भ्रमती त्यांच्या कुळांत मी झालों ॥
प्राणोपायन घेउनि तो आतां शरण मी तुला आलों ॥ ३८ ॥
ने मज सागरतीरीं हंसा दे प्राणदान दीनातें ॥
उडतां व्याकुळ झालों भ्यालों या दुस्तरा नदीनातें ॥ ३९ ॥
ऐसें वदतां पडला सिंधुजळीं काक धाक पावोनी ॥
त्याच्या समीप गेला सदयजनोत्तंस हंस धांवोनी ॥ ४० ॥
हंस म्हणे रे काका सांगत होतासि पात शत जाणें ॥
आत्मश्लाघा ज्यांत स्मर तें ज्ञातिप्रमोदकर गाणें ॥ ४१ ॥
मजहूनि अधिक तूं कीं इतुक्यांतचि भागलासि सांग मला ॥
शतपातपंडिता तुज हा श्रम अल्पा पथींच कां गमला ॥ ४२ ॥
काक म्हणे मी भक्षुनि उच्छिष्टें फार मातलों बा गा ॥
कीं आपणासि मानीं गरुडचि हंसोत्तमा महाभागा ॥ ४३ ॥
म्यां काक अन्य खगही पुष्कळ अवमानिले अदभ्र मदें ॥
ऐकविलीं बा तुजही दुर्वाक्यें सज्जनश्रुतिश्रमदें ॥ ४४ ॥
केली तुजसीं स्पर्धा तत्फळ हें व्यसन पावलों सद्या ॥
शरणागतासि रक्षीं हो कीर्ति तुझी जनांत अनवद्या ॥ ४५ ॥
हो बेट भेट हंसा अससी तूं दक्ष रक्षणीं आंगें ॥
पाळिति संत व्यसनीं दीन मुकें बधिर आंधळें पांगें ॥ ४६ ॥
सदया निजदेशाप्रति जरि मज नेशील तरी विभो मग मी ॥
शरणागत नम्र होइन बा सांगों काय मदधिकीं खगमीं ॥ ४७ ॥
ऐसें वदे रडे बहु खाय गटकळ्या जळांत करि का का ॥
धांवे मराळ चरणीं कवळुनि काढी क्षणांत वरि काका ॥ ४८ ॥

वाहे त्या दीनातें पृष्ठीं तो ब्रह्मवाहनहि हंस ॥
घेउनि गेला सागरतीरातें सर्व सज्जनवतंस ॥ ४९ ॥
हंस यथागत गेला दावुनि माहात्म्य साधुसंगाचें ॥
स्थापुनि पूर्वस्थानीं आश्वासन करुनि त्या विहंगाचें ॥ ५० ॥

**मोरोपंत.**

---

## शरद्वैभव.

गगन हें विमला सलिलापरी । सलिलही विलसे गगनापरी ॥
जणुं शरद् ऋतुनें सम मोलसे । बनवले नवलें नव आरसे ॥ १ ॥
सुभग, शुभ्र, नभांतुनि तारका । वसुमतीवरि शेवति–मालिका ॥
विलसते सुरसिंधु नभो–दरीं । विमलिनी नलिनीहि महीवरी ॥ २ ॥
विविध धान्य पिकोनि वसुंधरा । सुवसनें सजली जणुं सुंदरा ॥
कुलवधूसम ह्या कुसुमान्विता । फलवती, लवती विनयें लता ॥ ३ ॥
रुचिर दाडिम, जांब, सिताफळें, । कनक सुंदरशीं कदली–फळें ॥
अमृतपूरित नारळ, शाहळें, । पपनसें, पनसें नव पोफळें ॥ ४ ॥
नयनरंजक रंग खुले वरी । सुरस ज्यांतिल दाह तृषा हरी ॥
जनमनोहर यापरि संतरे । पिकवले कवले ऋतु सुंदरें ॥ ५ ॥
चतुर सुंदरशा नगरांगना । लखलखीत करोनि गृहांगणां ॥
वरि मनोहर रांगुळि काढिती । कुवलया–वलयादि शुभाकृती ॥ ६ ॥
विणुनि मोळ नवा भुजगापरी । ठळक दीपक ठेवुनि त्यावरी ॥
करिति गोवळि गोकुळ आरती । नव-सुतीं वसु ती निज कल्पिती ॥ ७ ॥
करवटी करिं देउनि गोमटी । ढकलुनी ऋणको प्रतिसंकटीं ॥
करिति हे धनको धनपूजना । धनपरा न परार्थ धनाविना ॥ ८ ॥
झळकतात नभांतुनि काजवे । क्षितिवरीहि असंख्य तसे दिवे ॥
सुरभिवात नभांतुनि खेळती । परिमलीं रमली जनता किती ॥ ९ ॥

अरगजादि सुगंधि विलेपनें । प्रियजनांप्रति लावुनि हौशिनें ॥
प्रणयदृष्टिसवें जल उष्ण तें । अवनता वनिताततति ओतिते ॥ १० ॥
पडति केतु नभांतुनि भूवरी । उडति बाण सरासर अंबरीं ॥
अनल-खेलन कीं जणु चाललें । सुर-जनीं रजनीस कुतूहलें ॥ ११ ॥
स्वसदनीं भगिनी शुभलक्षणा । करिति बंधुसि आणुनि 'औक्षणा' ॥
करुनि 'औक्षण' वाटतसे सती । निज निरंजन भावाचि दाविती ॥१२॥

चंद्रशेखर.

---

## भीष्मप्रतिज्ञा.

श्रोत्रयुग्म परिपूत कराया ॥ सावधान जनमेजय राया ! ॥
जो परेशरत, धन्य अहो तो ॥ गोष्पदोपम तया भव होतो ॥ १ ॥
प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें युद्ध न करीं ॥
धरीना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं ॥
घडेना हें मिथ्या जरि, तरि न मी भागवत रे ॥
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवधिलें या दृढतरे ॥ २ ॥
भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा ॥ होतां वदे तनय आनकदुंदुभीचा ॥
'दुश्चिन्ह आजि गमतें मज सव्यसाची॥जाती शिवा अशिव हे अपसव्य साची;॥ ३॥
गर्वोक्ति फाल्गुन वदे, 'जगदेकराया ॥ आहे मशीं कवण तो झगडा कराया ॥
म्यां काळखंज वधिले अतुलप्रतापी ॥ पौलोमही असुरगोसुरविप्रतापी' ॥ ४ ॥
पितामह वदे तया, 'प्रबळ तूं, पृथानंदना ॥
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना ॥
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तं रे नवा ॥
भिडें रणधुरंधरा, जय घडो सुखें वा न वा !' ॥ ५ ॥
पारीक्षिता, मग शरासन पांडवानें ॥ ओढूनियां हुतवहार्पितखांडवानें ॥
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें ॥ ज्याच्या क्रिये सकळ पद्मभवांड वाने॥६॥

गांगेय कोपा चढला कसा रे ॥ ज्या मानिती हाचि कृतांत सारे ॥
गर्जोनियां सिंहरवें जयातें ॥ पाहे, जणों मारिल आजि यातें ॥ ७ ॥
'त्वां काय कर्म करिजे लघुलेंकरानें ॥' बोलूनिया मग धनू धरिलें करानें ॥
तों व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं ॥ ग्रीष्मीं जसा पतित होय हुताश रानीं ॥८॥
तो स्तोम येतां बहु सायकांचा ॥ झालाचि पार्थव्यवसाय काचा ॥
काचावला वीर, पुढें धसेना ॥ झाली नृपा ! सर्व भयांध सेना ॥ ९ ॥
पुष्पवर्ण नटला पळसाचा ॥ पार्थ सावध नसे पळ साचा ॥
पाहिलें जंव निदान तयाचें ॥ तों दिसे वदन आनत याचें ॥ १० ॥

प्रतोद मग ठेविला, उतरला रथाधःस्थळीं ॥
म्हणे, 'प्रबळ भीष्म हा, जय घडे न या दुर्वेळीं'
करीं कमलनेत्र तो प्रथित चक्र तें स्वीकरी ॥
प्रमोद यमनंदना बहु, तया यशस्वी करी ॥ ११ ॥
असा येतां देखे रथनिकट तो श्यामल हरीं ॥
नृपा, गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी ॥
शरातें, चापातें त्यजुनि वदला गद्गदरवें ॥
जगन्नाथें केलें मज सकळलोकांत बरवें ॥ १२ ॥

ये रथावरि क्षणीं, यदुराया ॥ खड्ग देइन विकोश कराया ॥
तोडिं मस्तक, पडो चरणीं या ॥ धन्य होइन तदाच रणीं या ! ॥१३॥
श्रीमाधवावांचुनि आन देवा ॥ भजें, तरी हो मज आण देवा ! ॥
तुझीच कीं वाहतसें हरी रे ॥ मिथ्या, झडो हे तरि वैखरी रे ॥ १४ ॥

मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा ॥
तें मातें मग कोण रक्षिल पहा, विश्वेश नाकेश वा ॥
हा मुख्यार्थ जनार्दना मज गमे, भक्तप्रतिज्ञा खरी ॥
कीजे, सर्वजनांत होइल मृषा हे आपुली वैखरी' ॥ १५ ॥

हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें ॥ केलें विलोकन मृदुस्मित पीतवासें ॥
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें ॥ पार्थाचिया पुरविणार मनोरथातें॥१६॥

**वामनपंडित.**

# तिसरी ( कर्वी ).

## द्रोणप्रतिज्ञा.

मग भेटोनि द्रुपदा द्रोण म्हणे मी तुझा सखा पहिला ॥
दे क्षोभ शब्द तो त्या दंड जसा स्पर्शतां खळा अहिला ॥ १ ॥
पार्षत म्हणे दरिद्रा! तूं राजाचा सखा कसा मुग्धा! ॥
मित्र सधन सधनाचें साजे गोदुग्ध मित्र गोदुग्धा ॥ २ ॥
न करुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस ख्यातें ॥
विद्वत्वें सधनत्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें ॥ ३ ॥
झालें जीर्ण विसर जें कोण तया मंदनायका! पुसतो ॥
गतरंगसुगंध जुना पावे सन्मान काय कापुस तो ॥ ४ ॥
श्रोत्रियसख अश्रोत्रिय शूरसख क्लीब सुकविसख अकवी ॥
आम्हां असे नसे श्रुत हंससख न मानसस्थही बक वी ॥ ५ ॥
बहु बडबडे असें दे मद्य तसें त्यासि भाग्य मत्तत्व ॥
मुनि मनिं म्हणे न करितां परिभव न कळेल यासि मत्तत्व ॥ ६ ॥
मुनि त्या अपमानातें घोंटी जेविं त्रिलोचन गरातें ॥
किमपि विरुद्ध न वदतां गेला तो हस्तिनाव्हनगरातें ॥ ७ ॥
आणूनि राजसदनीं पूजुनि होऊनि सानुराग मनीं ॥
भीष्में तयासि पुसिलें कीं सांगा हेतु कोण आगमनीं ॥ ८ ॥
द्रोण म्हणे परिसावें त्वां, सांगावें तुलाचि सभ्यास ॥
द्रुपदासि मजाहि करवी चापीं गुरु अग्निवेश अभ्यास ॥ ९ ॥
गुरुबंधु सखे आम्हीं होतों गुर्वाश्रमांत वीरमणे! ॥
तेव्हां मजला ऐसें पांचाळ द्रुपद गौरवूनि म्हणे ॥ १० ॥
जेव्हां काय मज सख्या! द्रोणा! देईल राज्यपद तात ॥
तेव्हां तद्भोक्ता तूं आण तुझी कुळज सत्य वदतात ॥ ११ ॥

गेला पढोनि झाला नृप तो झालों गृहस्थ मी राया ! ॥
फळली सुतरत्नफळें त्यावरि माझी कृपी सती जाया ॥ १२ ॥
धनिकापत्यकृतपयःप्राशन पाहोनि पुत्र पय मागे ॥
पिष्टोदकें ठकवितां तें माझ्या शल्य काळजा लागे ॥ १३ ॥
बहु धन असो नसो परि एक असावें गृहीगृहीं दुभतें ॥
घ्यावें सुतार्थ शूद्रापासुनि गोदान सन्मतें शुभ तें ॥ १४ ॥
फिरलों बहु कीं संतति पट्ठु तसि गोदानदी न ताराया ॥
परि विधि मज दे मिळवूं जातां गोदान दीनता राया ॥ १५ ॥
स्मरलें स्वसखद्रुपदस्नेहवचन मज म्हणोनि मग राहो ॥
यत्नांतर, करुनि असा निश्चय गेलों तदीयनगरा हो ॥ १६ ॥
भेटोनि तया वदलों पूर्वींचा मी सखा असें नातें ॥
जें तद्दत्तोत्तर तुज सांगाया योग्यसें असेना तें ॥ १७ ॥
धिक्कारिति अज्ञ जसे मागतया भीक सर्वदा भणगा ॥
मज धिक्कारी हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण गा ॥ १८ ॥
वदला असे असें कीं मी सख्यानर्ह मंद राहो तें ॥
स्मरतां बहु दुःख मनीं भीष्मा खळजलधिमंदरा ! होतें ॥ १९ ॥
देईन अन्न एका दिवसाचें मात्र पाहिजे तरि घे ॥
हें शेंवटीं वदे तों कोपागारीं मदीय चेत रिघे ॥ २० ॥
द्रुपदकृतघ्नत्वाची येतांचि प्रत्ययासि पुष्कलता ॥
त्यजिली सभा तयाची म्यां मधुपें जेविं घर्मशुष्कलता ॥ २१ ॥
आलों त्वन्नगरा मी जोडाया अर्थ शिष्य यश कांहीं ॥
कर्ण त्रिटविले माझे द्रुपदाच्या विरसवचनमशकांहीं ॥ २२ ॥
नायक वीरांचा श्रीद्रोण द्रुपदोक्त सर्व आयकवी ॥
हाय ! कवी तोहि म्हणे ज्याच्या मातेशि शंभुसायक वी ॥ २३ ॥
भीष्म म्हणे राज्य तुझें ज्याच्या प्राप्त्यर्थ देव नवसावे ॥

ते कुरुभाग्यें आले हे पाय क्षणहि दूर न वसावे ॥ २४ ॥
सिद्धचि झालें सर्वहि कर्तव्य असें तुम्हीं मनीं आणा ॥
बाणासन विज्य करा कौरव दासानुदाससे जाणा ॥ २५ ॥
प्रार्थुनि भीष्में द्रोण प्रासादीं स्थापिला महेश्वरसा ॥
केला मान असा कीं मानी तो सत्य होय हे स्वरसा ॥ २६ ॥
स्वपदीं कुमार सर्वहि शिष्यत्वें वाहतांचि शांतनवें ॥
शिकवी धनुःश्रुतिहृदय व्हाया यश करुनि शत्रु शांत नवें ॥ २७ ॥
शिष्यांसि द्रोण म्हणे येतां तुमच्या कृतास्त्रता आंगा ॥
मच्चिंतित कार्य तुम्ही सिद्धिप्रति पाववाल कीं सांगा ॥ २८ ॥ ॥
त्यांत म्हणे अर्जुन मी युष्मच्चिंतितसमस्तकार्यकर ॥
दुःसाध्य काय असतां या माथां विजयदायकार्यकर ॥ २९ ॥
प्रेमें रडे पडे गुरु पार्थगळां त्या तशा उदारपणें ॥
आर्य प्रसन्न होती नुसत्याहि हितोक्तिच्या उदारपणें ॥ ३० ॥
द्रोण म्हणे शिष्यांसि द्रविण किती वाहती असु ज्ञानी ॥
गुरु पूजूनि सुखविला सुज्ञांनीं दुखविला असुज्ञांनीं ॥ ३१ ॥
द्या दक्षिणा अशी कीं द्रुपदाचा सर्व गर्व खाणावा ॥
युद्धीं भग्न करावा मग बांधुनि मत्समीप आणावा ॥ ३२ ॥
तें मान्य करुनि सर्वहि शिष्य रथीं प्रथम बैसवुनि गुरुला ॥
चढले स्वरथीं स्वर्गीं तर्पाया सद्यशोमूर्ते कुरुला ॥ ३३ ॥
धर्मासि गुरुसमीप स्थापुनि घेऊनियां तदाज्ञा ते ॥
गेले द्रुपदनृपावरि त्याच्या उतरावया मदा ज्ञाते ॥ ३४ ॥
रथचक्ररक्षणीं यम योजुनि तत्काळ वैरितापार्थ ॥
झाला द्रुपदमदातें स्वशरशिखिमुखांत वैरिता पार्थ ॥ ३५ ॥
भीम गदेतें घेउनि धांवे हो! एकशृंग पर्वतसा ॥
गजमद जसा हरिपुढें त्याहिपुढें शत्रुसैन्यगर्व तसा ॥ ३६ ॥

भीमगदेतें अरिबळ जैसें मंडूककटक उरगीतें ॥
भी, मग देतें पाठ व्योम भरिति तैं प्रसन्न सुर गीतें ॥ ३७ ॥
पांचाळबळास न भी शिरतां तो जेविं सागरा मकर ॥
वाटे द्विजापराधें आलासे धरुनि राग रामकर ॥ ३८ ॥
वेदांतीसा अर्जुन रिपुभट गौतमनयज्ञसे, नाशा ॥
तद्बळ पावे, पूर्णा होय जयाची न यज्ञसेनाशा ॥ ३९ ॥
श्रीगुरुवराच्युतोद्धृतफाल्गुनगोवर्धनीं द्रुपदशक्र ॥
वृष्टी करि परि झालें कौरवगोपाळरोमहि न वक्र ॥ ४० ॥
खंडुनि शस्त्रास्त्रांतें लीलेनें अर्जुनें अहीनकुळें ॥
क्षीणमद द्रुपद धराधव धरिला हो जसा अहीनकुळें ॥ ४१ ॥
अर्जुनगरुडें गुरुवरकार्मुकपक्षोत्थशस्त्रवातबळें ॥
उडवुनि बळाब्धि धरिला भग्नमदद्रुपददंदशूक पळें ॥ ४२ ॥
गिरिवर हरिसा चढला क्षिप्र रथीं पांडुपुत्र करवाळी ॥
द्रुपदासि धरी जैसा दशवदना तन्मदांतकर वाळी ॥ ४३ ॥
मग तो भीमासि म्हणे अर्जुन देवूनि दुरुनि हांकेला ॥
न वधावें कटक वृथा परतावें भूप भग्न हा केला ॥ ४४ ॥
तें राजरत्न दुर्लभ परि न करुनि फारसा उपाय नतें ॥
पार्थें आणुनि गुरुच्या चरणयुगीं अर्पिलें उपायन तें ॥ ४५ ॥
द्रोण म्हणे द्रुपदातें तूं माझा मी तुझा सखा पहिला ॥
आतां तरी म्हणों कीं आक्रमिलें एतदर्थ या महिला ॥ ४६ ॥
द्रुपदा तुज अभय दिल्हें यावरि पावो तुझी न तनु कंपा ॥
आम्हां ब्राह्मणतेजां न विसंबे क्षांति शांति अनुकंपा ॥ ४७ ॥
गुरुकुलवासी होतों पारि सख्य क्षीण जाहलें मग तें ॥
म्हणुन असुख अनुभविलें बहु म्यां भवदीयदर्शनोपगतें ॥ ४८ ॥
भूप सखा भूपाचा कवि कविचा धनिक तोचि धनिकाचा ॥

ऐसें वदलासि तुझ्या गमला हा द्रोण विप्र मनिं काचा ॥ ४९ ॥
उत्तरपांचाळपती मी निजतेजें न तोंड वासूनी ॥
दक्षिणपांचाळपती तूंही होशील आजिपासूनी ॥ ५० ॥
पांचाळराज तूंही मीही सख्यासि योग्य समशील ॥
आहें कीं नाहीं गा ! वद वदतां मज उदार गमशील ॥ ५१ ॥
सख्याला लोभी मी परि राजपणाविणें घडेना तें ॥
म्हणवुनि राजा झालों कीं न उपायांतरें घडे नातें ॥ ५२ ॥
द्रुपद म्हणे ब्रह्मर्षे ! तुमच्या जोडा नसेचि अनुभावा ॥
अतनु मदपराध तदपि पूर्वस्नेह स्मरोनि तनु भावा ॥ ५३ ॥
देवुनि राज्यार्ध नृप द्रोणें सत्कार करुनि बोळविला ॥
अहि सोडिला जसा पय पाजुनि मनिं मणि हरूनि पोळविला ॥ ५४ ॥

मोरोपंत.

---

## भीष्मशरपंजर.

वंदूनियां पद शिरीं प्रभु केशवाचे ॥
वर्णीन भीष्मशरपंजर लेश वाचे. ॥
ज्या कारणें त्यजुनि कृष्ण निज प्रतिज्ञा ॥
घे चक्र, दे यशचि या निजभक्तप्रज्ञा. ॥ १ ॥
धरुनियां धनु वासर तो दहा ॥
भरितसे स्वयशेंचि दिशा दहा ॥
धरि पुन्हा मरणीं निज कामना ॥
करि सुखप्रद तो यमनंदना. ॥ २ ॥
रथाखालीं गंगातनय शरतल्पावरि पडे, ॥
हहाकारें दुर्योधन सकळ सेना चरफडे; ॥

रणीं एकामेकां म्हणति नृप, 'पाहूं मुख चला, ॥
नव्हे हा हो भीष्म; क्षितिवरि रवी आज खचला.' ॥ ३ ॥
सभोंते पांडूचे तनय धृतराष्ट्रात्मज महा ॥
पहाती भीष्मातें तव जपत विश्वात्मज पहा, ॥
जशी काया बाणावरि सहितबाहू पसरली ॥
झुजाया वीरांची मग सकळ बा! हूप सरली. ॥ ४ ॥

खालीं नदीज पडतांचि जसा रथाच्या ॥
आनंद हो विजयिं त्या, मग सारथ्याच्या ॥
चित्तीं न होतचि दिसे झगडावयाचा ॥
द्रोणादिकांसि गतकोप घडावयाचा. ॥ ५ ॥

सहस्त्र दश मारणें नियम सैन्यभागीं रथी ॥
दिसांत म्हणवूनियां जननि ज्यासि भागीरथी; ॥
जराभर टिकेचिना, तरुणसा रणीं वावरे ॥
कसे शर शिखंडिचे तनुस भेदले बा! बरे? ॥ ६ ॥

शिखंडी शरें काय मारील यातें? ॥
कसा भीष्म हा देह सांडी लयातें? ॥
पुढें अर्जुना! यासि सारूं नको रे! ॥
शरा हाणितां जो म्हणे, 'ना नको रे.' ॥ ७ ॥

शरांची श्रीशय्या करुनि वरि गंगोद्भव निजे ॥
कदापि स्पर्शेना क्षितिवर वरांगा अवनि जे ॥
मधें लोंबूं लागे, फळ पवनयोगें तरुतळीं, ॥
विनाकाशीं जेंवी विलसत रवीबिंबचि तळीं. ॥ ८ ॥

गांगेय तेथुनि कसे उघडूनि डोळे ॥
दुर्योधनासि अवलोकुनि काय बोले? ॥

'देशी उशी, तरिच मस्तक हें न हाले, ॥
राया! शरीर अतिभारमिसें चि लोळे.' ॥ ९ ॥

नृपें आणिली दिव्य उद्दाम ऊशी, ॥
शिरा खालतीं देत वृद्धा मऊशी; ॥
म्हणे, 'ये स्थळीं हे उशी काय देशी? ॥
पहा हो! पडे कोणत्या काय देशीं?' ॥ १० ॥

बोले नदीज अवलोकुनि पांडवातें, ॥
जेणें हुताशन दिल्हा वनखांडवातें, ॥
'पाहेनि सेज समयोचित दे उशीला ॥
कैवल्यधामपदपावनदेवशीला!' ॥ ११ ॥

पडे भीष्मवाणी च कौंतेयकानीं, ॥
उशी सिद्ध केली च ते सायकांनीं; ॥
शिराच्या तळीं लावितां, ते उभारे ॥
रवीबिंब हें आननीं तेज भारे. ॥ १२ ॥

म्हणे भीष्म, 'दुर्योधना! पाजिं पाणी, ॥
पुरे राहिले आमुचे आजि पाणी.' ॥
असें ऐकतां ऊठिला लागवेगें, ॥
जळा आणितां तो जळाला चि वेगें. ॥ १३ ॥

बोलिला नृप तया, 'जळ प्यावें, ॥
त्वां पुन्हा मजवरी जळपावें.' । ॥
'जाळिलें मम शरीर शरांनीं ॥
कीं हुताश करि दिग्वश रानीं. ॥ १४ ॥

'पृथेच्या पुत्रा! तूं अमल जळ तें पाज मजला.' ॥
नदीजाची ऐसी हृदयगत बोली समजला. ॥

प्रकर्षें गांडीव प्रबळ धनु वोढी निजबळें, ॥
शरा तैसें योजी, तंव सकळ सेना खळबळे. ॥ १५ ॥

शराच्या संधानें रणगत जनाला भय पडे. ॥
न जाणों हो! याची न जरि कवणाचा वध घडे; ॥
अशी बोली होतां, तंव शर सुटे चापमुखिचा, ॥
विदारी भूमीतें, गुण नवदवात्युष्ण शिखिचा. ॥ १६ ॥

तळीं लागे जों जों उरगशिर तों तों वरि शिरे. ॥
फणी बोले त्यातें, 'कवण कवणा तूं वधिशि रे!' ॥
'शरस्तंबीं गंगातनय पडला भारतरणीं, ॥
जसा ये अस्तातें सहितकिरणा भार तरणी. ॥ १७ ॥

जयाचे हो! होते बहुत धृतराष्ट्रा भरंवसे, ॥
तसे खालीं आले, हृदयगत विश्वंभर वसे. ॥
शरीरीं संतप्त प्रखर शर ज्यातें कुरुपती ॥
श्रमी केला युद्धीं द्रुपदतनयानें कुरुपती. ॥ १८ ॥

'पाजिं पाणि मजला वसुधेचें.' ॥
मानिलें वचन जेंवि सुधेचें, ॥
पांडवें न धरितां अविनीतें ॥
पाठवूनि मज दे अवनीतें. ॥ १९ ॥

वदे जों शेषासी अमरसरिता बाणसरसी ॥
महीवरती आली त्वरित सुतनिर्वाणिं सरसी. ॥
विलोकी ते जेव्हां कठिण शरतल्पीं निजविलें, ॥
शरीरातें त्याच्या नयनजळपातें भिजविलें. ॥ २० ॥

'अरे बाळा! माझ्या कदनसमयीं तीव्र तपनें ॥
तुवां कां बा! केलें? असुनि वय हें तिव्र तपणें. ॥

सुनेचें म्यां नाहीं मुख निरखिलें धाकुटपणीं, ॥
गुरूशीं तूं अंबेस्तव झगडलासि दृढपणीं. ॥ २१ ॥
तळीं बाणाग्नीनें, वरि तपनउष्णें तळसि रे!' ॥
अशी माता तेव्हां विलपुनि पुन्हा भूतळिं शिरे. ॥
रणीं श्रीपार्थाचे शर बहुत उत्कर्ष दिसले, ॥
विलोकी तो जेव्हां तंव हृदयिं दुर्योधन सले. ॥ २२ ॥

वीरांत वीर हरिसारथि पार्थ हा रे! ॥
ज्याच्या पुढेंचि अवघा पुरुषार्थ हारे; ॥
जैसा वनांत हरिणीवरि सिंह घोरे, ॥
तैसा रणीं प्रतिभटीं सितवाह तो रे! ॥ २३ ॥

वदे श्रीभीष्मातें विगतनयनाचा सुत पुसे, ॥
'मनीं मोठे भाती अति पार्थादि रिपु असे. ॥
कशी आज्ञा देशी कठिण करणें युद्ध वदसा ॥
चमूवरती आली वडिल पडतांना अवदसा.' ॥ २४ ॥

वदे ते क्षणीं भीष्म दुर्योधनातें, ॥
'नको तूं धरूं पांडवीं युद्धनातें; ॥
सुखी दोघही एक होवोनि राहा, ॥
पुरे होय संग्राम माझेनि हा, हा!' ॥ २५ ॥
अशी भारतीं भीष्मपर्वी कथा रे! ॥
तरे या चरित्रीं जरी चित्त धारे. ॥
ऋषी बोलिला भूप पारिक्षितीतें, ॥
करी धन्य जो सर्वथा या क्षितीतें. ॥ २६ ॥

काशींत नाम जननीजनकाभिधानी ॥
श्रीविश्वनाथ मम दैवत कृष्णवेणी. ॥
श्रीमन्महेश अघर्षण जो उपायीं ॥
दासानुदास चि तरे दव तो सुपायीं. ॥ २७ ॥

**वामनपंडित.**

# भाऊबिजेची ओंवाळणी.

शरद्ऋतुचा साम्राज्यकाल आला ॥ तोष झाला भव-तप्त-जन-मनाला ॥
वायु शीतल सुमगंधयुक्त वाहे ॥ मधुर गायन खग-संघ करित आहे ॥ १ ॥
मधुर जीवन-निधि आत्म-तात-दत्त ॥ पहा सरिता घेउनी शांतचित्त ॥
त्वरित पळती भेटण्या निज पतीला ॥ थोर दैवत पति जाण हें सतीला ॥ २ ॥
सर्व सुंदर रमणीय अशा काळीं ॥ सज्जनांतें सुखविण्या ये दिवाळी ॥
बाल-तरुणी-जन-चित्त-सुम-विकास ॥ जणूं करण्या ये हा वसंत खास ॥ ३ ॥
नवीं वसनें नव विविध अलंकार ॥ सती नटती लेऊनि अहा फार ॥
सदन सारें आनंद-पूर्ण भासे ॥ जणों नंदनवन आज हें विलासे ॥ ४ ॥
यमद्वितिया सण गोड बायकांचा ॥ घरीं तेव्हां प्रिय बंधु यावयाचा ॥
म्हणुनि भगिनी निजमनीं फार हर्षे ॥ सौख्य जीवन चातकावरी वर्षे ॥ ५ ॥
करें कोमल लावुनी उंच तैलें ॥ प्रेमनीरें सुस्नात त्यासि केलें ॥
दिलें करण्या परिधान पीत वास ॥ पंच पक्वान्नें त्यास भोजनास ॥ ६ ॥
करीं घेई पंचारतीस ताई ॥ बंधुराजा ओंवाळण्यासि येई ॥
गमे नोहे आरती; प्राण पांच ॥ भगिनि ओंवाळुनि टाकि आज साच ॥ ७ ॥
बंधुरायें ओंवाळणीस नाना ॥ दिव्य आभरणें घातलीं सतींना ॥
योग्य सुंदर बहुमोल सौख्यकारी ॥ तयें झाला भगिनीस तोष भारी ॥ ८ ॥
घेइं 'पातिव्रत्य' या भूषणाला ॥ नको विसरूं सर्वदा लेइं याला ॥
जपुन ठेवीं गे यास अंतरांत ॥ कृपण जैसा राखितो निधि घरांत ॥ ९ ॥
भर्तृसेवाव्रत चालवीं सदैव ॥ खचित भर्ता हा सतिस असे देव ॥
स्वपतिसेवारत सर्वदा असावें ॥ त्यासि ठेवावें सुप्रसन्न भावें ॥ १० ॥
स्त्रीस शास्त्रें सांगती स्वपतिसेवा ॥ पतिस सोडुनि पूजणें अन्य देवा ॥
नये कामा; काळ तो व्यर्थ जाई ॥ "स्वपतिसेवा" दागिना थोर ताई ॥ ११ ॥
'विनय' 'लज्जा' दागिने फार नामी ॥ तुला भगिनी देतसें आज हा मी ॥
विनय भूषण देतसे अंगनांतें ॥ जशीं कुसुमें तीं भूषविति लतांतें ॥ १२ ॥

स्वकुल सत्पुत्रें, देश पंडितांनीं, ॥ रजनिनाथें आकाश, तरु फलांनीं ॥
मधुर पद्में सर, सुकवि कल्पनांनीं ॥ स्त्रिया विनयें शोभती, असें मानीं ॥ १३॥
वदुनि मंदस्मित मधुर विनय-वाचा ॥ तुष्ट भगिनी तूं करीं कांत साचा ॥
सकल लोकांतें ठेवण्यासि राजी ॥ मधुर भाषण सदुपाय जगामाजीं ॥ १४ ॥
वदो जिव्हा तव मधुर भाषणाला ॥ सदा बोलो प्रभु-नाम-गुण-गणाला ॥
मधुर वाणीनें करीं सदुपकार ॥ 'गोड वाणी' जिव्हेसि अलंकार ॥ १५ ॥
सृष्टि-रचना बहु रम्य विविध सारी ॥ ईश जी जी निर्मितो सौख्यकारी ॥
तदवलोकन-रत नयन तुझें ठेवीं ॥ सृष्टिशोभेचा स्वाद सदा सेवीं ॥ १६ ॥
दूर मनिंच्या करि सकल जी तमाला ॥ अहिल्यादिक सतिसच्चरित्रमाला ॥
ठेव कंठीं संलग्न सदा बाले ॥ व्यर्थ पुतळ्यांचें स्तोम जगीं झालें ॥ १७ ॥
ईशलीला उपदेश पूर्ण गोड ॥ ज्यांस नाहीं ह्या जगीं अन्य जोड ॥
साधुसाध्वींच्या मधुर कथा त्याही ॥ ऐक कर्णें सर्वदा सौख्यदायी ॥ १८ ॥
चारित्रांचें अनुकरण करीं त्यांच्या ॥ लाव तिकडे तव कर्ण आणि वाचा ॥
श्रवण करितां तीं हरिति सर्व पाप ॥ ह्याच 'बुगड्या' 'भोंकरें' आणि 'काप' १९
दु:खितातें साहाय्य करायाला ॥ सदा योजीं गे तव करद्वयाला ॥
अशा कृतिनें निरपेक्ष, पुण्य जोडे, ॥ हेंच मानीं 'पाटल्या' 'गोट' 'तोडे' ॥ २०॥
तुझ्याठायीं मम फार फार भक्ति ॥ म्हणुनि भगिनी लाडके यथाशक्ति ॥
विविध सुंदर दागिने स्वकृत आजी ॥ तुला देतों घेऊनि होइं राजी ॥ २१ ॥
दागिने हे बहुमूल्य घाल अंगीं ॥ नटुनि बाह्यांगीं आणि अंतरंगीं ॥
तोष देईं गे सर्वदा पतीला ॥ अधिक सांगावें काय तुज सतीला ॥ २२ ॥
जलीं राहे बुडबुडा अल्पकाल ॥ तसें मानीं संसार-पाश-जाल ॥
देह तैसा हा क्षणिक टिकायाचा ॥ सदुपयोगें हा धन्य करीं साचा ॥ २३ ॥
पुन्हा कथितों करिं नित्य भर्तृ-सेवा ॥ भक्तिभावें आळवीं सदा देवा ॥
यथाशक्ती उपकार करीं हातें ॥ सुकृति देते मानवा भूषणातें ॥ २४ ॥
आर्यभगिनींनो आज सुप्रसंगें ॥ मनोरंजन ही शुद्ध अंतरंगें ॥
तुम्हां घाली ओंवाळणी करानें ॥ मान्य करणें सप्रेम अंतरानें ॥ २५ ॥

भ्रमर.

# तिसरी ( पक्की ).

---

## कचोपाख्यान.

देवांच्याही जे जे भट होती संगरांत असुरहित ॥
संजीविनीबळें त्यां उठवि करी काव्य नित्य असुरहित ॥ १ ॥
ती विद्या सुरगुरुला अवगत नव्हती म्हणूनि समरांत ॥
बहु मरती, तें पाहुनि न टिके उत्साह धैर्य अमरांत ॥ २ ॥
ती विद्या साधाया देवांनीं सद्विचार आठविला ॥
शुक्राकडे स्वगुरुसुत कच विनवुनि कथुनि युक्ति पाठविला ॥ ३ ॥
शिष्यत्वें जाउनि कच सांगे गुरुदास्यकाम पद नमुनी ॥
प्रणतीं शत्रुसुतींही द्रवला तो सुप्रसन्नवदन मुनी ॥ ४ ॥
आराधिला कचें गुरु, गुरुची कन्याहि **देवयानी** ती ॥
झाली प्रसन्न सत्वर शिकविति तैशीच देव या नीती ॥ ५ ॥
असुर म्हणति विद्येनें प्रबळ करायास देव या नीचें ॥
मन मोहिलें गुरूचें गुरुचित्ताहूनि देवयानीचें ॥ ६ ॥
गुरुगोरक्षण करितां देवद्वेषें हरूनि असु रानीं ॥
कचमांस मृगांसि दिलें वांटुनि भक्षावयासि असुरांनीं ॥ ७ ॥
गाई गृहासि आल्या मावळला रविहि कच न आढळला ॥
तेव्हां सोडुनि धृतिनग शुक्रसुताबुद्धिभूमिला ढळला ॥ ८ ॥
तातासि म्हणे आला नाहीं अद्यापि कच, नसे अवधी ॥
त्व धीर बुद्धि न धरी माझी, ताता सुनिष्ठुरा तव धी ॥ ९ ॥
येता मघाची असता जरि कुशली, करिति खल अघा, बरवी ॥
गति न दिसेचि कचाची, कुशलिजनविरह असा न घाबरवी ॥ १० ॥
कच आजि न येतां मी प्राण त्यागीन न भरतां घटिका ॥

आण तुझी जाण खरें केला निश्चय नव्हेची हा लटिका ॥ ११ ॥
काव्य म्हणे धीर धरीं, आहे संजीविनी सुधाधारा ॥
उठवूनि आणितों कच चिंतुनि विश्वंभरा बुधाधारा ॥ १२ ॥
मंत्रजप करुनि तो कवि ये रे वत्सा कचा असें वाहे ॥
भेदुनि वृकोदरें पल सर्व निघे त्यांत लेशहि न राहे ॥ १३ ॥
होता तसाचि झाला उठला आचार्यदेव तारी, ती ॥
शक्ति तशीच निरुपमा, भिन्ना गुर्वन्यदेवतारीती ॥ १४ ॥
कच येतां बहु हर्षे धन्य म्हणे मीच कन्यका, मातें ॥
वांचविला त्वांचि दिला हा, देइल कोण अन्य कामातें ॥ १५ ॥
पुसतां वधवृत्त कच स्वगुरुसुतेला समस्त आयकवी ॥
प्रार्थुनि म्हणे उगी, हा स्वस्ति असो सर्वविप्रराय कवी ॥ १६ ॥
त्यावरि गुरुकन्योक्तें पुष्पें आणावयासि जाय वना ॥
सांपडला त्या असुरां कच जैसा वत्स एकला यवना ॥ १७ ॥
पुनरपि त्या पापांनीं सद्विप्रकुमार चरचरा चिरिला ॥
भय न धरिलें तिळहि त्या पापाच्या जोडितां महागिरिला ॥ १८ ॥
खंड तिळप्राय करुनि नेउनि केले निमग्न जळधींत ॥
नाहींच धर्म करुणा पापभय विचारलेश खळधींत ॥ १९ ॥
जो मुनि तयासि कन्याप्रियकाम दयाळु काव्य तो तारी ॥
रज गोळा करुनि घडी शिष्याची मूर्ति जेविं वोतारी ॥ २० ॥
शुक्र म्हणे वत्से मी वांचवितों परि पुनः पुन्हा मरतो ॥
आग्रह धरूनि म्हणसी प्रेतगतिंगतहि कच पुन्हा परतो ॥ २१ ॥
त्यज शोक, मत्प्रसादें तुज काय उणें, मुली नकोच रडों ॥
दाटुन माथां वाहुनि दुर्वह दुःखाद्रिला नको चिरडों ॥ २२ ॥
ती तातासि म्हणे कच गुरुभक्त कुलीन साधुकार्यकर ॥
जरि त्यासि सोडिलें जल तरि जल सोडू मलाहि आर्यकर ॥ २३ ॥

ब्रम्हघ्ना शिष्यांची भीड धरुनि साधु शिष्य मोकलिला ॥
म्हणतिल न ऐकवे तें न स्वहित कचीं असें गमो कलिला ॥ २४ ॥
स्वमनिं म्हणे कविसत्तम मळवावें पंडितें न यश, हाणी ॥
प्राणाचीहि बरी परि न यशाची, सांगती नय शहाणी ॥ २५ ॥
असुरांसि म्हणे कां रे नेणा अद्यापि मत्तपा मरतो ॥
कीं वांचतो पतंग न भी जो ज्वलनासि मत्त पामर तो ॥ २६ ॥
विप्र अवध्य म्हणे श्रुति हाणोनि तिच्याहि लात हांकेला ॥
कचहननें सुरगुरुचा न तुम्हीं माझाचि घात हा केला ॥ २७ ॥
ब्राह्मण कणसा खुपतो तुमच्या नेत्रीं नसो सवे काढा ॥
युक्तचि मरणाराला हितपरिणामहि न सोसवे काढा ॥ २८ ॥
धिक्कारुनि असुरातें धर्मचि तो अमृतमयवचा शिकवी ॥
बाहे करुणाविद्यादिव्यतपस्याबळें कचाशि कवी ॥ २९ ॥
जों गुरु वत्स कच म्हणुनि एहि असें तो म्हणावया योजी ॥
तों विद्यासामर्थ्यें उपजूनि गुरूदरीं म्हणे वो जी ॥ ३० ॥
उदरप्रवेश पुसता झाला तो पुण्यराशि शुक्र मुनी ॥
सांगुनि खळकपट म्हणे एथ वसो काळ हा शिशु क्रमुनी ॥ ३१ ॥
निर्भय वसेन काळ क्रमुनि पवित्रोदरीं असाचि सुखें ॥
न हित गुरूदरदारण निघतां मज निंदितील साधुमुखें ॥ ३२ ॥
शुक्र म्हणे वत्से कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर ॥
हा तरलाचि परि तुझें या कुव्यसनीं बुडेल माहेर ॥ ३३ ॥
सुरयानी त्यासि म्हणे वदतां हें अशुभ काय हो तात ॥
व्हावे दोघेहि मला चिंतामणि हेचि पाय होतात ॥ ३४ ॥
तारुनि शिष्यासि तरो गुरु, म्हणत्ये पात्र कन्यकान्या या ॥
नोहे वरासि वरदा, जाणसि तूं सुज्ञनायका न्याया ॥ ३५ ॥
भीड सुतेची भारी विद्या संजीविनी कचा शिकवी ॥

गुरुलाहि वांचवाया योग्य करी सज्जना कचाशि कवी ॥ ३६ ॥
गुरुकुक्षि विदारुनि कच बाहेर निघे परंतु बहु तो भी ॥
उठवुनि गुरु संकोचें नमुनि रडे, कुलजकीर्तिचा लोभी ॥ ३७ ॥
कचघातकासुरांतें सुरयानीचा स्वयें जनक दापी ॥
कीं जो ब्रम्हद्वेष्टा कुशल न पावेल तो जन कदापी ॥ ३८ ॥
समजा बरें जसा मी विप्र गुरु तसाचि हा कच, पळाला ॥
ब्रह्मांडांतुनि जरि रिपु वधिन न देतांचि हाक चपळाला ॥ ३९ ॥
वर्षे सहस्त्र होता कच गुरुसेवेंत, मग तया प्राज्ञा ॥
शुक्रें बहु संतोषें दिधली जाया-पित्याकडे आज्ञा ॥ ४० ॥
कच सिद्ध होय जों तों शुक्रसुता त्या मनोहरा उचिता ॥
स्वकरग्रहार्थ विनवी बहु आवडली सुविद्यता शुचिता ॥ ४१ ॥
जें गुरुचें तेंच तिसीं पूजत्वाचें धरूनि कच नातें ॥
ठेवूनि दृष्टि धर्मीं तो न तिच्या मान्य होय वचनातें ॥ ४२ ॥
पडतां गळां म्हणे कच भगिनीला वरुनियां न भाउ तरे ॥
कारितां अधर्म सद्यः स्वपितृसुहृज्जनमुखप्रभा उतरे ॥ ४३ ॥
ज्या उदरीं वास तुझा तेथें माझाहि हें असे नातें ॥
केविं करग्रहण करूं संमत धर्मासि जें असेना तें ॥ ४४ ॥
बहु दिवसांची आशा तत्काळ च्छेदितां कचें, रुष्टा ॥
शुक्रसुता त्यासि म्हणे रे कपटपटो भला भला दुष्टा ॥ ४५ ॥
ऐक कृतघ्ना जरि मी उठवाचि मदर्थ या हता शतदा ॥
ऐसें गुरुस न म्हणतें कैसा उठतास तूं हताश तदा ॥ ४६ ॥
तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भवपणें हि कचसा च ॥
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि नाम कच साच ॥ ४७ ॥
न करीं विफळ मदाशा आशा भंगूं नयेचि साधूंनीं ॥
जरि भंगिसील, विद्या सिद्ध नसो जीस नेसि साधूनी ॥ ४८ ॥

कचहि म्हणे गुरुवेदानुज्ञा नाहीं म्हणोनि या कर्मा ॥
मान्य नसें, हूं शापीं कीर्तिकरचि शाप न चुकतां धर्मा ॥ ४९ ॥
पढवीन ज्यासि विद्या ही त्यासि फळेल, तूंहि घे शाप ॥
तुज कोणीही ऋषिसुत न वरील, फळो तुझें तुला पाप ॥ ५० ॥
जातां स्वर्गीं मिरविति निजगुरुसुतरत्न देव यानीं तें ॥
वर्णिति दैत्यांतें किति, किति कवितें, कितिक देवयानीतें ॥ ५१ ॥

**मोरोपंत.**

---

## अन्योक्ति.

येथें समस्त बहिरे वसताती लोक. ॥
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक. ॥
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक, ॥
वर्णावरून तुजला गणतील काक. ॥ १ ॥

बैसोनी, सखया पिका, उगिच तूं मार्गप्रतीक्षा करी ॥
जों आंबे फुलती, सुगंध सुटती, येई मधू जोंवरी; ॥
तेव्हां सार्थकतेस येईल खरी ही गोड वाणी तुझी, ॥
आतां ग्रीष्म असे, धुळी उडतसे, दे त्रास नेत्रास जी. ॥ २ ॥

ज्याचे पूर्वीं वसंतीं परिमलबहलीं आम्रवृक्षीं सुखाचे ॥
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनांचे, ॥
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता, ॥
कोठें थारा मिळेना, गरिब पळतसे वांकडा काळ येतां ! ॥ ३ ॥

काका, मौन धरूनि बैसशि जरी या आम्रवृक्षावरी, ॥
तूंतें कोकिल मानतील जन हे सारे स्वचित्तीं तरी, ॥
होती स्थानगुणें चि थोर बहुधा वस्तू; नृपाच्या शिरीं ॥
पंका कोण न मानिती मनिं असे कीं कस्तुरी ही खरी? ॥ ४ ॥

या माळावरि वृक्ष एक हि नसे, बाळा खुळ्या कोकिला, ॥
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला? ॥
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश, बा, वेगळा; ॥
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा. ॥ ५ ॥

वसंत समयीं फुलें, परिमळें दिशा व्यापि जो, ॥
जयास अवलोकुनी सुरतरू हि चित्तीं थिजो. ॥
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती; ॥
परी पिक चि एकला मधुर वाणि लाधे कृती. ॥ ६ ॥

पढोत शुक सारिका, शिखि वदोत केकाध्वनी ॥
करोत कलहंस ही बहुत गायनातें वनीं; ॥
रसाल तरुच्या शिरीं कुसुमितीं वसोनी करी ॥
न कोकिल सुधासम स्वन वनांतरीं जोंवरी. ॥ ७ ॥

कां, बा, सुस्वर शब्द काढिशि पिका? राहें उगा; काळ हा ॥
लोटे तों तरुकोटरीं लपुनियां कोठें तरीही रहा. ॥
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती झाडें जळाल्यापरी; ॥
गर्जे कर्कश शब्द थोर करुनी काकावली त्यांवरी. ॥ ८ ॥

झाडें पालवती, लता उगवती वेलां फुलें शोभती, ॥
मेघें वृष्टि करूनि तुष्टि दिधली सृष्टीस पुष्टी हि ती. ॥
रे रे चातक, काय पातक तुवां केलें न आम्हां कळे. ॥
वारी वर्षुनि भारि एक कण ही त्याचा न तूतें मिळे. ॥ ९ ॥

नवीं पद्में जेथें विकसुनि सुगंधा विखरती. ॥
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असती, ॥
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो? ॥
गमे मातें मानी शिर नमविण्या लाज धरितो. ॥ १० ॥

पक्षी या मलयावरी विहरतां लक्षावधी दीसती, ॥
केकी एक च धन्य त्यांत इतर, क्षुद्रांपरी भासती, ॥
जो शब्दें अपुल्या क्षणांत पळवी सर्पा सदर्पा महां, ॥
जेणें चंदन सौख्यकारक जना होती; खरा थोर हा. ॥ ११ ॥
रत्नांचा जणु ताटवा झळकतो, मोरा, पिसारा तुझा, ॥
हर्षे नाचशि तैं गमे त्रिभुवनीं पक्षी न ऐसा दुजा, ॥
मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहीं च भिल्लांस यां, ॥
हे घेतील तुझ्या जिवा, झडकरी सोडी अरण्यास या. ॥ १२ ॥
तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे, ॥
मला वाटे मोठा तुजजवळ हा दोष च वसे, ॥
शुका, तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी, ॥
गड्या, स्वातंत्र्याच्या अनुपम सुखां सर्व मुकशी. ॥ १३ ॥

फळें मधुर खावयां असति, नित्य मेवे तसे, ॥
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरीं ही वसे, ॥
अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे ॥
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे. ॥ १४ ॥
उभा राहे एके चरणि धरणीतें धरुनियां, ॥
तपश्चर्या वाटे करित जणु डोळे मिटुनियां, ॥
बका, ऐशा ढोंगें तव अमति मासे च ठकती, ॥
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती. ॥ १५ ॥

गेला लोकांतरातें दिनकर सकला द्योतवी जो जगातें, ॥
अस्तातें जाय तो ही हिमकिरण, जया सौख्यदा विश्व गातें, ॥
मेघांनीं व्याप्त ऐशा गगनिं न च दिसे एक तारा हि कोठें, ॥
रे खद्योता, आतां तूं चमक बहु, तुझें दैव, बा, फार मोठें. ॥ १६ ॥
खाण्यावांचुनि रोडला जरि, जरायोगें बहू वाळला, ॥

रोगानें अतिपीडिला, जरि मरायातें हि कीं टेंकला, ॥
उन्मत्तद्विपगंडभेदन करायाची च इच्छा करी, ॥
मानी क्षुद्र जनावरांपरि तृणा स्पर्शे च ना केसरी. ॥ १७ ॥
मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाही स्वभावें, ॥
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें; ॥
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें ॥
धाला रक्ता पिऊनी, नच मृतपशुंच्या इच्छितो तो कणांते. ॥ १८ ॥
भुंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्ती हि जीतें, ॥
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें, ॥
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजि आतां ॥
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां. ॥ १९ ॥

कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी, ॥
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी; ॥
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्त हि करी, ॥
कसा त्या नादातें क्षणभरि हि तो पामर करी? ॥ २० ॥

पूर्वी बालपणीं वनीं मुनिजनीं प्रेमें जया पोशिलें, ॥
देवोनी तृणधान्यमुष्टि जल ही पाजूनि कुंभांतलें, ॥
झाला तो गज थोर आजि फिरती भुंगे तया भोंवतीं, ॥
त्यांतें पाहुनि ते मुनी दचकती; संतोष ही पावती. ॥ २१ ॥
कर्णी लोंबति चामरें, चमकती माळा गळां साजिऱ्या, ॥
वेली रंगविल्या हि शोभति शिरीं सोंडेवरी गोजिऱ्या, ॥
ऐसा तो नटला तरी नृपकरी पायीं बिडी वागवी, ॥
कैशी त्यास मिळे स्वतंत्र वनिंच्या हत्तीपुढें थोरवी. ॥ २२ ॥

दानपान इच्छुनी जरि द्विरेफ पातले, ॥
कर्णताडनें गजें हकून त्यांस लावलें, ॥

त्याचिया च मस्तकास हानि भूषणाचि ही. ॥
भृंग पंकजांतरी निघून जाति सर्व ही. ॥ २३ ॥

ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहीं च झाले, ॥
सांगावें काय? ज्याच्या मृगपति हि भयें रान सोडून गेले. ॥
तो पंकामाजि आजी गजवर फसला, युक्ति नाहीं निघाया. ॥
आव्हेरीती, पहा, हे कलकल करुनी क्षुद्र कोल्हे तयाला. ॥ २४ ॥

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला, ॥
व्याधाचे चूकवूनि बाण हि महा वेगें पुढें चालिला; ॥
तों घाईंत उडी फसूनि पडला आडामध्यें बापडा; ॥
होती सर्वहि यत्न निष्फळ, जरी होई विधी वांकडा. ॥ २५ ॥

मार्गीं वाढुनि सांवली पसरिशी विस्तीर्ण कां तूं अशी ॥
कां होशी फलयुक्त? होउनि तसा कां वांकशी भूमिशी? ॥
तेणें ओढिति, तोडिती, जन तुला पाषाणही मारिती, ॥
वृक्षा, सोस निमूट हाल अवघे, आतां न अन्या गती. ॥ २६ ॥

दावाग्नी खवळोनियां तरुवरा जाळावया जैं बळे, ॥
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, रावे, तसे कावळे, ॥
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र जे जाहले; ॥
येतां संकट काळ होय जवळीं ऐसा न कोणी मिळे. ॥ २७ ॥

तापानें पीडिलें, त्यां निववविशि; करिशी तृप्त त्यां जे भुकेले; ॥
अर्थी देऊनियां त्वां अभिमत मनिंचें फार संतुष्ट केलें; ॥
ऐशी कीर्ती तुझी ही परिसुनि दुरुनी पातलों आश्रयातें, ॥
कांटे झाडें अम्हा हीं अडवुनि धरिती कां? तरो वार यांतें ॥२८॥

आहे एक सुगंध मात्र जवळी, तों त्यास राखावया ॥
ऐसे घोर भुजंग पाळिशि, जना जे धांवती खावया, ॥

येतीं गोड फळें फुलें हि बरवीं दैवें तुला, चंदना, ॥
त्यांच्या, बा, करितास काय न कळे संरक्षणा योजना ! ॥ २९ ॥

वनीं विलसती बहू विविध वृक्ष चौंहींकडे, ॥
तयांत मज चंदना सम न एक ही सांपडे; ॥
जयास न दिलीं फळें न कुसुमें हि दैवें जरी, ॥
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी. ॥ ३० ॥

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी, ॥
गंधें युक्त फुलें, फळें हि असती ज्याचीं सुधेच्या परी, ॥
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचें मुखींचें, भला ॥
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला ! ॥ ३१ ॥

पावोनी तव आश्रया द्विजकुलें लक्षावधी पोसती, ॥
सारे ही वनिंचे तरू तुज पुढें क्षुद्रापरी भासती, ॥
ऐसा तूं गुणवंत, बा, असुनियां, आम्रा, पिकात्रायसा– ॥
मध्यें जाणसि तारतम्य न मनीं; हा मोह, बा कायसा ! ॥ ३२ ॥

झाडें वनीं फुलति पालवती अनेक, ॥
सर्वांत धन्य सहकार चि जाण एक. ॥
ज्याचीं फुलें करुनि बाण, समर्थ झाला. ॥
जिंकावया रतिपती भुवनत्रयाला. ॥ ३३ ॥

गर्वें गर्जसि बहु परि, जिणें तुझें व्यर्थ भासतें मजला; ॥
तव तीरीं तान्हेला जन शोधी कूप, टाकुनी तुजला. ॥ ३४ ॥

वारी सकळ जगाची तृषा तया गर्जना घना साजे. ॥
ज्याच्या जलास न शिवे कोणी ही, तो समुद्र कां गाजे? ॥ ३५ ॥

कोकां शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो, ॥
कारागारें करांहीं उघडुनि कमलें भृंग ही सोडवी जो, ॥

जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा, ॥
त्या मित्राचा बघूनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा? ॥ ३६ ॥

देखूनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी, ॥
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाऊनी, ॥
देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा, ॥
अत्युच्चीं पदिं थोर ही बिघडतो हा बोल आहे खरा. ॥ ३७ ॥

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें ॥
झाला निष्प्रभ तारकाधिपति ही, बोला कशाला दुजें? ॥
राहूच्या वदनीं अजीं गवसतां तो भानु दैवें अहा ! ॥
कैसे क्षुद्र हि काजवे चमकती त्याच्या पुढें हे पहा ! ॥ ३८ ॥

नक्षत्रें परिवार ज्यास, पति ही जो ओषधींचा असे, ॥
ज्यातें पाहुनि हर्षती जन, सुधा ज्याच्या शरीरीं वसे, ॥
होई तेज कमी तया हि विधुचें येतां रवीच्या गृहीं, ॥
ज्या येई लघुता न अन्यसदनीं, ऐसा न कोणी च ही ॥ ३९ ॥

आकाशांत शशांक पूर्ण उदया आला, तया पाहुनी ॥
झालें तुष्ट चकोरमंडल सुधापाना कराया मनीं, ॥
तापक्लेश उणा जनांस नुकता होऊं असे लागला ॥
तों दैवें इतुक्यांत मेघ अणुनी कैसा मधें घातला ! ॥ ४० ॥

ज्या कांहीं तेज नाहीं, परम कृश हि जो, त्या बिजेच्या शशीला, ॥
मोठ्या यत्नें पहाया झटति, बघुनियां वंदिती लोक त्याला, ॥
वाढे तेजें कलांहीं पुढति बहु जरी, मान तो त्या न राहे. ॥
वस्तू वाटे नवी जों अवड बहु तिची, लोकरीती अशी हे. ॥ ४१ ॥

येती रम्य फुलें फलें हि बरवीं वृक्षां जयां त्यां प्रती ॥
घालूनी विपुला जला जन सदां अत्यादरें पाळिती ॥

शाकोटादिक जे निरर्थक तरू दीना अनाथां तयां, ॥
मेघा, रक्षिल कोण बा तुज विणें साऱ्या जगा माजिं या! ॥ ४२ ॥

दावाग्नी गहनीं वनीं भडकतां, ज्यां वाट जी सांपडे, ॥
तीनें धांवति जीव घेउनि पशू भांबावुनी बापडे, ॥
ऐसा घोर अकांत हा उसळतां दुर्वार या संकटा ॥
वारायास समर्थसा दिससि तूं आम्हां, घना, एकटा. ॥ ४३ ॥

गव पर्वतमस्तकीं, जलधरा, धारा वृथा वर्षशी, ॥
पीडा कष्ट करूनि नाविकजनां दुष्टापरी हर्षशी, ॥
पाण्यावीण लता तरू सुकति हे, वृष्टी जरी यांवरी, ॥
रे मेघा, करतास कीर्ति भुवनीं होती तुझी, बा, खरी. ॥ ४४ ॥

हर्षें मोर समोर पाहुनि जया नाचावया लागले, ॥
चित्तीं चातक तोषले बहु तृषा लागोनि जे शोषले. ॥
तो वृष्ठ्यन्मुख मेघ होय, इतुक्यामाजीं अकस्मात हा ॥
वारा उद्भवुनी कसा विखरता झाला, तयातें पहा? ॥ ४५ ॥

जीमाजीं कमळें नवीं विकसुनी, त्यांच्या परागें जला, ॥
येई फार सुगंध, भृंग करिती गुंजारवा मंजुला, ॥
ऐशी सुंदर वापिका त्यजुनियां, हंसा, कुठें जावया ॥
होशी उत्सुक, सांग, लाजशि असा कां फार बोलावया? ॥ ४६ ॥

थरकति अरविंदें मंद वातें, तयांचें ॥
रज उडुनि सुगंधी रंगवी अंग ज्यांचें, ॥
विपुल मृदु मृणालें भक्षिलीं स्वस्थ जेणें, ॥
अणुभर हि कधीं जो स्वप्नि ही दुःख नेणें. ॥ ४७ ॥

उडत उडत जातां हंस तो मानसींचा ॥
मरु जनपद मार्गीं लागला त्यास सांचा, ॥

सरस कमल तंतू राहिले दूर भारी, ॥
श्रम करुनि मिळेना बापड्या कूपवारी. ॥ ४८ ॥

पानांमाजीं तरूच्या लपुनि बस कुठें, राज हंसा, कसा ही, ॥
जाती वर्षर्तुचे हे दिवस तंववरी सर्व कष्टांस साही, ॥
येऊनी शारदश्री पुनरपि फुलतां पद्मवृंदें, तयांचा ॥
भोक्ता नाहीं कुणी ही तुजविण दुसरा, जाण हा नेम सांचा. ॥ ४९ ॥

होऊनी हंस येथें बक वसत असे, रे मराळा, कशाला ॥
या ठायीं पातलासी ? निघुनि परत जा पाउलीं या घराला. ॥
नाहीं कांहीं परीक्षा मतिरहित अशा येथल्या या जनांतें, ॥
मानूनी ते तुलाची बक हसतिल कीं जाण या निश्चयातें. ॥ ५० ॥

ज्याच्या तीरीं समंतान्मधुरफलभरें वांकले वृक्ष भारी, ॥
ज्या माजीं पद्मखंडें फुलुनि विखरती गंध चित्तापहारी, ॥
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पंकिला पल्वलातें, ॥
त्या हंसाच्या बकांनीं जरि पद दिधलें मस्तकीं, योग्य त्या तें. ॥ ५१ ॥

पुष्पांहीं पल्लवांहीं विविध तरुवरां सर्वदां भूषवी जो, ॥
नानाधान्यें फळें हीं पिकवुनि सुखवी प्राणिमात्रां सदां जो, ॥
हर्षे पाहूनि ज्यातें जग, धरिशि मनीं त्रास त्या अंबुदाचा, ॥
हंसा वर्णे जरी तूं धवल, तरि गुणें कृष्ण आहेस साचा. ॥ ५२ ॥

विजा चमकती न जों नभिं, न मेघ जों वर्षती, ॥
जलाशय सरोवरें कलुषता न जों पावती, ॥
प्रफुल्ल नवपंकजीं कमलिनीवनीं तोंवरी ॥
विलास, कलहंसका, सकल ही मनींचे करी. ॥ ५३ ॥

गेलें गांभीर्य सारें, सकल कमलिनी वाळुनी कोळ झाल्या, ॥
हर्षे झुंडी बकांच्या मिळुनि जलचरां खावयालागीं आल्या, ॥

हंसा, येथें कशाला बससि अजुनि तूं? ऊठ, रे ऊठ वेगें, ॥
नाहीं स्वच्छा शरीरा चिखल उडुनियां जोंवरी डाग लागे. ॥ १४ ॥

**कृष्णशास्त्री चिपळूणकर.**

---

## निराशा.

झालें अतां काय जगांत आहे ॥ आशा निवाली मग काय राहे ॥
आशाच कीं जीवन मानवाचें ॥ आशेविणें जीवित शुष्क साचें ॥ १ ॥
आशा नरां हांसवि खेळवी ती ॥ आशेमुळें वृद्धहि नाचताती ॥
आशा नरांनां उठवी सकाळीं ॥ आशाच दे स्वस्थहि झोंप वेळीं ॥ २ ॥
आशेस द्यां लोटुनि दूर कोठें ॥ झालीं जनांचीं फुटकीं ललाटें ॥
प्रकाश गेला मग काय राहे ॥ सारेंच काळें जगतीं पहा हें ॥ ३ ॥
आली नराच्या हृदयांत प्रीति ॥ कोठून सांगा? मजला झणीं ती ॥
आशेविणें प्रीति जळूनि खाक ॥ होऊनि जाईल खरेंचि राख ॥ ४ ॥
आशा असे शक्ति तशीच भक्ति ॥ आशेमुळें वीरहि झुंजताती ॥
आशेमुळें नांगर हांकिताती ॥ आशा स्त्रियां देत सुरूपता ती ॥ ५ ॥
नसे मला या जगतांत कांहीं ॥ आशा कशाची उरली मुळींही ॥
आशेमुळें फार कठोर झालें ॥ माझें जिणें, व्यर्थ म्हणूनि गेलें ॥ ६ ॥
उपाय त्याला परि काय आतां ॥ गेलें न तें येत फिरूनि हाता ॥
ढाळोनि अश्रू अति शुष्क झाले ॥ डोळे, परी दुःख न तें निवालें ॥ ७ ॥
धोंड्यापरी काळिज घट्ट झालें ॥ मनांतलें मार्दव नष्ट झालें ॥
सांगा कशाच्या घडलें प्रभावें? ॥ आशा निराशा बहु त्यास नांवें ॥ ८ ॥

**“मार्गण.”**

---

## आंधळा झालों तर.

“मेला होशिल तूं जगास” म्हणती झालों जरी आंधळा ॥
खोटें हें भय काय चित्त सकलव्यापी नसे हें मला? ॥

सृष्टीचें मधु बाह्य रूप न दिसो डोळ्यांस, चिंता न ते ॥
ती हंसीसम मानसीं मम सदा सानंद हो खेळते ॥ १ ॥

मूर्ती मोहक ज्या पुढेंच दिसती स्वप्नांत जागेपणीं ॥
त्या त्या काय त्रिलोकितों सकल मी सांगा मला लोचनीं ॥
ज्या अत्युत्तम लाडक्या अधिक त्या संस्पष्ट होती मला ॥
जेव्हां मी नयनां मिटून बघतों प्रेमें पुढें त्यांजला ॥ २ ॥

होती शंभर कोस दूर मजला सोडून मूर्ती प्रिया ॥
मध्यें डोंगर उंच उंच टपले दृष्टीस झांकावया ॥
होतों पाहत मी तिला परि सदा आश्चर्य हें काय न? ॥
नेत्रें इष्ट मला परंतु नच हें नेत्रावलंबी मन ॥ ३ ॥

जरी नेत्रें गेलीं तरि अनुरती काय सरली ॥
जरी नेत्रें गेलीं तरि मति मला का विसरली ॥
जरी नेत्रें गेलीं तरि हृदय हें का हरवलें ॥
जरी नेत्रें गेलीं तरि अशुभ तें काय घडलें ॥ ४ ॥

सृष्टी अमर्याद नवीन कांहीं ॥
पुढें तुला रे दिसणार नाहीं ॥
खरें; परंतु नवसृष्टिकर्त्री ॥
माझी सखी दूर न काव्यशक्ति ॥ ५ ॥

आजवरी सम जी सुखदुःखीं ॥
अंधपणीं कशि ती मज टाकी ॥
दाविल नित्य नव्या मज गोष्टी ॥
देइल ही कविता नव तुष्टी ॥ ६ ॥

ज्याला कोणि जगांत मौन म्हणती किंवा कुणी स्तब्धता ॥
त्याची ही श्रवणांविना परिसतों मी गोड वाचालता ॥

किंवा अक्षयता जयेस म्हणती आद्यन्त तीचा दिसे ॥
झालों मी जरि आज अंध बहिरा तें दुःख मातें नसे ॥ ७ ॥
अनेकविधदर्शनीं मन चळे तुझ्यापासुनी ॥
म्हणून जग चिंतितें तुज विलोचनां झांकुनी ॥
बघेन तुजलाच मी सतत अंध झाल्यावरी ॥
नकोत नयनें प्रभो ! विहरशी मनीं तूं तरी ॥ ८ ॥

टिळक.

# चौथी ( कवी ).

## प्रश्नोत्तररत्नमाला.

श्रीशंकरभगवत्पदरचित प्रश्नोत्तराख्य मणिमाला ॥
प्राकृत शब्दगुणीं मी रचितों बुध हो ! परंतु प्रतिपाला. ॥ १ ॥
कंठींच असों द्या हो ! हे मणिमाला अलभ्य, पारि साची ॥
प्रेमें सुलभचि रसिकां; कीर्ति इणें जिंकिलीच परिसाची. ॥ २ ॥
प्रश्नोत्तरमणिमाला हे केवळ होय हो ! सुधाधारा. ॥
खळ राहुलाचि न जिरे, त्यांस जिरे, भजति जे बुधाधारा. ॥ ३ ॥
श्रीशंकरें दिली हे भजकां रसिकांसि कामदा कपिला; ॥
श्रीरामें जशि गाया प्याया निज कीर्ति त्या महाकपिला. ॥ ४ ॥
कोण न शोभे विमल 'प्रश्नोत्तररत्नमालिका' धारी? ॥
द्रष्टा दृष्टार्थांचा स्वसाधनीं जो सुजाण संसारीं. ॥ ५ ॥
सच्छिष्यबोधरीती करुनि, श्रीशंकरें दयानिधिनें ॥
ग्राह्याग्राह्य पदार्थ स्पष्टचि केले असे अशा विधिनें. ॥ ६ ॥
'स्वामी ! काय ग्राह्य? स्वमुखें सांगा, करा दया पूर्ण;' ॥
'शिष्या ! स्वीकारावें गुरुवचन प्रणतिपूर्व अतिपूर्ण.' ॥ ७ ॥
'काय त्यागावें? तें स्वामी ! सांगा अजाणत्यास मज.' ॥
'शिष्या ! अकार्य सारें टाकावें, हें मनीं बरें समज.' ॥ ८ ॥
'स्वामी ! कोण गुरू हें सांगा, होईन संशयोन्मुक्त.' ॥
'शिष्या ! जो तत्वज्ञ प्राणिहिताकारणें सदोद्युक्त.' ॥ ९ ॥
'सत्वर काय करावें? स्वामी ! तुमचाचि बोल मज वेद.' ॥
'वत्सा ! शीघ्र करावा ज्ञानें संसारसंततिच्छेद.' ॥ १० ॥

'स्वामी ! मोक्षतरूचें बीज कथावें तुम्हीं मुखोदक जें.' ॥
'शिष्या ! साधो ! आइक अतिशुद्ध ज्ञान, आणि सक्रिय जें.' ॥ ११ ॥
'पाथेय काय मार्गीं? सांगा; तुमचेंचि वाक्य बहु पथ्य.' ॥
'शिष्या ! धर्मशिधोरी फार बरी, हेंचि जाण तूं तथ्य.' ॥ १२ ॥
'शिष्याज्ञानतमोर्का ! गुरुराया ! कोण शुद्ध या लोकीं?' ॥
'शिष्या ! ज्याचें मानस निर्मळ, लोकत्रयांत शुचि तो कीं.' ॥ १३ ॥
'पंडित कोण? स्वामी ! छात्रजनाच्या अनंतसुखहेतो !' ॥
'शिष्या ! सद्बुद्धिसुधाकलशा ! जेथें विवेक राहे तो.' ॥ १४ ॥
'हालाहलापरिसही दारुण विष कोणतें? आजि ! स्वामी !' ॥
'अपमानिलें गुरूतें वत्सा ! तें गरळ जाणतों आम्हीं.' ॥ १५ ॥
'स्वामी ! कारुण्यनिधे ! संसारीं सार काय? सांगावें.' ॥
'गुरुराया ! चिंतामणिचरणा ऐसें तुला न कां गावें?' ॥ १६ ॥
'वारंवार हुडकितां, हेंचि मनुष्यांत सार आढळलें;' ॥
'शिष्या ! जें जन्म क्षण न, त्यजुनी सुपरहितपदा, ढळलें.' ॥ १७ ॥
'मद्यापरि मोहप्रद काय? स्वामी ! दया करूनि वदा.' ॥
'शिष्या ! पुत्रकलत्रीं सुरेहुनि स्नेह दे अपार मदा.' ॥ १८ ॥
'तस्कर कोण? स्वामी !' 'वत्सा ! जे विषय, दस्यु ते जाण.' ॥
'कोण भवाची वल्ली?' शिष्या ! तृष्णाचि रे ! तुझी आण.' ॥ १९ ॥
'स्वामी ! वैरी कोण?' 'च्छात्रा ! तो शत्रु जो अनुद्योग, ॥
'ज्या उद्योगाभावें पावति विलयासि सर्व सुखभोग.' ॥ २० ॥
'स्वामी ! कोणापासुनि भय लोकीं फार पावति प्राणी?' ॥
'शिष्या ! मरणापासुनि भय पावति सर्व, ही खरी वाणी.' ॥ २१ ॥
'स्वामी ! कर्णांजलिंनीं सेवाया काय हो सुधेसारें?' ॥
'शिष्या ! पीयूषाहुनि फार सदुपदेशभाषणें सारें.' ॥ २२ ॥
'गुरुतेचें मूळ मला स्वामी ! कांहींच ठाउकें नाहीं.' ॥

‘शिष्या! न मागणें हें गौरवबीज स्वमानसीं पाहीं.’ ॥ २३ ॥
‘दारिद्र्य कोण सांगा? बहु पुसतों, कीं तुम्हां नसे रोष.’ ॥
‘शिष्या! बरवें पुशिलें; दरिद्रपण तेंचि, जो असंतोष.’ ॥ २४ ॥
‘लघुता कोण? स्वामी! पुसतों हें संशयाब्धिसेतूतें.’ ॥
‘याच्ञा लघुत्वकारण, हें कैसें ठाउकें नसे तूतें?’ ॥ २५ ॥
‘जीवित तें कोण? वदा भक्तभ्रमराचिया सदरविंदा!’ ॥
‘वत्सा! तेंचि जिणें रे! ज्याची झाली नसे जगीं निंदा.’ ॥ २६ ॥
‘जाड्य कशास म्हणावें? हें सांगा जी! मला सुदासास.’ ॥
‘शिष्या! जो कौशल्यप्राप्तीसाठीं नसेचि अभ्यास.’ ॥ २७ ॥
‘जागर कोण? स्वामी! पुरवाया दासकाम हा भागा.’ ॥
‘जागर मुख्य विवेकाचि; पुस तूं, भीतोसि कां महाभागा!’ ॥ २८ ॥
‘स्वामी! हेंहि कळों द्या, निद्रा ती कोणती? कशी आहे?’ ॥
‘शिष्या! जे जंतूला मोहुनियां काय मूढता राहे.’ ॥ २९ ॥
‘कमलदलस्थजलकणासम चंचळ कोण तो पदार्थ? गुरो!’ ॥
‘बा! गा! यौवन, आयू, द्रव्य चपळ; बोध हा मनांत उरो.’ ॥ ३० ॥
‘शारदशशिकिरणासम आल्हादक कोण? सांग गुरुवर्या!’ ॥
‘शिष्या! ऐसे सज्जन, ज्यांची हरिती त्रिताप परिचर्या.’ ॥ ३१ ॥
‘स्वामी! कोण सुदुःसह सर्वां नरकांपरीस ही नरक?’ ॥
‘परवशताचि निरय, हें जाणुनि, तूं संग सोडुनी सरक.’ ॥ ३२ ॥
‘गुरुजी! मज उपदेशा जगत्रयीं कोणतें अखंड सुख?’ ॥
‘शिष्या! कळेल तुज तें, विषयीं होशील जेधवां विमुख.’ ॥ ३३ ॥
‘स्वामी! सत्यपदार्थज्ञानसुखेंकरुनि मी असें रहित.’ ॥
‘शिष्या! तरि तूं कर रे! तनुवचनमनें करूनि भूतहित.’ ॥ ३४ ॥
‘स्वामी! जे जे प्राणी, त्यांचें प्रिय वस्तु मुख्य तें काय?’ ॥
‘शिष्या! पंच प्राणाचि लोकांचा प्रियपदार्थसमुदाय.’ ॥ ३५ ॥

'स्वामी! हेंही सांगा, दानांत श्लाघ्य कोणतें दान?' ॥
'साधो! जें फलवांछावर्जित तें दान म्हणति सज्ञान.' ॥ ३६ ॥
'मित्र कवण? हें सांगा, संशय न तुम्हांविना दुजा छेदी.' ॥
'तो मित्र होय बापा! पापाचारांत जो बुडों नेदी.' ॥ ३७ ॥
'कोण अलंकार? गुरो! सांगाया योग्य तूंचि होशील.' ॥
'शिष्या! जरि हें पुससी, तरि भूषण मुख्य आपुलें शील.' ॥ ३८ ॥
'गुरुराया! वाचेचें मंडण नें, तें असो मला विदित.' ॥
'वाग्भूषण सत्यचि हें शिष्या! जाणूनि नित्य हो मुदित.' ॥ ३९ ॥
'ज्याचें अनर्थ फळ तें काय? श्रीगुरुवरें निवेदावें.' ॥
'शिष्या! विषयांपासुनि न विवारित चित्त तें असो ठावें.' ॥ ४० ॥
'स्वामी! गुरो! दयाब्धे! सर्वांला कोणती सदा सुखदा?' ॥
'शिष्या! सज्जनमैत्री, जीणें स्तविताति सर्व लोक सदा.' ॥ ४१ ॥
'सर्वांही व्यसनांच्या नाशीं देवा! समर्थ कोण बरें?' ॥
'अखिलव्यसनध्वांतद्युमणि त्यागाचि मनांत जाण खरें.' ॥ ४२ ॥
'स्वामी! अंध म्हणावा कोण?' 'छात्रा! अकार्यरत होतो.' ॥
'कोण बधिर? गुरुवर्या!' 'हित वचनातें न आयके जो तो.' ॥ ४३ ॥
'स्वामी! मूकपदार्थश्रवणीं श्रवणासि लागली भूक.' ॥
'वत्सा! समयीं नेणें प्रिय बोलायासि, तो खरा मूक.' ॥ ४४ ॥
'गुरुजी! मरण कवण? हें सांगुनि मजला निवृत्ति द्या विपुला.' ॥
'बाळा! मूर्खत्वाचि रे! निधन महा, तें नसो नसो रिपुला.' ॥ ४५ ॥
'स्वामी! मोल जयाला नाहीं लोकीं, असें असे काय?' ॥
'शिष्या! समयीं दिधलें अमूल्य; चुंबी तृणासि नरराय.' ॥ ४६ ॥
'शल्य असे कोण? गुरो? मरणापर्यंत ज्यामुळें ताप.' ॥
'तें शल्य, नेत्र झांकुनि, केलें असते सुगुप्त जें पाप.' ॥ ४७ ॥
'यत्न करावा कोठें? हें सांगा जी! तुम्ही महाज्ञानी.' ॥

'शिष्या! यत्न करावा विद्याभ्यासीं, सदौषधीं, दानीं.' ॥ ४८ ॥
'पूज्यहि कोण? स्वामी! हें उपदेशा कृपा करूनि मला.' ॥
'तो पूज्य, वृत्त ज्याचें निर्मल, निष्काम, तो प्रशांत भला.' ॥ ४९ ॥
'कोण म्हणावा अधम? स्वामी! सांगा, करीन मी श्रवण.' ॥
'जे सद्वृत्तापासुनि चळला, त्याहूनि नीच तो कवण?' ॥ ५० ॥
'स्वामी! पुरुषें कवणें, न करुनि आयास जिंकिलें त्रिजगा?' ॥
'सत्यक्षमागुणाढ्यें जग जिंतिलें; तूंहि त्या गुणा भज गा!' ॥ ५१ ॥

**मोरोपंत.**

---

## शिशुदर्शन.

त्यजुनि माउलिचा मृदु अंक तो ॥ कठिण भूवरि कां शिशु रांगतो ॥
वरिवरी निरखी जननीमुखा ॥ प्रणयकेलि करी सह-कौतुका ॥ १ ॥
करुनियां मधुहास्य पहा कसा ॥ विकसवी निज आननसारसा ॥
शिशु न हा शशितुल्यचि वाटतो ॥ निरखितां मुद अंतरिं दाटतो ॥ २ ॥
असित कुंतल शोभति मस्तकीं ॥ अलि जसे कमलीं विमलोदकीं ॥
चिमुकल्या छबुल्या मनमोहना ॥ तव सुदर्शन हर्ष न दे कुणा ! ॥ ३ ॥
करपदादि मनोहर गोंडस ॥ दुडुडु धांवशि जें मृगपाडस! ॥
क्षणभरीं स्थित राहुनि चित्रसा ॥ निरखिशी तरि काय शिशो असा ॥ ४ ॥
मृगपती विपिनांत विहारती ॥ वरिवरी अवलोकिति मागुतीं ॥
स्मरण तें घडतें तुझिया कृतीं ॥ असशि बाल परी गमसी कृती ॥ ५ ॥
परम विस्तृत वाङ्मय वृक्ष हा ॥ तुजसमोर उभाचि असे पहा ॥
सुमनतुल्य विराज तयावरी ॥ यशसुगंधित दिक् सकला करीं ॥ ६ ॥

**मनोरंजन.**

---

## द्रुपदशासन.

पाचारूनि शिष्य सकळ ॥ द्रोण बोले उतावीळ, ॥
'गुरुदक्षिणा ओपिता काळ ॥ प्राप्त झाला वीर हो! ॥ १ ॥
बहुकाळ वसे माझिये मनीं ॥ तुम्हीं संकल्प केला वचनीं ॥
तें सत्य करूनि आमुचे ऋणीं ॥ उत्तीर्ण झालें पाहिजे. ॥ २ ॥
द्रुपदराजा पंचाळपती ॥ रणीं जिंकोनि सर्व शक्ती ॥
बांधोनि ओपिल्या माझे हातीं ॥ गुरुदक्षिणा पावली.' ॥ ३ ॥
ऐकोनि आचार्याचें वचन, ॥ 'अवश्य' म्हणती कौरवगण; ॥
आज्ञापितां दुर्योधन ॥ प्रस्थानभेरी ठोकिल्या. ॥ ४ ॥
सज्य केली चातुरंग सेना ॥ घाव घालोनियां निशाणा ॥
अश्व कुंजर रथिये नाना ॥ शस्त्रास्त्रीं सिद्धिले ॥ ५ ॥
वाद्यें वाजूं लागलीं अपार ॥ बळें चालिले कौरवभार, ॥
हडबडलें पांचाळपुर ॥ वार्ता पुढें परिसोनी. ॥ ६ ॥
बंधू प्रधानसहित सेना ॥ वीरश्री चढली यज्ञसेना, ॥
क्षुद्र पक्षी देखोनि श्येना ॥ आवेश न धरवे ज्यापरी. ॥ ७ ॥
कडकडाटें वीरभारीं ॥ पांचाळ पातला बाहेरी ॥
उभयदळाचे झुंजारीं ॥ रणकल्लोळ माजला. ॥ ८ ॥
अर्जुन विनवी आचार्यातें, ॥ 'मनीं अहंकार कौरवांतें ॥
धरूनि आणूं द्रुपदातें ॥ शौर्यबळें आपुलिया. ॥ ९ ॥
परंतु जाणवेल अंतःकरणा, ॥ नाश पावेल कौरवसेना, ॥
रणीं धैर्य न धरवे कोणा, ॥ पाठी देवोनि पळतील. ॥ १० ॥
रणमूर्ध्नीं पांचाळराज ॥ धरूं न शकती धृतराष्ट्रतनुज ॥
दर्प भग्न झालिया काज ॥ सिद्धी आम्हीं पावणें. ॥ ११ ॥
यावरी कांहीं स्वल्प करणी ॥ करून दाखवूं तुमचे नयनीं ॥
तोंवरीं स्वस्थ रथासनीं ॥ अर्धक्रोशानंतरें ॥ १२ ॥

राहून कौतुक पाहूं येथ;' ॥ म्हणोनि थोकले द्रोणासहित. ॥
तंव संग्राम अत्यद्भुत ॥ उभय भारीं माजला. ॥ १३ ॥
ऐसा आवांका धरूनि पोटीं ॥ द्रोणाचार्य घेऊनि पाठीं ॥
धर्म भीम आणि किरीटी ॥ युद्ध दृष्टी लक्षिती. ॥ १४ ॥
बळें दुर्धर पांचाळदळ, ॥ लोटलें जैसें समुद्रजळ ॥
कौरवसेना वडवानळ ॥ धडाडीत प्रतापें. ॥ १५ ॥
एक धांवे विझवावया ॥ एक धांवे शोषावया ॥
उभयभागीं वीरश्रिया ॥ तांडव नाचों लागले. ॥ १६ ॥
कुंजरावरी कुंजरभार ॥ राउतावरी अश्वस्वार ॥
नानाशस्त्रीं पायींच वीर ॥ घोरकंदना मिसळले. ॥ १७ ॥
रथ लोटले रथियावरी, ॥ जैसे गिरिवरी महागिरी, ॥
धडका लागतां अंबरीं ॥ नाद उठती कडकडां. ॥ १८ ॥
शूरत्वाचेनि बळाभिमानें ॥ पांचाळ मानी जैसीं तृणें ॥
गजदळावरी पंचाननें ॥ धांविजे तैसा धांवत. ॥ १९ ॥
रथेसीं एकटा पातला पुढें ॥ लक्षें नेमिलें कौरवतोंडें ॥
धनुर्षी योजिलें कुराडें ॥ वज्रातुल्य तेजस्वी. ॥ २० ॥
घनें घातलीं सात वांकुडी ॥ तैसी संधानक्रिया गाढी ॥
धनुष्य ओढावया ओढी ॥ वाव न साधे कौरवां. ॥ २१ ॥
भिन्न भिन्न शत सायका ॥ नेमूनि विंधिलें एकएका ॥
समोर यावया आवांका ॥ सहसा कोणा न धरवे. ॥ २२ ॥
उरीं शिरीं बाहुवदनीं ॥ वीर भेदिले तीक्ष्णबाणीं ॥
अश्वकुंजरांचिया श्रेणी ॥ एकएका त्रासिलें. ॥ २३ ॥
अग्निवेशगुरूची दीक्षा ॥ लक्षितां न लक्षवे लक्षा ॥
चोज वाटे मुख्यमुख्या ॥ कर्णादिकां मानसीं. ॥ २४ ॥
दुर्योधन दुःशासन ॥ विकर्ण सुबाहु दीर्घलोचन ॥

झुजा मीनले, तयां बाण ॥ असंख्यात ओपिले. ॥ २५ ॥
द्रुपद म्हणे कौरवांतें, ॥ 'द्रोणासमान मानूनि मातें ॥
धनुष्य ठेवूनियां हातें ॥ दंडवतें मज घाला. ॥ २६ ॥
माझिया गुरुबंधूचे शिष्य ॥ ते मी मानीं आपुले दास ॥
विद्या अपूर्ण ते विशेष ॥ मजपासाव अभ्यासा. ॥ २७ ॥
व्यर्थ जयाची दुराशा ॥ धरोनि करितां संग्रामशोषा ॥
गुरुअवज्ञामहादोषा ॥ पात्र तुम्हीं झालेती.' ॥ २८ ॥
जेंवी अलातचक्ररेखा ॥ तेंवी हस्तवेग देखा ॥
कौरवसेनेचिया लोका ॥ अति आक्रांत मांडला. ॥ २९ ॥
द्रुपदरायाचे शरमारीं ॥ कौरव खोंचले सहपरिवारीं ॥
पळाले देखोनि समरीं ॥ पांचाळपुरीं आल्हाद. ॥ ३० ॥
शंख भेरी मृदंग काहाळी ॥ गोंधळ माजे पांचाळदळीं ॥
महावीरांची आरोळी ॥ जयजयकार प्रवर्तला. ॥ ३१ ॥
नाना शस्त्रे धरूनि मुष्टीं ॥ नगरवासी कोट्यानकोटी ॥
कौरवसेनेचिये पाठीं ॥ ताडण करीत पातले. ॥ ३२ ॥
द्रुपदाचें शरसंधान ॥ नागरिकांचें करताडण ॥
तेणें कौरवांचें सैन्य ॥ दाही दिशा भंगलें. ॥ ३३ ॥
कर्ण विकर्ण दुःशासन ॥ थारों न शके दुर्योधन ॥
अनेक राजकुमर जाण ॥ माघारले परौते. ॥ ३४ ॥
धृतराष्ट्राचे बलिष्ठ तनुज ॥ रायादुर्योधनाचे अनुज ॥
पळतां देखोनि पांचाळराज ॥ टाळी पिटोनि हांसतसे. ॥ ३५ ॥
म्हणे, 'अंधबाळकें चक्षुहीनें ॥ सैरा पळती आडरानें ॥
हातीं धरूनि अभयदानें ॥ नीट वाटे लावणें.' ॥ ३६ ॥
घाय वार लागले एका ॥ दीर्घस्वरें मारिती हाका ॥
एक म्हणती, 'राखा राखा ॥ धांवा भीमा! अर्जुना!' ॥ ३७ ॥

सेना परिभविली मोडें ॥ पळत पातली पांडवांकडे ॥
हें देखोनि वीर गाढे ॥ भीमार्जुन क्षोभले. ॥ ३८ ॥
आचार्यासीं करूनि नमन ॥ सवेग उठले दोघेजण ॥
रथीं वळंघला अर्जुन ॥ धनुष्यबाणीं सज्जला. ॥ ३९ ॥
गदा घेऊन उतावीळ ॥ पुढां धांविन्नला भीम सबळ ॥
जेंवी मांडल्या प्रळयकाळ ॥ दंडपाणी भूतांतें. ॥ ४० ॥
पादचारी रणवेताळ ॥ घोषें गर्जवी ब्रह्मांडगोळ ॥
वर वळला देखोनि विकळ ॥ रणोत्साह वीरांचा. ॥ ४१ ॥
तिमिंगिल निघे समुद्रजळीं ॥ तैसा भीम पांचाळदळीं ॥
बळें मिसळतां खळबळी ॥ सेना यज्ञसेनाची. ॥ ४२ ॥
असंख्यात कुंजर थाट ॥ स्रवती मदोदकाचे पाट ॥
त्यावरी उठावला बलिष्ठ ॥ गदाघायीं ताडित. ॥ ४३ ॥
कुंभस्थळापासूनि धरणी ॥ रक्तप्रवाह ताम्रवर्णी ॥
मुक्ताफळांचिया श्रेणी ॥ उभयभागीं विखुरल्या. ॥ ४४ ॥
गदाघायीं कुंभस्थळें ॥ फुटती जैसीं सुपक्व फळें ॥
कीं मृद्घटपंक्ती लोहमुसळें ॥ जेंवि फुटती फटफटा. ॥ ४५ ॥
बळें बैसतां गदाघात ॥ कुंजर आणि महावंत ॥
पडती जैसे शिखरसहित ॥ शल्य वज्रें ताडितां. ॥ ४६ ॥
विशाळ वारणांच्या ओळी ॥ असंख्य पाडोनि रणमंडळीं ॥
पुढां धांविन्नला आतुर्बळी ॥ महारथी मारावया. ॥ ४७ ॥
अश्व सारथी रहंवर ॥ एके घायीं करी चूर ॥
पाठीं राउतेसीं वार ॥ घाव घालूनि दुखंडी. ॥ ४८ ॥
नागरिकें मानूनियां दीनें ॥ न मारिजेती भीमसेनें ॥
शब्दें वळिजेती गोधनें ॥ तेंवी म्हणे 'परता रे.' ॥ ४९ ॥
येरीकडे विजयी पार्थ ॥ पुरवावया गुरूची आर्त ॥

द्रुपद लक्षूनियां रथ ॥ वातवेगें प्रेरिला. ॥ ५० ॥
अश्वरथकुंजरभार ॥ विभांडीत रणझुंजार ॥
रथयोद्धे शतसहस्र ॥ बाणधारा खंडिले. ॥ ५१ ॥
पदातीदळची आंगवण ॥ तृणप्राय लेखिजे कवण ॥
सुटतां अर्जुनाचे बाण ॥ उभेची प्राण सांडिती. ॥ ५२ ॥
बाणधारा अकस्मात ॥ शिरें उडती मुगुटासहित ॥
शस्त्रीं उभारिले हात ॥ ते नभांत उसळती. ॥ ५३ ॥
बाण लागोनियां चरणीं ॥ कोथळे पडताती धरणी ॥
वेग न लक्षवे नयनीं ॥ संधानाचा सर्वथा. ॥ ५४ ॥
अशुद्ध्रनदीचे खळखळाट ॥ पुसती सागराची वाट ॥
मार्ग दावावया नीट ॥ अपार प्रेतें चालिलीं. ॥ ५५ ॥
असंख्य निमाले रणतळवटीं ॥ उरले तीहीं दीधली पाठी ॥
अर्जुनबाणाचिये वृष्टी ॥ ठाव न दिसे लपावया ॥ ५६ ॥
हाहाकार माजला प्रबळ ॥ फुटलें पांचाळाचें दळ ॥
एक म्हणती 'प्रळयकाळ ॥ अत्यद्भुत मांडला.' ॥ ५७ ॥
असो. फाल्गुन चापधारी ॥ धाविन्नला द्रुपदावरी ॥
तेणें पार्थ रणचत्वरीं ॥ सहस्त्रबाणीं विंधिला. ॥ ५८ ॥
ते साहोनी चापपाणी ॥ पांचाळ विंधिला लक्षबाणीं ॥
हें देखोनि रणांगणीं ॥ सत्यजित धाविन्नला. ॥ ५९ ॥
द्रुपद घालूनियां पाठीं ॥ युद्धा पाचारिला किरीटी ॥
पार्थें हांसोनि घेतां मुष्टी ॥ बाणदशक सोडिलें. ॥ ६० ॥
तें तोडोनि सत्यजितें ॥ पार्थ विंधिला बाणशतें ॥
तें खंडूनि पांडुसुतें ॥ चाप हस्तींचें छेदिलें. ॥ ६१ ॥
आणीक चाप धरूनि करीं ॥ सत्यजित लोटला समरीं ॥
जेंवि जिंकावया वज्रधारी ॥ पूर्वी शंबर पातला. ॥ ६२ ॥

द्रुपद आणि सत्यजित ॥ दोघीं पैं खिळिला पार्थ, ॥
म्हणती, 'वाटिवेचा हात ॥ पुढतीं दावीं आमुतें.' ॥ ६३ ॥
दोघे जुंझार भिनले रणीं ॥ शंका नाहीं अर्जुना मनीं, ॥
भीम देखतां हे नयनीं ॥ चोज पाहे अंतरें. ॥ ६४ ॥
अश्व सारथी आणि रथ ॥ चूर्ण केले निमिषार्धांत ॥
चरणचाली सत्यजित ॥ पुढती झूजा मीनला ॥ ६५ ॥
शिरच्छेदावया हातें ॥ पुढें पाऊल टाकिलें पार्थें ॥
धाकें सत्याजित तेथें ॥ हाक मारूनि पळाला. ॥ ६६ ॥
पुढें द्रुपदा आणि अर्जुना ॥ संग्राम झाला चौगुणा ॥
जैसा शक्र आणि वैरोचना ॥ शक्रपुरीकारणें. ॥ ६७ ॥
पांचाळाचें शरसंधान ॥ अर्जुना भासे जैसें तृण ॥
जेंवी कां शाब्दिकाचें ज्ञान ॥ निष्ठावंत न लेखी. ॥ ६८ ॥
गांडीवमंडळापासूनि पहा हो ! ॥ वर्षों लागला बाणसमूहो ॥
व्योमधरणीमाजी वावो ॥ वारियातें खुंटला. ॥ ६९ ॥
निबिड दाटले शर आकाशीं ॥ निःशेष लोपला तेजोराशी ॥
तम कोंदलें दाहीदिशीं ॥ कोण्ही कोणा न देखे, ॥ ७० ॥
अर्जुनाची संधानकळा ॥ आश्चर्य वाटे पैं सकळां ॥
पांचाळ म्हणे, 'कठीण वेळा ॥ मृत्युतुल्य मांडिली.' ॥ ७१ ॥
ध्वजच्छत्रासहित गुणी ॥ चाप छेदून पाडिलें धरणी ॥
तयासाठीं पंचबाणीं ॥ अश्व सारथी मारिले. ॥ ७२ ॥
भ्रमें जाकळिला गळां सर्प ॥ तेंवी भुलला पांचाळ नृप ॥
शरीरस्मरणाचा दीप ॥ हृदयालयीं मालवला. ॥ ७३ ॥
गांडीव ठेऊनि तांतडी ॥ रथाखालीं घातली उडी ॥
धांवोनियां आंगप्रौढी ॥ पांचाळ हातें वोढिला. ॥ ७४ ॥
उडी घालोनि महाडोहीं ॥ चुंची धरूनि काढिजे अही ॥

तया गरुडाऐसा पाहीं ॥ पांचाळ बाहीं कवळिला. ॥ ७५ ॥
एक हस्त ग्रीवेतळीं ॥ दुजा सूदला कटिमंडळीं, ॥
प्रचंड वृक्ष तैसा मौळीं ॥ वाहूनियां चालिला. ॥ ७६ ॥
अंगबळें उचलोनि हातीं ॥ आणोनि सूदला आपुले रथीं ॥
बंधुवर्गाचिया पंक्ती ॥ जयजयकारें गर्जती. ॥ ७७ ॥
पांचाळदळीं वाजली हाक ॥ धाकें पळाले एकएक ॥
आनंदले कुरुनायक ॥ हातें पिटिती टाळिया. ॥ ७८ ॥
मर्दावया पांचाळपुर ॥ वेगीं चालले कौरवभार ॥
प्रजा करिती हाहाकार ॥ तो अर्जुनें ऐकिला. ॥ ७९ ॥
दूत धाडोनि तांतडी ॥ सर्वांसी म्हणे, 'हे बुद्धी कुडी ॥
प्रजापीडणाचे प्रौढी ॥ काय श्लाघ्यता मिरवणें? ॥ ८० ॥
द्रुपद जिंकिलिया संग्रामीं ॥ द्रोणाची हे राज्यलक्ष्मी ॥
तुम्हीं अभिलाषितां कुकर्मी ॥ दोषविभागी होतसां. ॥ ८१ ॥
आमच्या गुरूचा गुरुबंधू ॥ तो आमुतें परम वंद्यू ॥
म्हणोनि न करा हस्तबंधू' ॥ मानें रथीं बैसविला. ॥ ८२ ॥
दूत प्रेरूनि आपण ॥ धरून आणविले प्रधान ॥
त्यांहीं सहित जेथें द्रोण ॥ तया ठाया पातले. ॥ ८३ ॥

मुक्तेश्वर.

---

## सीतास्वयंवर.

वंदूनियां पद तया प्रभुराघवाचे, ॥ सीतास्वयंवर निरूपिन लेश वाचे; ॥
जें व्यासवाल्मिकिमुखांतिल सार साचें ॥ संक्षेप मी कथिन रूप तया रसाचें. ॥ १ ॥
रावणादिक पती असुरांचे, ॥ वृंद वृंद नृपभूमिसुरांचे ॥
मान्यता जनक तो करि, पूजी; ॥ तों मुनींत दशकंठरिपू जी. ॥ २ ॥
बुद्धि जे अनुभावी जनकाची ॥ मूर्ति त्या निजसुखा कनकाची. ॥
पाहतां धणि पुरे न मनाची; ॥ न स्मृति स्फुरतसे नमनाची. ॥ ३ ॥

तो भक्तिसंस्कार वरी विदेहा, ॥ पाडी पदीं दंडाचि जेविं देहा; ॥
उठे, करी त्यावरि पूजनातें; ॥ करूनि पायीं अवनेजनातें. ॥ ४ ॥
आले बहू आणिकही घरा जे, ॥ पूजी यथायोग्य मुनींद्र राजे; ॥
त्यानंतरें आणवि त्या धनुष्या, ॥ न जें ढळे दैत्यसुरां मनुष्यां. ॥ ५ ॥

त्रिशत गण शिवाचे सत्वरें त्या धनुष्या ॥
उचलिति, न ढळे तें अन्यदेवां मनुष्यां. ॥
तिहिं बहुबहु कष्टें ठेविलें चाप रंगीं ॥
दचकति नृप सारे देखतां अंतरंगीं. ॥ ६ ॥

वाटे तयां परम दुर्लभ ते नवोढा.॥जेव्हां पुरोहित म्हणे, 'धनु कां न ओढा?'॥
कोणी धरूनि बसला बसल्याचि ठाया.॥उत्साहबुद्धि न मनाप्रति दे उठाया.॥७॥

तों दशकंठ अकुंठ विसां भुजिं तें विषकंठधनू उचली, ॥
कष्टत कोष्ठवरि, द्विज ओष्ठहि चावुनि, ज्या जरिनें खचली. ॥
चाप उरीं दडपे, झडपे मग आननपंक्ति धरे रचली; ॥
वासुनि दांत मुखांत दहांत पडे, मति गाढ तमीं पचली. ॥ ८ ॥

म्हणे विश्वामित्र स्वमनिं, 'सकळांचे भरवसे ॥
कळों आले; आतां मजजवळि विश्वंभर वसे. ॥
तया या श्रीरामाविण जनकजा अन्य न वरी,' ॥
म्हणोनी बोले कीं 'उठ रघुपती! साध नवरी.' ॥ ९ ॥

श्रीराम तेव्हां मुनिपादपद्मा वंदी, ॥ जयाचे स्वपदींच पद्मा. ॥
'आज्ञा गुरूची' म्हणऊनि 'साची ॥ करीन,' बोलोनि, उठे तसाची. ॥१०॥
शृंगारवीरकरुणादि नवां रसांची ॥ लीला जगद्गुरुचिया पदसारसांची; ॥
सप्रेम तो दशम, त्यासह, त्या नवांतें ॥ दावी सभेसि, उठतां, सुरमानवांतें'॥११॥
लज्जावती फार. तथापि त्याची ॥ शंका न सीता धरि हो पित्याची. ॥
म्हणे, 'अहा तात! अशा पणातें ॥ केलें तुवां संकट आपणातें.' ॥१२॥
'बहु कठोर' म्हणे 'धनु' जानकी. ॥ 'निकट कांसवपृष्ठसमान कीं. ॥

रघुपती तरि हा लघु आपण; ॥ अहह दारुण तात! तुझा पण. ॥१३॥
छावा उठे दशरथप्रभुदिग्गजाचा; ॥ वे चाप, इक्षुसम, तें पति भर्ग ज्याचा; ॥
शुंडा स्वबाहु उचलूनिच चालिला हो; ॥ घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो. १४

गजशिशु गति जैशी, जेवि शुंडा उभारी, ॥
रघुपति उचलूनी ये तसा बाहु भारी, ॥
करि करि चिमणासा इक्षुभंग स्वहस्तीं, ॥
प्रियहि भवधनुष्या ध्वंसि तैसा स्वहस्तीं. ॥ १५ ॥

वे इक्षु वारण जसा करपुष्करानें, ॥ श्रीराम चाप उचली, करपुष्करानें; ॥
विध्वस्तकानन दशाननअंबुजाचें ॥ चापप्रताप हरि आननअंबु ज्याचें. ॥१६॥

दशमुखकमळांतें, हस्तपद्मां विसांतें, ॥
पडत असुर मूर्छेमाजि, अब्जा तिसांतें; ॥
तनुजळजवनीं त्या वारणा अव्ययाला ॥
दृढ मृडधनु वाटे, उत्सवो दिव्य याला. ॥ १७ ॥

पद्माटवीस गज इक्षुमिषें निघाला; ॥ आला तथापिहि सरोजवनासि आला; ॥
तोंडें दहा पसरिलीं, सरली अहंता; ॥ पायीं उरीं ढकालि चाप तदीयहंता. ॥१८॥

पाहूनि पूर्वीं उठतांचि राम, ॥ श्रीमूर्ति देखूनि मनोभिराम, ॥
आली कृपा ते अशि विप्रसंगा; ॥ सिंहावलोकें परिसा प्रसंगा. ॥ १९॥

जन वदति, 'रमा हे आजि हो रामरामा.' ॥
मुनि वदति मुखें जे गाति कीं राम रामा. ॥
उडति, उडविती जे विप्र अंगोस्तरातें ॥
प्रभुहि भवधनुष्या मोडि या दुस्तरातें. ॥ २० ॥

एवं दशाननउरावरि चाप हा तें ॥ हाणोनि लात उचली; जन तें पहातें; ॥
पायीं उरीं ढकालि राम दशास्यहंता;॥ज्याचीं मुखें पसरलीं सरली अहंता! ॥१२॥
मोठ्या गजासहि जसा चिमणा हरी तो ॥ गंडस्थळें अति विदारुनि संहरीतो;॥
मोडील हें धनु असें कुशलांसि वाटे;॥चित्तांत वीररस ये नयनासि वाटे. ॥२२॥

घे आणि सज्जन मिषें करि चाप हातीं ॥ ओढी त्वरें, नवल सर्वही हे पहाती; ॥
स्वल्पा वयांत जन मानिति अद्भुतातें, ॥या अद्भुतें स्फुट करी सरसामृतातें. ॥२३॥

श्रीमद्राघवहस्तपद्मगुण ये कर्णात हो जेधवां, ॥
मोडे हें भवचाप; अर्थ इतुका दावी जगीं तेधवां; ॥
कीं श्रीरामकरारविंदगुणही कर्णांत येतां, स्वयें ॥
मोडे हें भवसायकासन, असा भावार्थ हा निश्चयें. ॥ २४ ॥

कडकडकड चापीं जेधवां शब्द जाला, ॥
तडतड विधिअंड त्रास दे अब्जजाला; ॥
तडफडि फणिराणा; कंप भूमंडलाला; ॥
खडबडि कनकाद्री; धाक आखंडलाला. ॥ २५ ॥

मोडी असें जो भवचाप हातीं, ॥ तों लोक रामीं रस हे पहाती. ॥
ते जानकी ये प्रिय देवराया ॥ रंगांत मातंगगती वराया. ॥ २६ ॥

गजगती जगतीप्रति दाविते; ॥ वसुमती सुमती सुख भाविते; ॥
स्वतनुजा तनु जाणतसे धरा; ॥ नवरि ते वरिते मणिकंधरा. ॥ २७ ॥

ध्वनि उठे चरणीं लघु भूषणीं; ॥ मन समर्पित ये रघुभूषणीं; ॥
परमहंसगतीच जया प्रिया ॥ परमहंसगती वरि ते प्रिया. ॥ २८ ॥

अनादि हाचि प्रिय नाथ जीचा; ॥ मुखेंदु तो या रघुनाथजीचा; ॥
लक्षूनिही अन्य मुखांबुजा ते ॥ पाहे नृपाच्या न मुखांबुजातें. ॥ २९ ॥

अर्पी गळां हार जया सुकाळीं ॥ सीता सुखाच्या पडली सुकाळीं. ॥
विचित्र वाद्यें जन वाजवीती, ॥ सीतापतीचें यश गाजवीती. ॥ ३० ॥

गेलीं अयोध्येसि सहस्र पत्रें ॥ कीं, ' राघवें हस्तसहस्रपत्रें; ॥
भवायुधध्वंसबळांत रंगीं ॥ यशोब्धि केला धवला तरंगीं. ॥ ३१ ॥

भवधनु रघुवीरें भंगिलें विश्वसारें; ॥
तुम्हि सहपरिवारें, पत्र वाचूनि सारें, ॥

निजतनयविवाहालागिं यावें प्रभावें.' ॥
जनक दशरथातें हें लिही प्रेमभावें. ॥ ३२ ॥

भिजवि सजळनेत्रें पत्र तें, ज्यांत वाची ॥
दशरथ नृप साची कीर्ति ते राघवाची. ॥
ठक सकळ सभा ते राहिली; प्रेमपाणी ॥
स्त्रवति नयनचित्तीं राम तो चापपाणी. ॥ ३३ ॥

करि विभुजयवार्ता भग्न वार्ता भवाची; ॥
नवल न धनुकांवी ध्वंसिली हे भवाची. ॥
श्रवणिं निघत, नाशी दुःख संसार सारा; ॥
दृढपण मृडचापाहूनिही ज्या असारा. ॥ ३४ ॥

दशरथनृपसंगें सर्व आमात्य, योद्धे, ॥
इतरहि जन, जातीं; नीघती जे अयोध्ये; ॥
सजलनयन सारे राघवातें पहातीं; ॥
'नवल' म्हणति 'यानें मोडिलें चाप हातीं'. ॥ ३५ ॥

पूजूनियां जनक त्यां सकळां स्वहातें, ॥ येऊनि दूर, बहुसादर ने गृहातें; ॥
श्रीरामकीर्ति वदनेंचि किती वदावी? ॥ यालागिं चापशकलें नरदेव दावी. ॥ ३६ ॥
असें देखतां मोडकें चाप, भारी ॥ शरीरीं गुढ्या रोमराजी उभारी; ॥
स्वमांडीवरी राम घेऊनि माय ॥ स्वयें पूसते; प्रेम चित्तीं न माय. ॥ ३७ ॥

म्हणे श्रीकौसल्या, 'परमसुकुमारा रघुपती! ॥
कडीं हातीं तूझ्या जडित जड चित्तांत खुपती; ॥
अशा या हस्ताब्जें, उचलुनि धनू, दोन तुकडे ॥
कसे केले? पाहों न शकति बळी थोर जिकडे.' ॥ ३८ ॥

नसे अंत या रामकीर्तिप्रवाहा; ॥ असो तें; पुढें रामसीताविवाहा ॥
जनां देखतां फार आनंद झाला; ॥ अजा पद्मजा भेटली श्रीअजाला. ॥ ३९ ॥

रामानुजां देखुनि सुप्रभावां, ॥ कन्या तिघी तीं भरतादिभावां ॥
विदेह तो देत विवाहरीती; ॥ कीर्ती जयांच्याच भवा हरीती. ॥ ४० ॥

पौरोहित्यहि निंद्य, तें विधिपिता दे या कुळाचें मला; ॥
'या संबंधमिषेंचि लाधसि' म्हणे 'रामा घनश्यामला.' ॥
तो मी आजि पुरोहितत्व करितों, वैवाहिकें मंगळें ॥
गातों रामरसें, कृतार्थहि असें केलें जगन्मंगळें. ॥ ४१ ॥

विश्वामित्र म्हणे, 'पवित्र चरणें माझ्या करीं आश्रमा; ॥
संगें ये मिथिलेसि; पादकमलें नासीं अहल्याश्रमा; ॥
मद्वाक्यें भवचापभंग करितां माला रमा कंधरीं ॥
घाली, आजि विवाह मंगळदिनीं सीतेसि हातीं धरीं.' ॥ ४२ ॥

गातां द्विजीं राघवमंगळाला, ॥ जो आड मायापट, तो गळाला; ॥
परस्परें अर्पिति अक्षतांतें, ॥ मुक्ताफळां नूतनअक्षतांतें. ॥ ४३ ॥

संतप्त सोनें जशि जोति यांची, ॥ सीताशरीरावरि मोतियांची, ॥
श्रीइंद्रनीळाचिसमें समान, ॥ श्रीरामदेहावरि भासमान. ॥ ४४ ॥

जंइ नवरि वरी हो श्री अजा श्रीअजाला; ॥
तंइ अगडधडाधों घोष इत्यादि झाला; ॥
ध्वनि गगनि अशब्दीं स्थावरा जंगमाचा ॥
प्रकृतिपुरुषयोगें चिज्जडासंगमाचा. ॥ ४५ ॥

समारंभ इत्यादि तो कोण वर्णी? ॥ वधूचा पिता तृप्ति दे सर्ववर्णी; ॥
हरी दुःख हें स्वल्पही रामवार्ता; ॥ निरोगी करी अल्पमात्रा भवार्ता. ॥४६॥

ओवाळितो स्वपुरुषार्थ चतुर्थहोमीं, ॥
रामावरूनि म्हणऊनि चतुर्थ हो मी. ॥
दे सर्व आंदण फणींद्रहि जें न मोजी; ॥

'न्यूनासि पूर्ण करिं तूंचि' म्हणे 'नमोजी!' ॥ ४७ ॥

साडे करी सजळलोचन; कन्यकेला ॥ सद्वंशजा निरवितां जन धन्य केला; ॥
कांत स्वशांति तिस घेउनि ये अयोध्ये;॥श्रीराम आणि जन सर्व अमात्य योद्धे. ४८
जिंके पुरीस फिरतां, जमदग्नि आला,॥जो भंगितां भवधनुष्य भडाग्नि झाला; ॥
ज्याला जगांत घडली बहुराजहिंसा,॥तो क्षत्रियानळ करी रघुराज हिंसा. ॥४९॥

दशरथ नृप त्याला कंकणें आणि चोळी; ॥
भृगुवर लपतां तो, हस्त सक्रोध चोळी; ॥
दशरथसुत जिंकी राम तैशास वाटे; ॥
दशमुखविजयाचें काय आश्चर्य वाटे? ॥ ५० ॥

ऋषित्वेंच ठेवूनि विप्रोत्तमाला, ॥ तयांतील रामांश रामीं मिळाला; ॥
अयोध्येप्रति श्रीस घेऊनि पावे; ॥ सदा हेचि हो मंत्र त्याचे जपावे. ॥५१॥
सीतास्वयंवर असें, बरव्या मनानें, ॥ लक्षूनि, शास्त्र अवलोकुनि, वामनानें ॥
भाषाप्रबंध रघुनाथकथारसांचा केला; ॥ प्रसाद अवधा पदसारसांचा. ॥५२॥

**वामनपंडित.**

---

## हीच संधी.

आहे वसंत जंव तों कुसुमास वेंच ॥
हा काळ अप्रतिम धांवतसे जवेंच ॥
हें पुष्प आज फुललें मधुगंध द्याया ॥
ग्रासील निष्प्रभपणा पण गा! उद्यां या ॥ १ ॥
विश्वप्रदीप रवि हा मिरवि प्रताप ॥
ती उन्नतिप्रति गतीच परी अपाप ॥
लाभे समुन्नतिपथास यथाक्रमानें ॥
अस्ताचला निकट त्या द्युतिविभ्रमा ने ॥ २ ॥

तारुण्य सत्समय निष्फळ या न वेंच ॥
घे हाण घाव जंव रक्त असे नवेंच ॥
मृत्युध्वजा फडकतां, खचतां उमेद ॥
निःशक्त होउनि बसाल करीत खेद ॥ ३ ॥
व्यर्थ क्षणा न दवडीं, त्यजिं सर्व भीड ॥
या जीवनार्थकलहीं शुचिभाव भीड ॥
खाऊं नको कचर, हो दृढ लोहकांब ॥
हूं! झाड आळस, नको म्हणुं "मृत्यु लांब." ॥ ४ ॥

**बाळकृष्ण अनंत भिडे.**

# चौथी ( पक्की ).

## मयूरकविकृत भीष्मार्जुनयुद्ध.

### ( भीष्मपर्व. )

युद्धारंभीं भीष्मद्रोणप्रमुखाखिलास्त्रधभीता ॥
शक्रसुता त्रिजगद्गुरुकृष्णें उपदेशिली स्वयें गीता ॥ १ ॥
बहुविधवाद्यरव अमरनाथादिविमान दाटलें खांत ॥
वर्णिति नरनारायण कोण तयांचे न भाट लेखांत ॥ २ ॥
भीष्म पुढें करुनि उठे प्रथम सुयोधन करावया कदन ॥
भीम पुढें करुनि उठे धर्म प्रभु जो सुकीर्तिचें सदन ॥ ३ ॥
भीमाचा सिंहध्वनि कोणासहि आयकों न दे वाद्यें ॥
सोडुनि समाधि मस्तक डोलविलें आयकोन देवाद्यें ॥ ४ ॥
वृद्ध तरुण भीष्मार्जुन परि न रणीं न्यून अधिक ते गमले ॥
सम लेखर्षि तयातें जाणुनि तद्भुजपराक्रमीं रमले ॥ ५ ॥
सणणण सणणणणण वाजति शरनिकर कायहानिकर ॥
वदले सुरमुनि करितो नररूपें रुद्र काय हा निकर ॥ ६ ॥
कवि योजुनि उपमा गजहरनरशरततिस वाहुटळ लाजो ॥
अतुलबल न कां गरगलकलहींहि न विजयबाहु टळला जो ॥ ७ ॥
देवासुराहव न बहु त्या कौरवपांडवाहवाहून ॥
शोणितनदींत गेले सभटरथद्विरदवाह वाहून ॥ ८ ॥
तिसरे दिवशीं राया भीमानें अतितरोग्रकोपानें ॥
दुर्योधन नृप मूर्छित केला भेदुनि उरांत रोपानें ॥ ९ ॥
सावध होउनि राजा भीष्मासि म्हणे अहो पितामहजी ॥
झाली भवत्प्रतिज्ञा काय जना दे सुधा पितां मह जी ! ॥ १० ॥

असतां तुम्ही पति पृथापुत्र मथिति या मदीय पृतनेतें ॥
नवल ज्वलदनलाचें सर्वस्वें बळ हरोनि घृत नेतें ॥ ११ ॥
जिकडे वपु तिकडे मन युक्त न शोभेल अन्यथा नातें ॥
पार्थे अनन्य लोटुनि लावावें काय अन्य थानातें ॥ १२ ॥
राया भलतें वदसी पथ्य हित स्वगुरुवचन न आइकसी ॥
अन्य असोत वदेल स्वसुताप्रति अहित वचन आइ कसी ॥ १३ ॥
कैसा जिंकावा हो! करुनि वळें आहवा युवा जीनें ॥
बा! जिंकिला कधीं तरि जवनें तरुणेंहि वायु वाजीनें ॥ १४ ॥
मी आजि साग्रजानुज शक्रसुताचें करीन वारण गा! ॥
बहु हेंहि पदभरिहि जरि सारिल अनव करी नवा रणगा ॥ १५ ॥
असि करुनियां प्रतिज्ञा विष्णुपदीनंदनें अतित्वरितें ॥
पांडवचमूपतीचें मथुनि चमू पाडिलें पतित्व रितें ॥ १६ ॥
जिकडे जिकडे पळती तिकडे तिकडे महाजवन तो बा ॥
बहु हाय! हाय! म्हणती प्राकृत बुध हंत हा! यवन तोबा ॥ १७ ॥
गरुडहि अहीस न तसा न करिकुळालाहि तेविं हरि खपवी ॥
दुर्योधनासि जैसा दे भीष्म न हरिस तेविं हरिख पवी ॥ १८ ॥
धर्मकटक खांडववन भीष्म विजय विजय तोचि हरि गमला ॥
शर दव रक्त ज्वाला रूपक याहूनि होय बहु न मला ॥ १९ ॥
पडतांचि गांठ झाले समरचमत्कार फार न वदवती ॥
लिहितां सरस्वतीच्या सरतिल शतकलशसदश नव दवती ॥ २० ॥
वाटे तुमचा उरविल कृष्णांचे जीव न स्थविर तात ॥
दिसले शरांत ते नग कल्यांबुधिजीवनस्थ विरतात ॥ २१ ॥
शांतनव सिंह गमला पळतां नररथहि तो पळ ससाच ॥
ससख प्रभुहि वसंतीं बहु फुलला होय हो पळस साच ॥ २२ ॥
जों जों हाणी खर शर तो रिपुयवसदव तारकोपाया ॥

तों तों लागे हळुहळु कमलाधव सदवतार कोपाया ॥ २३ ॥
जो मातृस्नेहाचा चित्तीं स्नेहें निजें विसर घाली ॥
तो भीष्मावरि कोपे स्वमधुहराउपरि जेविं सरवाली ॥ २४ ॥
चक्र करीं धरुनि रथाखालें टाकुनि उडीस जंव धावे ॥
वाटे त्या सिंव्हानें सर्वेहि भीष्मादि ते गज वधावे ॥ २५ ॥
धांवुनि यत्नें धरि परि वोढुनि ने देव त्यासि वोढकसा ॥
जाणों म्हणे भुजवळें पाहूं जरि वोढितोसि वोढ कसा ॥ २६ ॥
कर जोडुनि भीष्म म्हणे येतां मारावयासि या हो या ॥
हा सत्यसंध केला मुक्तहि साधूंसि गावया होया ॥ २७ ॥
केला उभा सिताश्वें चरणीं घालुनि मिठी पदीं दशमीं ॥
प्रभु तत्व असें कळवी कीं प्रेमवळेंचि पदनता वश मी ॥ २८ ॥
पाय धरुनि पार्थ म्हणे त्यागुनि धन काय जीप्रति ज्ञाते ॥
बहु जपले तद्गुरुंनीं त्यागावी काय जी प्रतिज्ञा ते ॥ २९ ॥
या दासाकरवींच क्षिप्र तुम्ही या यशास करवाल ॥
नखहि नको ज्या कार्या त्या काढावा कशास करवाल ॥ ३० ॥
यापरि हित प्रिय पृथापुत्रोक्ति अमान्य कां करील हरी ॥
सन्मित्रोक्ति करी जें अमृतरसाचि न ते करी लहरी ॥ ३१ ॥
बहु काय वदों राया तिसऱ्या दिवसाचिया चरमयामीं ॥
भूमितळा मांसमया देखत होतों नभा शरमया मी ॥ ३२ ॥
भीष्मासि म्हणे राजा व्हावी ऐसी रणांत मदवस्था ॥
झाला मला सुदुःसह हा होय ताप न दवस्था ॥ ३३ ॥
शिरला भीम व्यूहीं जेविं अजकुळांत लांडगा शिरतो ॥
दैवेंचि रक्षिलें मज कापित होताचि दांडगा शिर तो ॥ ३४ ॥
या तुमच्या पावाऱ्या दुर्बलसेनांसमान वध सेना ॥
हें झाल्या कां स्वर्गीं जोडुनि एनास मानव धसेना ॥ ३५ ॥

झाल्ीं युद्धें शतशः सर्वप्रेक्षकमनोहरें सरसें ॥
होय रणांगण रक्तोत्पलवनचितपद्मरागभूसरसें ॥ ३६ ॥
भीष्म ग्रीष्मतरणिसा अर्जुन हेमंततरणिसा गमला ॥
देव म्हणे बहु आला वृद्धाहुनि जिष्णुचाचि राग मला ॥ ३७ ॥
हो शूर दूर ओसर म्हणणार महाप्रभाव हा रविला ॥
हार विलासिजनेंसा येणें कैसा प्रभाव हारविला ॥ ३८ ॥
झाला धीर परि परिम्लान सखा जातिपुष्पगुच्छकसा ॥
तुच्छ कसा हा प्रवया चिरडिल भलता अहींद्रपुच्छ कसा ॥ ३९.॥
हा पांडवांसि भस्माचि करिल उपेक्षा करूं नये याची ॥
पदरीं अकीर्ति आश्रितसुहृदनवनपथ करून येयाची ॥ ४० ॥
आणुनि मनीं असें ज्या धन्य म्हणति सर्व विप्र तो दास ॥
भीष्म वधाया धांवे हरि हस्तें कवळुनि प्रतोदास ॥ ४१ ॥
देव रथातें सोडुनि धांवे देवापगाविलापार्थ ॥
कीं दुस्तरारिसागरिं न बुडो कांसेसि लाविला पार्थ ॥ ४२ ॥
पार्थाप्रति प्रयत्नें तो बळकारण्यसिंधु राखाया ॥
क्रोधें गर्जत धांवे सिंव्ह जसा मत्तसिंदुरा खाया ॥ ४३ ॥
एह्येहि देवदेव ! श्रीकृष्ण ! नमोऽस्तु ते असें बोले ॥
बोले गळु प्राज्यप्रेमाश्रुभरें करोनियां डोले ॥ ४४ ॥
भीष्म म्हणे त्वद्धस्तें व्हाया समरांत शांत नवसा जो ॥
होता करीत तो हा जेविं हरिहतेभ शांतनव साजो ॥ ४५ ॥
जरि मारिशील मज गतिलाभ तुजहि कीर्तिलाभ गुरुतर तो ॥
विश्वगुरो ! प्राकृतही तारुनि शरणांगतासि गुरु तरतो ॥ ४६ ॥

---

## जयद्रथवध.

सौभद्रशोकविवशें रचिलें पणातें ॥
कुंतीसुतें समजल्याविण आपणांतें, ॥

तें वाक्य सत्य करवी तव पूर्वजाचें ॥
श्रीकृष्ण नाम भज त्यासि अपूर्व ज्याचें. ॥ १ ॥

'मी मारीन जयद्रथासि समरीं जों भानु आहे नभीं, ॥
नाहीं होमिन देह हा हुतवहीं, सर्वात्मना ही न भी.' ॥
ऐसें बोलुनि वाक्य त्या परिस तो केला असा नेम रे! ॥
रक्षूं त्यासि बळें, घडो मग तसें, तो स्वापमानें मरे. ॥ २ ॥

यानंतरें जथुनि कौरवराजसेना ॥
आली कसी? अवनिमंडळ जें दिसेना. ॥
तों पार्थसैन्यहि सवेंचि निघे रणाला, ॥
ज्या इंद्रहि परि नव्हे क्षम वारणाला. ॥ ३ ॥

सूचीव्यूह तयांत पद्म रचिलें, राहे तदभ्यंतरीं ॥
राजा सैंधव. तो जयद्रथ तरी चिंता करी अंतरीं. ॥
व्यूहाच्या वदनीं कृतांतसमसा आचार्य राहे बळें, ॥
जे जे ज्या स्थाळीं ठेविले नृपवरें ते राहिले तुंबळें. ॥ ४ ॥

वदे कृष्ण, 'पाहें नरा! द्रोण हा रे! ॥
समिच्छास्त्रवेत्ता रणीं जो न हारे. ॥
जयाचे शरव्रात भात्यांत कोरे, ॥
तयासीं वृथा झुंज लावूं नको रे! ॥ ५ ॥

पंचाशीति जयासि वर्षगणना, आपांडुता मस्तकीं, ॥
युद्धीं द्रोण तथापि दुर्धर दिसे, हस्ती जसा मस्त कीं, ॥
पार्था! तूं न भिडें तयासह नको, तो आजि नाटोपतो, ॥
पाहा दुःसह वाटतो मज रणीं याचा खटाटोप तो.' ॥ ६ ॥

नमस्कार दूरोनिया सव्यसाची ॥
करी बाणयोगें गुरूला तसाची ॥

सवेगें पुढें तो पृथापुत्र धांवे, ॥
यदर्थप्रतिज्ञा तयातें वधावें. ॥ ७ ॥

आले वीर समस्त धीर धरुनी जे सैन्यि कीर्तिस्वरें ॥
कोपाविष्ट, विशिष्ट दीप्ति मिरवे ज्यांची सुवार्तस्वरें; ॥
सोडी बाण अनेक पार्थ समरीं, बाणासि ने मस्तकीं ॥
वीराचा शर एक ही न चुकतां, लागेच नेमस्त कीं. ॥ ८ ॥

सव्यापसव्यकृतसायकतांडवानें ॥
केलें पराजित रणीं रण पांडवानें ॥
घालूं शके कवण यावरि वीर घाला? ॥
जैसा मृगांत मृगराज तसा निघाला. ॥ ९ ॥

कौंतेयाप्रति देवकीय वदला, 'हे भागले वाह रे! ॥
जाले फार तृषार्त, यत्न करणें जेणें पिपासा हरे.' ॥
बोले पार्थ, 'जळासि यांसि, जपतों मी वारणास्त्रा रणीं, ॥
या वीरांस हि वारितों, गज जसे सक्रोध आधोरणीं.' ॥ १० ॥

तत्काळ वापी रचिली च पार्थें ॥
वारोनियां वीरबळें अपार्थें, ॥
केले युगापासुनि मुक्त देवें ॥
सर्वे चि ते घोटक वासुदेवें. ॥ ११ ॥

आर्द्रपृष्ठ हय पाजुनि पाणी, ॥
दों करीं चतुर नीरजपाणी. ॥
देखती कुतुक सैनिक सारे, ॥
बोलती, 'प्रबळ पार्थ कसा रे?' ॥ १२ ॥

धों धों दुंदुभि वाजल्या, उचलला सैन्यीं धुरोळा, नभा ॥
गेला, सर्व दिशा तमोमय, पहा जाला रवी हीनभा. ॥

'मारावा व्यसनस्थ पार्थ' वदती 'आहे रथावेगळा,
होतां सज्ज, कदापि हा न उतरे काळाच्चिया ही गळा.' ॥ १३ ॥

राजे भद्रप शाल्व सैंधव शिबी त्रैगर्तकांवष्ट जे, ॥
होम्रंध्रांग कलिंग वंग यवन प्राग्जोतिषावंत जे, ॥
इत्याद्यद्भुतकोप कोपनिभृत स्वाकृष्टचाप स्वरें, ॥
आले सन्मुख जे क्षणीं विमुख ते केले प्रतापें नरें. ॥ १४ ॥

शाखामृगध्वज बहूत विशाळ वाटे, ॥
यासी भिडाल तरि लाविल मृत्युवाटे, ॥
गांडीवमुक्त शर वाजति हे सणाणा, ॥
ऐसा धनुर्धर कसा स्वमनासि नाणा? ॥ १५ ॥

कां उकाळत असा परतावें? ॥
आमुच्या तरि मतें परतावें. ॥
गर्जतो विजय दुर्गम रावें, ॥
कां अशासि खवळोनि मरावें?' ॥ १६ ॥

संजोगिले तुरग शीघ्र रथासि देवें, ॥
केलें पहा सुकृत पांडुसुतें सदैवें. ॥
दे हात पार्थ चढतां स्वरथावरी तो, ॥
एक्या करें हयचतुष्टय सांवरीतो. ॥ १७ ॥

होता असा अरुप दाहक कैटभारी ॥
बोले, 'नरा! मन तुझें न भया उभारीं. ॥
अस्ताचला स्वतिलकीकृत भानु गेला, ॥
वेड्या! जयद्रथवधास्तव तूं भुकेला.' ॥ १८ ॥

हें क्लिष्ट वाक्य पडतां श्रवणीं, विलोकी ॥
सूर्याकडे, मग म्हणे, 'मुख कैंवि लोकीं ॥

दावूं? अतःपर करूं न शकें पणातें.
हें वाक्य सत्य करिं, होमिन आपणातें.' ॥ १९ ॥

अच्यूत हें समजला जगदांतरात्मा, ॥
बोले शतक्रतुसुताप्रति तो महात्मा, ॥
'कां धाकलास इतुक्यांत चि या वधाया? ॥
पाहें कशी रचितसें निज योगमाया. ॥ २० ॥

तुझें उणें या स्वजनीं दिसावें, ॥
रथीं तुझ्या म्यां मग कां बसावें? ॥
मनीं असे कार्य तुझें सजावें, ॥
उगेचि वाटे मज तूं खिजावें.' ॥ २१ ॥

साधावया अर्जुनकामनेला ॥
अस्तासि मार्तंड निकाम नेला. ॥
प्रमोद जाला धृतराष्ट्रजाला ॥
कीं आज हा सैंधव वीर झाला. ॥ २२ ॥

समीप आले नृपलोक सारे ॥
पाहों, मरे अर्जुन हा कसा रे! ॥
कोणी नरासी करिती खटाळी ॥
ते मारिती हांसुनि मूर्ख टाळी ॥ २३ ॥

'पार्था! वो! रवि हा, जयद्रथ हि हा, हें लक्ष लावीं बरें.' ॥
बोले अर्जुन, 'लाविलें.' हरि वदे, 'मारीं.' जगच्छेकरें ॥
ऐसें त्या प्रति बोधितां, झडकरी त्या सैंधवाचा गळा ॥
गेला तोडुनि अर्धचंद्रविशिखें कीं मस्तका वेगळा. ॥ २४ ॥

आधींच पार्था सुचवोनि देवें, ॥
तो वारिला योगहि वासुदेवें ॥

वा. क. ९९६

तों देखिला भास्कर सैनिकांहीं ॥
उपाय तेव्हां न चले चि कांहीं ॥ २५ ॥

दुर्योधनादिक सशोक सलज्ज झाले, ॥
त्यांचे प्रमोदभरदीपक ते विझाले; ॥
केला जईं विजय दुर्जय वासुदेवें ॥
हें वाचिजे हरिकथामृत कीं सदैवें. ॥ २६ ॥

**वामनपंडित.**

---

## वर्षावर्णन.

हा मेघ आर्द्रमहिषोदरतुल्य काळा, ॥
शंखाकृती धरि करांत बलाकमाळा; ॥
विद्युत्प्रभा वसन पीत कसोनि हातें, ॥
वाटे दुजा हरिच आक्रमितो नभातें. ॥ १ ॥

माधवगात्रश्यामल शुभ्रबलाकासमूहरचितदर, ॥
विद्युत्पीतवसन हा शोभे अंभोद जेंवि चक्रधर. ॥ २ ॥

मेघोदरांतूनि जलाच्या धारा, ॥ भूमीवरी पडती झरारा ॥
जैशा शुद्ध रजताच्या तारा, ॥ विद्युत्प्रकाशें झळकती ॥ ३ ॥

कांहीं हंसमयूरकाकबकसे वेगें उडों पाहती, ॥
कांहीं कांसवमीननक्रसुसरी पाण्यामधें पोहती; ॥
कांहीं पर्वतवृक्षतुंगशिखरप्रासादसे दीसती, ॥
वातें हालवितां नभीं घन असे नानाऽकृती शोभती. ॥ ४ ॥

भासे कौरवराष्ट्रतुल्य नभ हें जें अंधकारा धरी, ॥
हर्षानें बहु गर्जना करि शिखी दुर्योधनाचे परी; ॥

द्यूतीं निर्जित धर्मसा पिक वनीं आला असे संप्रती, ॥
गेले स्त्रीसह हंसपांडव तसे अज्ञातवासाप्रती. ॥ ५ ॥

होऊनि शैलशिखरावरि लंबमान, ॥
हो गर्जतात घन दुंदुभिच्या समान; ॥
ऐकोनि शब्द उडती शिखिपक्ष वातें, ॥
कीं वीजिती मणिमयव्यजनीं नभातें ! ॥ ६ ॥

धाराजर्जर दर्दुर प्रसरती पंकीं उड्या घालिती, ॥
झाले मोर विमुक्तकंठ, फुललीं झाडें पहा डोलती; ॥
साधूला खळ मंडळी तशिचहीं चंद्रास मेघावळी. ॥
झांकी, ती कुलटेसमान चपला राहे न एके स्थळीं. ॥ ७ ॥
पवनाचि जवन तुरग ज्या, जलमयधाराचि शस्त्रधारा ज्या, ॥
ज्या स्तनितदुंदुभिध्वनि शोभे विद्युत् पताक ज्या राज्या, ॥ ८ ॥
तो मेघराज नेतो हरुनि नभीं करसमूह चंद्राचा, ॥
राजा जसा स्वनगरा नेतो करभार अवल शत्रूचा. ॥ ९ ॥
तडिद्वलाका यांच्या योगें कर्बुर झालेल्यांनीं, ॥
गर्जुनि विरहिजनाच्या चित्तीं क्षत केलें मेघांनीं. ॥ १० ॥
त्यावरि दुर्मति हताश बक हा पहा करितसे मार, ॥
'प्रावृट्' 'प्रावृट्' ऐसें बोलुनि, घाली क्षतांत खार ! ॥ ११ ॥
ज्यांच्या पाठीवर बांधियले विद्युल्लेखा दोर, ॥
धांवुनि धाराधर हे खालीं धारा सोडिति थोर. ॥ १२ ॥
जाणों हे गज शक्राज्ञेनें रजताच्या दोरांनीं, ॥
ओढुनि नेती या पृथ्वीला वर अपुल्या जोरांनीं. ॥ १३ ॥
विजेच्या चापल्यें क्षुभित घन नीलाभ वळले, ॥
महावातें अभ्यंतरिं उदधि जैसे खवळले; ॥

तिहीं गंधोद्दामा हरिततृणसस्यांकुरवती, ॥
असे केली धाराशतशरविदीर्णा वसुमती. ॥ १४ ॥
तारा गेल्या नाशाप्रती, ॥ जैशी दुर्जनावरी उपकृती ॥
कांतवियुक्त युवती, ॥ तैशा भासती दशदिशा. ॥ १५ ॥
पेटतां विद्युल्लताज्वलन, ॥ अंतरीं गेले संतापोन ॥
वाटे विरघळलें गगन, ॥ जळरूपें पडतसे. ॥ १६ ॥
उतरे चढेहि वर्षे गर्जे पाडी घनांधकारातें, ॥
प्राप्तनवश्रीपुरुषापरि मेघ धरी अनेक रूपांतें ॥ १७ ॥
विद्युल्लतांनीं जळतेंच काय? ॥
धाराजळांनीं गळतेंच काय? ॥
बलाहकांनीं हंसतेंच काय? ॥
वायुभ्रमें निःश्वसतेंच काय? ॥ १८ ॥
मेघोदरा भेदुनियां निघाल्या, ॥
पंकांतुनी जेविं मृणालि आल्या; ॥
धाराच चंद्रव्यसनें हजारा, ॥
सोडीतसे हे दिव अश्रुधारा. ॥ १९ ॥
सज्जनचित्तसुनिर्मळ विजयशरसमान कर्कशाकारा, ॥
चंडानिलसंचोदित जलधर हे वर्षतात जलधारा. ॥ २० ॥
सोडितिजलदजलाचे बिंदू बलरामवस्त्रसमकाय, ॥
इंद्राच्या कोशांतिल घेउनि मुक्ताच टाकिती काय? ॥ २१ ॥
तमालपिष्टनीलांनीं, मेघांनीं नभ लिंपिलें, ॥
संसक्तशीतसुरभि, वातांनीं उपजीविलें! ॥ २२ ॥
विद्युज्जिव्हा लांबवूनी, ॥ जलधर हनुवटी खालवूनी ॥
इंद्रचाप भुज उभारोनी, ॥ जांभई देतें अंतरीक्ष. ॥ २३ ॥

ताडावरी कर्कश शब्द होतो, ॥
जळीं स्थळीं केवळ मंद हो तो; ॥
जशा विण्याच्या झडतात तारा, ॥
तालानुसारें पडतात धारा ॥ २४ ॥

**गोडबोले.**

---

## एका पुष्पाच्या नाशावर.

फिरत गमत तीरा पातलों मी नदीच्या ॥
हरित तृण तटाकीं वाढलें दाट तीच्या ॥
मृदु अति पदपातीं लागतो स्पर्श मातें ॥
मन किति तरि हर्षे सांगतांही न ये तें ॥ १ ॥
हळुहळु अनवाणी चाललों मी पुढारा ॥
पवनहि अतिवेगें वाहताहे भरारा ॥
सजलजलदजालें व्यापिलें व्योम सारें ॥
समय न कवितेला योग्य ऐसा दुजा रे ॥ २ ॥
नजर वर करूनी चालतां रक्तवर्ण ॥
सुमन सहज पादें जाहलें छिन्नभिन्न ॥
नयन करुनि खालीं पाहतां पुष्प बोले ॥
" अदयहृदय तूं हें काय रे हाय केलें " ॥ ३ ।
विगलित सुमनाच्या पाकळ्या वेंचुनीयां ॥
त्वरित हृदयदेशीं ठेविल्या घट्ट मीं या ॥
कुसुम मृदु तयाचा नाश मीं व्यर्थ केला ॥
फिरुनि फिरुनि याचा खेद होई मनाला ॥ ४ ॥
परिमल पसरोनी मोद देई मनाला ॥
रुचिर अरुण वर्णे तोषवी लोचनांला ॥

रिझवित तरुणांतें कामिनी केशपाशीं ॥
बसुनि सुमन, त्यातें मी कसा क्रूर नाशीं ॥ ५ ॥
कुसुमसमचि भासे जन्म हा मानवाचा ॥
परिमल मधु होई व्यर्थ रानांत त्याचा ॥
सुकुनि कुजुनि जाई योग्य कृत्यांविणें तो ॥
व्यसनजनिततापें दग्ध होऊनि जातो ॥ ६ ॥
तुडवुनि गुण जाती अंध कित्येक लोक ॥
परिमल समजोनी घाण घेती अनेक ॥
करुनि अमित पापें साधु कित्येक होती ॥
कितिक विमल आत्मे व्यर्थ कष्टांत येती ॥ ७ ॥
बघ किति जगतीं हें पाप अज्ञान नांदे ॥
मजसि विजन देशीं वास ईशा सदा दे ॥
क्षितिधरतटिं कोठें वृक्षराजींत किंवा ॥
विमलजलनदीच्या रम्य तीरावरी वा ॥ ८ ॥
विहग मृग पशूही प्रेम देतील मातें ॥
सुमन तरु लता ही हर्ष तैसा मनातें ॥
विकट वनपशूंचा घोर हुंकार कानीं ॥
खचित मधुर गीतासारिखा रम्य मानीं ॥ ९ ॥
उगिच बहकलों हा बोलतों जें सुचे तें ॥
भ्रमण करित जातां लागतें वेड मातें ॥
सुखकर परि आतां टाकुनी वेड देतों ॥
झडकरि निज गेहा येउनी शांत होतों ॥ १० ॥

" मार्गण."

---

# पांचवी ( कच्ची ).

## बकासुरवध.

स्कंधीं पृथेसि वाहुनि लंघुनि मत्स्यादि देश दूरवर ॥
गेले तापसवेष स्वीकारुनि पांडुपुत्र शूरवर ॥ १ ॥
त्या व्यसनांत निववि़ला दर्शन देऊनि तापह व्यासें ॥
जो चिंती साधुजनीं संपत्ति सदा न ताप हव्यासें ॥ २ ॥
चिंतामणि अधना जें धन्वंतरि जें गदाकुळा देतो ॥
भेटोनि अकस्मात् सुख तें त्या कुरुच्या तदा कुळा दे तो ॥ ३ ॥
पौत्रासि म्हणे मज कळलें होतें, परंतु जळधीतें ॥
मिळतां बळें नदीतें फिरविल, कोणी बळी न खळधीतें ॥ ४ ॥
हा बालद्रुम हो कां खेद तुम्ही मी सुधाढ्य आवाल ॥
पावाल वृद्धि पुष्कळ दुष्टग्रीष्मासि लाज लाधाल ॥ ५ ॥
प्रार्थावें नलगे मज जें तुमचें हित करीन आधीं तें ॥
भेटेन एकचक्रा-नगरींत रहा हरीन आधीतें ॥ ६ ॥
जातां देऊनि अभय निजजनकाचा पिता, महाज्ञाते ॥
त्याचि नगरीं द्विजगृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा ते ॥ ७ ॥
सिद्धान्न मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी ॥
भीमासि अर्ध देती अर्धाचे पांच भाग साधु करी ॥ ८ ॥
होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला मुदित ॥
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणाऽऽलयीं रुदित ॥ ९ ॥
भीमासि म्हणे रडतो दुःखें सकुटुंब विप्र, बापा, हें ॥
मज बहु दुःसह झालें आलें नेत्रासि अश्रु बा पाहें ॥ १० ॥
आम्ही पक्षी, हें गृहनीड, धरा देव आश्रयागम हा ॥

दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति, होय हाचि याग महा ॥ ११ ॥
भीम म्हणे शोध करीं जा स्वमुखें विप्रनायका पूस ॥
वारीन दुःख सर्वहि दहना अतिभार काय कापूस ॥ १२ ॥
द्विजरुदित पुन्हा तप्त श्रुति करि भेटोनि यादवीची तें ॥
मोहे मन जेंवि विषांबुधिच्या भेटोनि याद वीचीतें ॥ १३ ॥
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासराकडे मोहें ॥
करितां विलाप बोलत होता निजदुःख तेधवां तो हें ॥ १४ ॥
जाये वदलीस परस्थळगमनविचार सर्वथा राहो ॥
माहेर तेथ आहे वोळखिती लोक सर्व थारा हो ॥ १५ ॥
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रमदे ॥
स्वकुटुंबव्यसन जसें देतें न तसें बुधा विष भ्रम दे ॥ १६ ॥
जरि दान तुझें द्यावें कांते मज भासतें तसें तरि तें ॥
सिंधूदरीं विकावें स्वहितार्थ तितीर्षुनें जसें तरितें ॥ १७ ॥
पुत्रचि अधिक न कन्या अन्यास गमे, मला न लोभ्याला ॥
नयनयुगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला ॥ १८ ॥
देतों निजवपु परि तूं भीरु कशी साहसील विरहातें ॥
स्वर्गीहि दुःसहचि जें म्हणसील मज स्मरोनि चिर हा! तें ॥ १९ ॥
प्राणांचा त्याग बरा तुमचा न बरा कसा न तो पापी ॥
कूपांत बळें अबळा घालुनि ठकवूनि दोर जो कापी ॥ २० ॥
तों ब्राह्मणी म्हणे हो कवि साधु तुम्ही करूं नका शोक ॥
यन्मूल आपदर्थे तो शंकरसाचि आठवा श्लोक ॥ २१ ॥
आजि आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि, श्लोकीं ॥
तेंचि करा हो न बुडों द्या हो मज निजमतीसही शोकीं ॥ २२ ॥
पतिपूर्वी स्त्रीस मरण तें लग्नाहूनि काय हो ऊन ॥
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन ॥ २३ ॥

रक्षाल तुम्हींच मुलें अबळा वाहील भार जीवा हे ॥
रक्षील कशी आल्या नवपुरीं भीरु फार जी वाहे ॥ २४ ॥
जाईन मीच, राक्षस जरिं करकर सर्व मानवां चावे ॥
दैवें स्त्री म्हणुनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ॥ २५ ॥
मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं ॥
ती स्त्री मीच म्हणा जी, मागें सारूनियां नकारा हूं ॥ २६ ॥
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे, अयि ते ॥
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ॥ २७ ॥
परिसे असें पृथा जों तोंचि म्हणे त्यासि कन्यका मातें ॥
द्या, द्यायाचीच सुता हे किमपि नयेचि अन्यकामातें ॥ २८ ॥
आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला ॥
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला ॥ २९ ॥
कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज हो म्हणेल कां टाकीं ॥
बापा, कांव्यानेंचि प्राज्ञ सुखें काढितातिं कांटा कीं ॥ ३० ॥
ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे तशांत जवळून ॥
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून ॥ ३१ ॥
समजावुनि त्यांसि म्हणे ऐसें लाल्लिचलासि मालीन ॥
कां ललतां आललतां पलतां मी सांगलांत तालीन ॥ ३२ ॥
हांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळशब्दानें ॥
अब्दानें ग्रीष्मदवाऽकुळबर्हिकुळें जसींच अब्दानें ॥ ३३ ॥
तेव्हांचि पृथा देवी भेटे अभयोक्ति जी वदे त्यांतें ॥
संजीवनीच जाणों ती रोगें करुनि जीव देत्यांतें ॥ ३४ ॥
रोदनकारण पुसतां विप्र म्हणे अंब तापसि, श्रवणें ॥
घ्यावें शिव, अशिवाच्या व्यर्थचि कां तूंहि तापसि श्रवणें ॥ ३५ ॥
या राष्ट्रा बकराक्षस अजयूथा लांडगा जसा पाळी ॥

तद्वेतनदानाची आलि असें आजि मजकडे पाळी ॥ ३६ ॥
एक महिष एक पुरुष शाल्योदनराशि त्यास भक्षाया ॥
द्यावा असें असे या व्यसनीं मज कोण दक्ष रक्षाया ॥ ३७ ॥
विरहमयें एकासहि राक्षस हस्तीं न देववेचि, तसें ॥
धनहि न पुरुष मिळेसें, स्वकुळाचि मी भूमिदेव वेंचितसें ॥ ३८ ॥
सहज गजगंड भेदी हरिचा नव्हता कळा शिकत करज ॥
अकृतघ्नत्वार्थाचि दे शुचिता मळल्या जळासि कतकरज ॥ ३९ ॥
तैसा कुलीन जन परदुःखध्वंसी पटु स्वभावानें ॥
संकट हरि अरिचेंही हरिना कां प्रार्थितांचि भावानें ॥ ४० ॥
कुंती म्हणे दिला तुज एक स्वसुत द्विजा, नकोचि रडों ॥
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नकोचि रडों ॥ ४१ ॥
विप्र म्हणे शिवशिव परघातक जो स्वार्थलुब्ध नर कामी ॥
तो जैसा तैसा या कर्में पावेन घोर नरका मी ॥ ४२ ॥
करुनि परांचें अहित स्वहित विहित काय! तापसि, कवीसी ॥
माते, असें कसें मज व्हाया याहूनि ताप सिकवीसी ॥ ४३ ॥
कुंती म्हणे मदात्मज गुरुवर मंत्रें असे महातेजा ॥
साहों नशकति राक्षस वज्राघातासही सहाते जा ॥ ४४ ॥
सुरवल्लिचा नव्हे गा क्षुद्रलतागुच्छकासम स्तबक ॥
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक ॥ ४५ ॥
परि हें विप्रवरा, त्वां न प्रकटावें मनींच जिरवावें ॥
विद्यार्थिजनोपद्रव लागेल म्हणूनियां न मिरवावें ॥ ४६ ॥
मग विप्रपृथाप्रार्थित भीम धरुन राक्षसापराध मनीं ॥
कोपे, जाणों दहनचि तो होय; प्रार्थना तया धमनी ॥ ४७ ॥
तें मान्य करुनि मुनिला व्हा स्वस्थ असोंचि तो कवि प्रार्थी ॥
निःस्व जसे वित्तार्थी तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥ ४८ ॥

स्वानुज साहस कांहीं करणार, असें युधिष्ठिरा समजे ॥
आकारेंचि परेंगित कळे म्हणति कवि युधिष्ठिरासम जे ॥ ४९ ॥
पुसतां पृथा कथी तें, धर्म म्हणे अंब, परिस तोकवच ॥
द्याया काय उचित! जो रणीं सहाणार अरिस तो कवच ॥ ५० ॥
द्यावा परा न, तरतां अंबुधिमध्यें जसा स्व नावाडी ॥
धार्मिक न तो, जना जो नगणुनि शिशुरोदनस्वना वाडी. ॥ ५१ ॥
कुंती म्हणे, अरे बा, पावों द्यावा मुनी कसा असुखा ॥
आम्हीं सुखें म्हणावें काळा, द्विज सोड, आमुचे असु खा ॥ ५२ ॥
विप्रार्थ तुम्हीं असुही स्वर्गीं सुखवावया जनक वाडा ॥
हेंचि हित, न काळासहि पाहुनि लाविति भले जन कवाडा ॥ ५३ ॥
भीसी कां? अनुभविलें अनुजवळ तुवां न काय गा रानीं ॥
पावे ताप पराचा परि हिमगिरिचा न काय गारांनीं ॥ ५४ ॥
पडला निकट शिशुपणीं भीम मदंकावरूनि जावरि तें ॥
झालें चूर्ण शिळातळ, न धरीं भय, यश तवानुजा वरितें ॥ ५५ ॥
ब्राह्मणसाहाय्यकरक्षत्रिय जो तोचि संत, तोचि तरे ॥
ऐसें व्यासें कथिलें म्हणुनि तुम्हां हेंचि संततोचित, रे ॥ ५६ ॥
जननीस धर्म वर्णी नवल न, वर्णील तीस सुरभी ती ॥
तरिच तसे खळ वधिले तत्पुत्रांनीं, जयांसि सुर भीती ॥ ५७ ॥
रात्रौ एकाकीही शिरतां सागरवनीं न भी मकर ॥
भीमहि तसा बकवनीं आणि तदन्नीं तसाचि भीमकर ॥ ५८ ॥
जेवी भीम बका ये ऐसी मारूनि हाक उग्रास ॥
शिरले काय सदुदरीं सदोदनाचे भिवोनि सुग्रास ॥ ५९ ॥
भीम न सोडी भोजन राक्षस ताडी बळें जरि बुक्यांनीं ॥
खळ गांजी, परि सादर हरिभजन जसा करी बुध मुक्यांनीं ॥ ६० ॥
पांडव जेवुनि आधीं मग राक्षसजीवितास आंचवला ॥

सन्मणि न कोटिलक्षा ये, ये तो काय राक्षसा चवला ॥ ६१ ॥
मारी हरि लीलेनें जेंवि गजा, तेंवि पार्थ कुणपाशा ॥
तैं सुर म्हणति यमाच्या गुरु साजति भीमबाहुगुण पाशा ॥ ६२ ॥
ठेवीं नगरद्वारीं परमभयानक अशुद्धिमत् कुणप ॥
जाणों मातेनें तो वधिला शिशुरक्तपोग्रमत्कुणप ॥ ६३ ॥
भीमें हळूचि जाउनि कथिली वार्ता द्विजासि कानीं ती ॥
श्लाघ्यहि करुनि न मिरवी कुळज सुजन हो अशी शिका नीती ॥६४॥
चुकलों क्षमा करा मज अपराधसहस्र वातुका घडलें ॥
या भावें जाणों तें द्वारीं दक्ष क्षमापना पडलें ॥ ६५ ॥
प्रात:काळींच तसें बकशव पाहोनि एकचक्रा तें ॥
यश देती झाली करिवरपाळाच्याचि एकचक्रातें ॥ ६६ ॥
म्हणति विचक्षण पुरजन अन्योन्य मनीं धरूनि हरिख चला ॥
ज्याचा वार तयासचि हेतु पुसों कीं कसा स्व अरि खचला ॥ ६७ ॥
सांगे विप्र मजकडे येतां प्राणघ्न उग्रतर वार ॥
बहु भ्यालों अज जैसा भीतो पाहूनि उग्र तरवार ॥ ६८ ॥
सकुटुंब रडत होतों तों आला मंत्रसिद्ध विप्र कृती ॥
रोदनहेतु मज पुसे तो सदय महामना शुचिप्रकृती ॥ ६९ ॥
ऐकोनि व्यसन वदे मी देतों अन्न राक्षसाऽपसदा ॥
हरिणवनीं वृक न बरा मंडूकाच्या बिळांत साप सदा ॥ ७० ॥
मच्चिंता न करावी स्वस्थ असावें असें अभय मातें ॥
देउनि जाय दमाया जेंवि शिवाप्राणवल्लभ यमातें ॥ ७१ ॥
त्याचेंचि कर्म हें, तो आम्हांला होय पौर हो, तात ॥
साधूंसि सहाय सुखें देव सकर्पूरगौर होतात ॥ ७२ ॥
ऐसें ऐकुनि पौर ब्रह्मोत्सव करिति गाति महिमा ते ॥
म्हणती ब्राह्मणचि तुझा पति गुरु आम्हां प्रजांसि महि माते ॥ ७३ ॥

**मोरोपंत.**

## तुतारी.

एक तुतारी द्या मज आणुनि ॥
फुंकिन जी मी स्वप्राणानें ॥
भेदुनि टाकिन सगळीं गगनें ॥
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें;—अशी तुतारी द्या मजलागुनि ॥ १ ॥
अवकाशाच्या ओसाडींतिल ॥
पडसाद मुके जे आजवरी ॥
होतिल ते वाचाल सत्वरी ॥
फुंक मारितां जिला जबरी—कोण तुतारी ती मज देइल? ॥ २ ॥
सारंगी, ती सतार सुंदर, ॥
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा, ॥
सूरहि, सनई, अळगुज, माझ्या ॥
कसचीं हीं हो पडतिल काजा?—एक तुतारी द्या तर सत्वर ॥ ३ ॥
रूढी जुलूम यांची भेसुर ॥
संतानें राक्षसी तुम्हांला ॥
फाडुनि खाती, ही हतवेला—॥
जल्शाची का? पुसा मनाला!—तुतारिनें ह्या सावध व्हा तर ॥ ४ ॥
अवडंबरलीं ढगें कितीतरि ॥
रविकिरणांचा चूर होतसे ॥
मोहर सगळा गळुनि जातसे ॥
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे!—गाफीलगिरी तरिहि जगावरि ॥ ५ ॥
चमत्कार! "तें पुराण तेथुनि ॥
सुंदर, सोज्वळ, गोडें, मोठें," ॥
"अलिकडलें तें सगळें खोटें" ॥
म्हणती धरुनी ढेरीं पोटें;—धिक्कार अशा मूर्खांलागुनि ॥ ६ ॥

जुन्या नभीं या ताजे तारक, ॥
जुन्या भूमिवर नवी टवटवी, ॥
जुना समुद्रहि नव रत्नें वी; ॥
जुन्यांतूनि जी निष्पत्ति नवी—काय नव्हे ती श्रेयस्कारक? ॥ ७ ॥

जुनें जाउं द्या मरणालागुनि, ॥
जाळून किंवा पुरून टाका, ॥
सडत न एक्या ठायीं टाका, ॥
सावध! ऐका पुढल्या हांका!—खांद्यास चला खांदा भिडवुनि ॥ ८ ॥

प्राप्तकाल हा विशाल भूधर, ॥
सुंदर लेणीं तयांत खोदा, ॥
निजनामें त्यांवरतीं नोंदा, ॥
बसुनी कां वाढवितां मेदा?—विक्रम कांहीं करा, चला तर ॥ ९ ॥

अटक कशाची बसलां घालुनि? ॥
पूर्वज वदले त्यां गमलें तें, ॥
ऐका खुशाल सादर चित्तें; ॥
परंतु शिरका विशंक पुढतें—निरोप त्यांचा ध्यानीं घेउनि ॥ १० ॥

निसर्ग निर्घृण, त्याला मुरवत—॥
नाहीं अगदीं पहा कशाची ! ॥
कालासह जी क्रीडा त्याची, ॥
ती सकलांला समान जाची—चुरूनि टाकी प्रचंड पर्वत ॥ ११ ॥

त्याशीं भिडुनी, झटुनी झगडत ॥
उठवा अपुले उंच मनोरे, ॥
पुराण पडक्या सदनीं कां रे! ॥
भ्याड बसुनियां रडतां पोरें?—पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत ॥ १२ ॥

संघशक्तिच्या मुईंत खंदक ॥
रुंद पडुनि शें तुकडे झाले, ॥
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले ॥
पाहिजेत ते सत्वर भरले—घ्या त्यांत उड्या तर बेलाशक! ॥ १३ ॥

धार धरिलिया प्यार जिवावर ॥
रडतिल रडोत रांडा पोरें, ॥
गत-शतकांचीं पापें घोरें ॥
क्षालयाला तुमचीं रुधिरें—पाहिजेत रे! स्त्रैण न व्हा तर ॥ १४ ॥

जाऊं बघतें नांव लयाप्रत, ॥
तशांत बसलां मऊ मेंढरें, ॥
अहह! घेरिलें आहे तिमिरें, ॥
परंतु होऊं नका बावरे—धीराला दे प्रसंग हिंमत ॥ १५ ॥

धर्माचें माजवूनि डंबर, ॥
नीतीला आणिती अडथळे, ॥
विसरुनियां हें जातात खुळे, ॥
नीतीचें पद जेथें न ढळे—धर्म होतसे तेथेंच स्थिर ॥ १६ ॥

हल्ला करण्या तर दंभांवर-तर बंडांवर, ॥
शूरांनो! या, त्वरा करा रे! ॥
समतेचा ध्वज उंच धरा रे! ॥
नीतीची द्वाही पसरा रे!—तुतारिच्या ह्या सुराबरोबर ॥ १७ ॥

नियमन मनुजासाठीं, मानव—॥
नसे नियमनासाठीं जाणा, ॥
प्रगतिस जर तें हाणी टोणा—॥
झुगारूनि तें देउनि, बाणा—मिरवा ओजाचा अभिनव ॥ १८ ॥

घातक भल्या प्रतिबंधांवर ॥
हल्ला नेण्या करा त्वरा रे! ॥
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे! ॥
वीरांनो! तर पुढें सरा रे—आवेशानें गर्जत "हरहर!" ॥ १९ ॥
पूर्वींपासुनि अजुनि सुरासुर ॥
तुंबळ संग्रामाला करिती; ॥
संप्रति दानव फार माजती, ॥
देवांवर झेंडा मिरवीती!—देवांच्या मदतीस चला तर! ॥ २० ॥

"केशवसुत."

---

## तुफान.

जवन पवन धांवे सायकाच्या गतीनें, ॥
नदिपति खवळे हा त्याचिया संगतीनें; ॥
अहह! कहर केला आजि या फार वार्तें, ॥
वसति कितिक झोके आमुच्या तारवातें. ॥ १ ॥
पुरुषभर उडोनी मागुती येत खालीं, ॥
खळखळ जळ येतें आंत जशा पखाली! ॥
भरुनि भरुनि त्यातें श्रांत झाले खलाशी, ॥
सुजन सदुपदेशा जेविं देतां खलाशी. ॥ २ ॥
उसळति लहरी या पर्वतप्राय तुंग! ॥
बघुनि मति भयानें होतसे सर्व गुंग; ॥
क्षणहि भरंवसा या येइना तारवाचा, ॥
विकल वदनिं चाले घोष चिंता-रवाचा. ॥ ३ ॥
बघुनि मन थरारे सिंधुची उग्र मुद्रा, ॥
व्यसनसमयिं धांवें तूं दयेच्या समुद्रा! ॥

संघशक्तिच्या भुईंत खंदक ॥
रुंद पडुनि शें तुकडे झाले, ॥
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले ॥
पाहिजेत ते सत्वर भरले—घ्या त्यांत उड्या तर बेलाशक! ॥ १३ ॥

धार धरिलिया प्यार जिवावर ॥
रडतिल रडोत रांडा पोरें, ॥
गत-शतकांचीं पापें घोरें ॥
क्षालायाला तुमचीं रुधिरें—पाहिजेत रे! स्त्रैण न व्हा तर ॥ १४ ॥

जाऊं बघतें नांव लयाप्रत, ॥
तशांत बसलां मऊ मेंढरें, ॥
अहह! घेरिलें आहे तिमिरें, ॥
परंतु होऊं नका बावरे—धीराला दे प्रसंग हिंमत ॥ १५ ॥

धर्माचें माजवूनि डंबर, ॥
नीतीला आणिती अडथळे, ॥
विसरुनियां हें जातात खुळे, ॥
नीतीचें पद जेथें न ढळे—धर्म होतसे तेथेंच स्थिर ॥ १६ ॥

हल्ला करण्या तर दंभांवर-तर बंडांवर, ॥
शूरांनो! या, त्वरा करा रे! ॥
समतेचा ध्वज उंच धरा रे! ॥
नीतीची द्वाही पसरा रे!—तुतारिच्या ह्या सुराबरोबर ॥ १७ ॥

नियमन मनुजासाठीं, मानव—॥
नसे नियमनासाठीं जाणा, ॥
प्रगतिस जर तें हाणी टोणा—॥
झुगारुनि तें देउनि, बाणा—मिरवा ओजाचा अभिनव ॥ १८ ॥

घातक भलत्या प्रतिबंधांवर ॥
हल्ला नेण्या करा त्वरा रे! ॥
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे! ॥
वीरांनो! तर पुढें सरा रे—आवेशानें गर्जत "हरहर!" ॥ १९ ॥
पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर ॥
तुंबळ संग्रामाला करिती; ॥
संप्रति दानव फार माजती, ॥
देवांवर झेंडा मिरवीती!—देवांच्या मदतीस चला तर! ॥ २० ॥

"केशवसुत."

---

## तुफान.

जवन पवन धांवे सायकाच्या गतीनें, ॥
नदिपति खवळे हा त्याचिया संगतीनें; ॥
अहह! कहर केला आजि या फार वातें, ॥
वसति कितिक झोके आमुच्या तारवातें. ॥ १ ॥
पुरुषभर उडोनी मागुती येत खालीं, ॥
खळखळ जळ येतें आंत जशा पखाली! ॥
भरुनि भरुनि त्यातें श्रांत झाले खलाशी, ॥
सुजन सदुपदेशा जेविं देतां खलाशी. ॥ २ ॥
उसळति लहरी या पर्वतप्राय तुंग! ॥
बघुनि मति भयानें होतसे सर्व गुंग; ॥
क्षणहि भरंवसा या येइना तारवाचा, ॥
विकल वदनिं चाले घोष चिंता-रवाचा. ॥ ३ ॥
बघुनि मन थरारे सिंधुची उग्र मुद्रा, ॥
व्यसनसमयिं धांवें तूं दयेच्या समुद्रा! ॥

फिरफिरुनि उठे हा घोर कल्लोळ लाटीं, ॥
विधिलिखित कळेना काय आहे ललाटीं! ॥ ४ ॥
बहुत कठिण घोंघो वाहतो काय वारा! ॥
क्षणभरि गवसेना प्राणिमात्रा निवारा; ॥
अटपुनि अवजारें फाटकी छिन्न भिन्न, ॥
दिसति मनिं खलाशी जाहले फार खिन्न. ॥ ५ ॥
म्हणति शरण आम्ही तार रे वायुदेवा! ॥
विसरुन चुकलींसे कोणती सांग सेवा. ॥
नवस करुनि भावें फोडिती श्रीफलांतें, ॥
घडि घडि अठवीती बायकांतें मुलांतें. ॥ ६ ॥
डुलत डुलत तारूं आपटे एक बाजू ॥
धरणि पडत जेवीं एक भारें तराजू; ॥
प्रति समयिं तडाका अब्धिची लाट हाणी, ॥
हिकडुनि तिकडे हें खेळतें सर्व पाणी. ॥ ७ ॥
किति तरि लहरींची होय मोठी कमान, ॥
वळणसुद दिसे ती पर्वताच्या समान; ॥
गगनिं जळ चढोनी होतसे छत्र काळें, ॥
वदन पसरलें हें खावया काय काळें? ॥ ८ ॥
चढुनि चढुनि लाटा झांकिती सूर्यबिंब, ॥
स्थळ वसन भिजोनी जाहलें सर्व चिंब; ॥
हुडहुडि भरुनीयां अंग झालें बधीर, ॥
अझुनि मनिं धरावा कोठपर्यंत धीर! ॥ ९ ॥
अवजड परि जोरें डोलकाठीहि हाले, ॥
कर कर कर ऐसा सारखा शब्द चाले; ॥
तट तट तट जाती दोरखंडें तुटोनी, ॥
शिव शिव! हृदयींचा धीर गेला सुटोनी! ॥ १० ॥

कवळुनि तुळयांतें बैसलों एक ठायां, ॥
गर गर फिरतें कीं शक्ति नाहीं उठाया; ॥
फिरुनि फिरुनि डोकें पित्त आलें कपाळा, ॥
अतडिं तुटुनि गेलीं ओकतां विश्वपाळा! ॥ ११ ॥

बहुत दिवस झाले अन्न नाहींच पोटा, ॥
विकल सकल गात्रें येति पोटांत वेटा, ॥
बुरसुन दशम्याही जाहल्या त्या निकामी, ॥
कधिंच पडाशि झाली लाडवांची रिकामी. ॥ १२ ॥

भरुनि जळमटानें नासले सर्व पोहे, ॥
विपरित विधि झाल्या वांकडें काय नोहे? ॥
हर हर! पडले कीं, गोड पाण्यांत जंतू, ॥
अजि तर तुटतो हा वाटतें प्राणतंतू. ॥ १३ ॥

वरति दिसत सारें शून्य आकाश मात्र, ॥
जलमय भय वाटे खालतें सिंधुपात्र; ॥
गगनिं दिसत नाहीं एकही आज पक्षी. ॥
कठिण समय आला, ह्यांतुनी कोण रक्षी? ॥ १४ ॥

तरु नगहि दिसेना येथ कैंची जमीन, ॥
सभय पळत जाती मोठमोठेहि मीन; ॥
इतर जलचरेंही धांवती सैरवैरा, ॥
व्यसनसमयिं हा हा! टाकुनी लोभवैरा. ॥ १५ ॥

गलबत खुटवीलें टाकुनी नांगराशीं, ॥
तरिहि जलधिसंगें ना टिके संगराशीं; ॥
अधिक अधिक वारा होतसे फार जोर, ॥
अहहह! तुटला कीं नांगराचाहि दोर! ॥ १६ ॥

भडकुनि पवनानें स्वैर तारूं निघालें, ॥
किति तरि न कळे हें दैव घालील घाले! ॥
जलद हल खलाशी टाकिती दूसरा हो, ॥
अझुनि तरि दमानें बापुडें स्थीर राहो! ॥ १७ ॥
फिरुनि जरि हलाचा दोर तोडील वायू, ॥
तरि मग सकलांचें संपलें खास आयू! ॥
गमत मम मना हा दोर नोहे हलाचा, ॥
प्रगट निवळ तंतू जीविताच्या बलाचा. ॥ १८ ॥
घडि घडि जइं होतो वायुचा फार जोर, ॥
दचकुनि तुटला कीं पाहतों काय दोर; ॥
निशिदिनिं सकलांना लागला तोचि घोर, ॥
व्यसनसमयिं होतो नीचही फार थोर. ॥ १९ ॥
रडुनि रडुनि झालों काय हो दीनवाणी! ॥
नयन सुकुनि गेले आटलें सर्व पाणी; ॥
उगिच करुनि होतों स्वस्थ ऐसा विवेक, ॥
नविन नविन तों तों संकटें एक एक! ॥ २० ॥
निबिड गगनिं आल्या मेघपंक्ती भरून, ॥
सळ सळ जळधारा आतती कीं वरून! ॥
गड गड गड अंगा गर्जना कांपवीते, ॥
जलद जलद आला साह्य व्हाया पवीतें. ॥ २१ ॥
चम चम चम नाचे काय विद्युल्लता ही! ॥
कड कड कड शब्दें नाद कोंदून राही; ॥
घसरुनि पडतेही वाटतें मस्तकांत, ॥
खचित खचित आलों मृत्युच्या मी मुखांत! ॥ २२ ॥

आठल्ये.

---

## सत्याचा महिमा.

सत्यस्वरूप परमेश्वर नित्य आहे ॥ सत्येंच ही विविध सृष्टि रचूनि राहे ॥
सत्येंच तीस परिपाळुनि ने लयाला ॥ सत्येंच यास्तव करा वश त्या दयाळा ॥ १ ॥
सत्येंच सूर्य तपतो गगनांगणांत ॥ सत्येंच संचरत चंद्र उडूगणांत ॥
सत्येंच गंधवह वाहत सर्व लोकीं ॥ सत्येंच सृष्टि भरली अवघी त्रिलोकीं ॥ २ ॥
सत्येंच भू फिरतसे द्युमणीसभोंतीं ॥ सत्येंच कीं ग्रहयुति-ग्रहणेंहि होती ॥
सत्येंच होति उदयास्त नवग्रहांचे ॥ सत्येंच विश्व भरलें परमेश्वराचें ॥ ३ ॥
सत्येंच सागर विधूद्गमनीं भरारे ॥ सत्येंच तज्जल तदस्तमयीं निखारे ॥
सत्येंच सिंधुपति तो उलटी न वेला ॥ सत्यें असें नियमिलें स्थिरजंगमाला ॥ ४ ॥
सत्येंच उष्णपण संतत घेइ वन्ही ॥ सत्येंच भस्म करि भोजन जाठराग्नि ॥
सत्येंच आप धरि शीतलता निजांगीं ॥ सत्येंच तें सतत ओढत निम्नभागीं ॥ ५ ॥
सत्येंच ही गरगरां फिरते धरित्री ॥ सत्येंच नाम धरिते परि भूतधात्री ॥
सत्येंच त्या विधुकला क्षयवृद्धि घेती ॥ सत्येंच पक्ष-तिथि-हायन-मास होती ॥ ६ ॥
सत्येंच षड्ऋतु, वसंत, निदाघ, वर्षा, ॥ हेमंत, शैशिरहि शारद देत हर्षा ॥
सत्येंच पुष्प फल पर्ण वनस्पतीतें ॥ सत्यें स्वकार्य जड ही प्रकृती करीते ॥ ७ ॥
सत्येंच वस्तु वरि फेंकलि येत खालें ॥ सत्येंच बीज उगवे धरणींत गेलें ॥
सत्येंच त्या स्थिर नभांत असंख्य तारा ॥ सत्यावरी जगतिचा सगळा उभारा ॥ ८ ॥
सत्येंच शुंठि निज तीक्ष्णपणा न सोडी ॥ सत्येंच इक्षुरस वागवि नित्य गोडी ॥
सत्येंचि राहत कटुत्व सदा धरीतें ॥ सत्येंच आम्लरुचि चिंच निका वरी ते ॥ ९ ॥
जातां सुधेंत मिसळूनि हरिद्रचूर्ण ॥ सत्येंच तेथ उपजे स्फुट रक्तवर्ण ॥
सत्येंच दुग्ध विरजे पिळितांचि लिंबू ॥ सत्येंच तृट्छ्रम करी मधुशीतलांबु ॥ १० ॥
द्वारें अखंड उघडीं नव या शरीरा ॥ राहोनि आमरण वायु धरीत थारा ॥
उच्छ्वास बाहिर पडे परतोन येई ॥ आश्चर्य हें घडत सत्यबळेंच पाहीं ॥ ११ ॥
सत्यें खरांशु उगवे गगनांत केंवी ? ॥ शंका अशी तव मनीं न कधीं वसावी ॥
दैवज्ञ रव्युदय आधिंच वर्तवीती ॥ सत्याविणें गणित शक्य न, येर रीति ॥ १२ ॥

चंद्रोदयास्तसमयें क्षयवृद्धिकाल ॥ सिंधूस नाविक गणी बहु दीर्घकाल ॥
याम्योत्तरादि निवडी ध्रुव-चुंबकानें ॥ सत्येंच हें घडत, ना इतरांप्रमाणें ॥ १३ ॥
जें वाग्भटें कथियलें हृदयांत चूर्ण ॥ तें देउनी म्हणत आपण वैद्य पूर्ण ॥
सत्यास सुंठ-मध-पिंपळमूळ सोडी ॥ कैसा भिषग्वर तरी सुयशास जोडी ॥ १४ ॥
सत्येंच दंदशूक ने विष आत्मदंतीं ॥ सत्येंच दष्टशरिरीं विषवेग येती ॥
सत्येंच मांत्रिक करी वरि भारणीतें ॥ सत्येंच मंत्र फळुनी विष दूर होतें ॥ १५ ॥
शय्येवरूनि उठुनी नुघडोनि डोळे ॥ झोंपेंत रात्रि धनि माजघरांत चाले ॥
सोडूनि सत्य धरणी जरि दार्ढ्य टाकी ॥ ज्ञाते वदोत, तिमिरीं पद कोण टाकी ? १६
कोणी मितंपच कृषीवल पांखरांतें ॥ देई न धान्य चिमटी, कितिही पिको तें ॥
तो पाखडूनि निवडूनि स्वयेंच रानीं ॥ मातींत दे मिसळुनी, बहु हर्ष मानी ॥ १७ ॥
दे पांखरां न कणही, परि मृत्तिकेंत ॥ टाकी अनेक मण, जाउनि कृत्तिकेंत ॥
औदार्य हें कुठुनि त्या कृपणास आलें ? ॥ सांगा तुम्हीच श्रवणा मन हें भुकेलें १८
जाणे कृषीवल पुरें "धरणी प्रसू ही ॥ सांडूनि सत्य परती न कदापि जाई ॥
देई मला शतगुणें परतोन ठेवा." ॥ आधार तत्कृतिस हाचि मनांत ठेवा ॥ १९ ॥
हो चांदण्यांत अथवा निबिडांधकारीं ॥ नावेंत नाविक विशंक फिरे समुद्रीं ॥
कीं काष्ठतारणगुणा विसरे न वारी ॥ सत्येंच या मन तदीय भया निवारी ॥ २० ॥
होवो कशी विरळ, पोकळ, घट्ट, सांद्र, ॥ हो स्थूळ, सूक्ष्म, स्थिर, जंगम, शुष्क, आर्द्र ॥
आकाश वस्तुस सबाह्य भरून राहे ॥ सत्येंच हें घडत शोधुनि नीट पाहें ॥ २१ ॥
होतां पहाट करि कुक्कुट आरवातें ॥ जातां निशा द्विजतती धरिते नभातें ॥
गाई वसंत दिसतां पिक पंचमातें ॥ कर्तव्यदक्ष करि सत्य विहंगमांतें ॥ २२ ॥
येतां गजाननचतुर्थतिथी वराह ॥ घे घोण भूमिंत पुरून, विधू न पाहे ॥
शार्दूल खाय न अनामिकस्पृष्ट मांस ॥ सत्यास मानिति चतुष्पद वन्य हिंस्र ॥ २३ ॥
जो कावळा, झडपुनी कर, भात नेई, ॥ तो ठेविला उघड पिंड कदा न खाई, ॥
राहे जरी अपुर हेतु दिवंगताचा; ॥ सत्येंच हें घडत ना वद व्यक्त वाचा ॥ २४ ॥
सत्यास शाश्वतिक शत्रु असत्य आहे ॥ सिद्धांत हा निरपवाद जरीहि राहे ॥

सत्याश्रयाविण असत्य तरी न वांचे ॥ सत्यप्रभाव कवणा वदवेल वाचे? ॥ २५ ॥
हाटीं पदार्थ नकली बहुसाल होती ॥ ते अस्सलाजवळ जों लगटूं पहाती ॥
मोलास तों चढति ते अधिकाप्रमाणें ॥ सोन्यापरी पितळ दावुं पहात वाणें ॥ २६ ॥
घे पांशुला वरुनि भाव पतिव्रतेचा ॥ स्तायू जनीं म्हणवि आपण साव साचा ॥
भोंदूहि दावि भजकाप्रति साधुरीती ॥ याहूनि सत्यमहिमा कथुं कोण रीतीं? ॥ २७ ॥
ऐशापरी सकल पद्मभवांड भव्य ॥ सोडूनि जाय लवही नच सत्य दिव्य ॥
हे मानवा ! सकल सृष्टगरिष्ठ तूंची ॥ कां विश्वगामि नियमा अपवाद होशी ॥ २८ ॥

**महादेव हरी मोडक.** बी. ए.

---

## रुक्मिणीपरिणय.

वराकारणें मूळ राजा निघाला, ॥
विमानांत अंतःपुरीं सिद्ध झाला, ॥
पुढें चंड वाद्यें, नभीं घोष गाजे, ॥
सवें सर्व सीमांतपूजा विराजे. ॥ १ ॥
मिरवत गजरेंसी राजसेना निघाली, ॥
रथ हय गज यानें चालतां दाटि झाली, ॥
निबिडजनपदातें वारिती वेत्रपाणी, ॥
सुकृत नरपतींचें वानिती भाट गाणीं. ॥ २ ॥
मग येइजे अतिसमीप विवाहीं, ॥
वसुदेव त्यासमुख ये लवलाहीं; ॥
प्रभु भेटले उभयतां सुख त्यांसी, ॥
मणियुक्त विष्टर दिलें सकळांसी. ॥ ३ ॥
नृप करि वरपूजा वेदविध्युक्तमंत्रीं, ॥
तदुपरि मृदुशब्दें प्रार्थिला भूपमंत्री; ॥

'लव पळ घटिकेचें मान वेंचूनि जातें, ॥
उचित समय साधा,' सांगती भूभुजातें. ॥ ४ ॥

उच्चैःश्रवा वडिल बंधु घडे जयाचा, ॥
ऐसा तुरंगम सरोरुहलोचनाचा; ॥
आरूढला मग तयावरि दानवारी ॥
वृष्णी हलायुध सर्वें परि पूतनारी. ॥ ५ ॥

मिरवत हरि आला नोवरीमंडपासीं, ॥
तंव सदृढ कवाडें लाविती राजदासी; ॥
उचितसमयकाळीं पावल्या त्या निवाडें ॥
तदुपरि मग तीहीं मुक्त केलीं कवाडें. ॥ ६ ॥

वऱ्हाडी सभामंडपामाजि आले, ॥
विचित्रासनीं बैसते सर्व झाले; ॥
सुधर्मा सभा नाकलोकीं विराजे, ॥
तशी संसदी भूतळीं दिव्य साजे. ॥ ७ ॥

रत्नस्तंभविराजमान मढिल्या भिंती विचित्रांबरीं ॥
चौरंगावरि उत्तरच्छद निके दिव्योपधानें वरीं ॥
वाद्यें वाजति, भाट गाति बिरुदें श्रीकृष्णलीला मुखें, ॥
नेत्रीं देखति सोहळा सुर उभे राहूनियां सन्मुखें. ॥ ८ ॥

वसुदेव पूजन करी नवरीचें, ॥
मनिं वांछिती सुरवधू यश जीचें ॥
मधुपर्क वेदविधिपूर्वक केला, ॥
फल वाहिलें नृपवरें नृपजेला. ॥ ९ ॥

अलंकार वस्त्रें नवीनें विचित्रें, ॥
सुनें वाहिलीं यादवेंद्रें पवित्रें; ॥

उपाध्या दिलीं कोटि रत्नें अपारें, ॥
सुवर्णांबरें दिव्य नानाप्रकारें. ॥ १० ॥

"आली लग्नघडी," पुरोहित म्हणे, "आतां करा तांतडी." ॥
वस्त्रें नेसविलीं सुगंध सुमनें वाहोनियां आवडी; ॥
माड्याच्या घडिया तयां वधुवरां पायांतळीं घातल्या ॥
नांदी काढुनि अंत्रपाट धरिला मंत्रध्वनी लागल्या. ॥ ११ ॥

'ओम् पुण्य' शब्द म्हणतां वधु शीघ्र पाहे, ॥
दिव्याक्षता यदुविरावरि टाकिताहे; ॥
घाली हरी वधुवरी शुचि अक्षतांसी ॥
गर्जेति मंगळतुरें सुरनिर्जरांसीं. ॥ १२ ॥

पश्चिमाभिमुख नोवरी बसे, ॥
प्राग्दिशीं सुमुख नोवरा बसे; ॥
वोहरें सुतविलीं सुलक्षणें, ॥
बांधिलीं उभयतांसि कंकणें. ॥ १३ ॥

धनें जिरें वायन झालि यानें, ॥
वधू कडे घेतली नोवऱ्यानें, ॥
शिंपावया आम्र निघे मुरारी, ॥
कपाट देती मग राजनारी. ॥ १४ ॥

नांवें घेवविलीं तदा गदगदां राजांगना हांसती, ॥
केलें मुक्त कपाट, वाट दिधली, गेला पुढें श्रीपती; ॥
श्रीगौरीहर पूजिला वधुवरीं आम्रद्रुमा सिंचिलें, ॥
आला बाहिर वैदिकें मग निकें होमासि संपादिलें. ॥ १५ ॥

असें झालें पाणिग्रहण विधिनें सप्तपदिचें ॥
वराचे वामांगीं मिरवत वधू, रूप रतिचें; ॥
'दिजे आज्ञा' रायाप्रति हरि म्हणे 'जाउं सदना,' ॥

प्रभु प्रार्थी 'कीजे मम भवनीं चातुर्थहवना.' ॥ १६ ॥
आले कर्ण पिळावयास हरिचे चौघे निके मेहुणे, ॥
भीती रुक्म विटंबिला म्हणउनी श्रीकृष्ण जाणे खुणे, ॥
त्यांतें गौरविलें निशा क्रमियल्या प्रातर्विधी सारिला, ॥
राजा शुद्धमतीस हास्यवदनें अत्यादरें बोलिला. ॥ १७ ॥

'भोवल्या कळस देवकीकरीं, ॥
मूळ जाय तिजला त्वरा करीं, ॥
रोहिणीप्रमुख मंदवादिनी, ॥
मंडपा विहिणि आणि या दिनीं.' ॥ १८ ॥
राजांगना तदुपरी गजरें निघाली, ॥
श्रीकृष्ण मंडपगृहाप्रति शीघ्र आली; ॥
प्रार्थूनियां मग तई वसुदेवजाया, ॥
त्या आणिल्या सुनमुखांबुज हो पहाया. ॥ १९ ॥
अंकावरी नवरि घेउनि रूप पाहे, ॥
त्यानंतरें कळस भोवलि तीस वाहे; ॥
झालें असें हळदिचें उटणें प्रभावें ॥
त्या वोहरांकडुनि घेववितांति नांवें. ॥ २० ॥
कदंबाभिधानें असे तीर्थ जेथें, ॥
तरू मंडपाकार अद्यापि तेथें, ॥
महीपाळ आमंत्रणातें निघाला, ॥
विवाही स्वधामासि घेऊनि आला. ॥ २१ ॥
घातलीं सकाळिकांसि आसनें, ॥
मांडलीं कनकरत्नभाजनें, ॥
भोजनासि मग पंक्ति बैसली, ॥
ते सभा वधुवरी विराजली. ॥ २२ ॥

निंबें आम्रफळें रसाळ गजरें मूळे तथा भोंकरें, ॥
आलें आंवळिचीं फळें पचविलीं वेलें किती सुंदरें; ॥
सुस्वादिष्ट कुशुंबरी अनुपमा पात्रांतरीं राजती, ॥
वृंताकें प्रमुखें प्रभावळि महाशाखांचिया शोभती. ॥ २३ ॥

पात्रीं ओदन वाढिलें, लखलखी जैसा शरच्चंद्रमा, ॥
क्षीरी पंच वरान्न पापड वडे लाडू यथानुक्रमा; ॥
मांडे तेलवऱ्या बऱ्या गुळवऱ्या घाऱ्या पुऱ्या फेनिया ॥
संतृप्तें घृतशर्करा पयदधी संपूर्ण हे झालिया. ॥ २४ ॥

नाना सुगंध उदकें भरिलीं सुपात्रें, ॥
आपोषणें करिति सर्व पलार्धमात्रें; ॥
प्राणाहुती करुनि सारिति भोजनातें ॥
विज्ञाति भूभुज करी प्रभु यादवातें. ॥ २५ ॥

लेह्य पेय चोष्य खाद्य भक्ष्य भोज्य आणिले, ॥
जें जयांसि आवडे तयांसि तेंचि वाढिलें; ॥
प्रीतिपाद्य बद्धहस्त कौंडणेश लाघवी ॥
'स्वस्थचित्त जेविजे,' विवाहियांसि वीनवी. ॥ २६ ॥

स्वस्थ संपादिलीं भोजनें मांडवीं, ॥
उत्तरापोशनें घेतलीं यादवीं; ॥
दिव्य तांबूल दे भूप त्याकारणें, ॥
पुष्पगंधाक्षता अंबरें भूषणें. ॥ २७ ॥

सभे बैसले सर्व आनंदरूपें, ॥
किजे ऐरणीपूजनालागि भूपें, ॥
दिलीं अंबरें भूषणें दिव्य रत्नें, ॥
नृपें अर्जिलीं जीं यशोदार यत्नें. ॥ २८ ॥

शिरीं झालि तैं आफळी व्याहियांचे ॥
हलीनोवरानोवरीयादवांचे; ॥
वदे देवकी रेवतीरोहिणीसीं, ॥
करी प्रार्थना घेउनी रुक्मिणीसी. ॥ २९ ॥
म्हणे "अष्टवर्षा भवेत् कन्यका या, ॥
इची लागलीसे सुताहूनि माया, ॥
तुम्हां दीधली पुत्रवंतीस पाळा," ॥
वधू स्फुंदता बाष्प येती भुपाळा. ॥ ३० ॥
घेंडा नाचविला स्वधर्मकुळिंचा संपूर्ण संपादिला, ॥
केला होम चतुर्थ, गौरिहर तो श्रीवोहरी पूजिला; ॥
देवोत्थापन भोपया भुतविला, भूपाल पाचारिला, ॥
आज्ञा मागितली स्वमंडपगृहा श्रीकृष्णजी चालिला. ॥ ३१ ॥
गजस्कंधारूढें मणिचवरडोला वधुवरें, ॥
पुढें नाना वाद्यें ध्वनित चमु वेष्टीत गजरें; ॥
निजस्थाना आले, गृह भरुनि, लक्ष्मीस नमिलें , ॥
समारंभें द्वारावतिस उभ येताति नवलें. ॥ ३२ ॥
पुन्हां वर्णूं द्वारावति तरि दिवाळी सण सदा, ॥
दरिद्राची वार्ता न करिति पुरींचे जन कदा; ॥
सुवर्णाचीं पद्में झळकति महारत्ननिकरें ॥
सडे काश्मीराचे विशद गुडियादीक मखरें. ॥ ३३ ॥
पुरी द्वारकेमाजि आनंद गाजे, ॥
गृहस्थाश्रमीं कृष्ण लक्ष्मी विराजे ॥
टिका श्लोक आख्यान संपूर्ण झालें, ॥
शुकाच्या मुखें वाक्य ऐसें निघालें. ॥ ३४ ॥

विठ्ठल.

२५६ ना.

## कंसवध.

नवरसें भवरोगरसायनें ॥
करि हरी करिती मुनि गायनें; ॥
किमपि कंसवधीं रस देखिले, ॥
कथिन जे मनिं वामनिं रेखिले. ॥ १ ॥
रंगाचिया दारवटांचि हस्ती ॥
मारूनि घे साग्रज दंत हस्तीं, ॥
देहीं गजाचे मदरक्तबिंदु ॥
तो मल्लरंगांत मुकुंद वंदू. ॥ २ ॥
भिन्न भिन्न मतिच्या अवलोकीं ॥
देखिला कसकसा रस लोकीं, ॥
श्लोक एकचि वदे शुक राया, ॥
जे रसज्ञ तिहिं अर्थ कराया. ॥ ३ ॥

दे मल्लां रस रौद्र, अद्भुत नरां, शृंगार नारीजना, ॥
गौळ्यां हास्य, नृपांस वीर, करुणा मातापित्यांच्या मना; ॥
कंसालागिं भयानकाख्य रस दे, बीभत्स मूढां भ्रमें, ॥
संतां शांतरस, स्वभक्तिरस तो दे यादवां, या क्रमें. ॥ ४ ॥

नवरस हरि दावी यांत मल्लादिदृष्टि, ॥
करि दशम रसाची यादवांमाजि वृष्टी; ॥
रस दश कथिले जे ज्या क्रमें श्रीशुकानें, ॥
हरिगुणरस तैसे घ्या मुखें आणि कानें. ॥ ५ ॥

दहा रस श्रीशुक बोलिला, हो ! ॥
त्यांचा क्रमें घ्या श्रवणादि लाहो; ॥
रसीं प्रतिश्लोकरसावलोकीं ॥
गुणामृतप्राशन मृत्युलोकीं. ॥ ६ ॥

वधुनि दारवंटांचि महाकरी ॥
उभय दंत सहाग्रज घे करीं, ॥
गज वधूनि मृगांत जसा हरी ॥
त्वरित मल्लदळांत निघे हरी. ॥ ७ ॥

रणांगणीं लक्षुनि कैटभारी, ॥
वज्राहुनी मानिति मल्ल भारी, ॥
ऐशा हरी रौद्ररसाशि दावी, ॥
कथारसाची रुचि हे वदावी. ॥ ८ ॥

भोजराज विगतप्रभ झाला, ॥
श्रीपती नृप गमे मनुजांला. ॥
दाखवी सुरस अद्भुत लोकीं ॥
कीं असें जन मला अवलोकीं. ॥ ९ ॥

शरीर रक्तांकित; दंत हस्तीं ॥
येतो कसा डोलत मत्त हस्ती? ॥
म्हणोनि जे हांसति सख्यभावें, ॥
गोपाळ हा हास्यरस स्वभावें. ॥ १० ॥

'घेऊनियां याच नृपासनातें, ॥
करील आम्हांवरि शासनातें.' ॥
वाटे असें दुःख नृपांसि भारी, ॥
वीराख्य दावी रस कैटभारी. ॥ ११ ॥

कृष्ण हा परम देवदेव कीं ॥
हें स्मरे न वसुदेव देवकी; ॥
लेंकरूं म्हणुनि वर्षती दया, ॥
दाखवी हरि दयारसोदया. ॥ १२ ॥

'कृष्ण हीनबळ बाळ लेंकरूं, ॥
मल्ल मारितिल काय मी करूं?' ॥
येरिती करिति खेद दंपती ॥
फुंदती रडति आणि कांपती. ॥ १३ ॥

द्विरददंत जसे उपडूनि घे, ॥
रस भयानक कंसमनीं निघे; ॥
मनिं म्हणे, 'निमिषें वधिला करी ॥
मजहि मारिल यावरि लौकरी.' ॥ १४ ॥

अनंतशक्तीसहि अज्ञलोकीं ॥
अशक्त मानूनि कृपावलोकीं, ॥
निरूपिला खेद बहू प्रकारें, ॥
बीभत्स केला रस निर्विकारें. ॥ १५ ॥

श्रीमूर्ति देखूनि महाविभूती, ॥
संतां गमे स्वात्मसुखानुभूती; ॥
ते देखती शांत निजस्वरूपीं, ॥
दावी हरी शांतरस स्वरूपीं. ॥ १६ ॥

नवरस कवि गाती हेचि वर्णूनि जाती, ॥
निजचरितरसीं त्या दाखवी दिव्यजाती; ॥
दशम रस अनन्य प्रेमभक्तीस लोकीं ॥
यदुपति हरि तो दे यादवां स्वावलोकीं. ॥ १७ ॥

विना शेषशायी जनां यादवांला ॥
नसे देव ते देखती माधवाला; ॥
गमे राम तो शेष, हा शेषशायी, ॥
स्वपायीं तया दे रस प्रेमदायी. ॥ १८ ॥

इष्ट दैवत अभीष्ट अशेषें ॥
दे जनां प्रिय हितेंचि विशेषें; ॥
यादवां स्वसुख कल्पतरूचें, ॥
प्रेम हें सहज आदिगुरूचें. ॥ १९ ॥
इष्ट सर्वही अभीष्ट असेना ॥
कृष्णरूप सचराचरसेना; ॥
वामनास सकळात्मकलाहो ॥
कीर्तनप्रिय असा कळला, हो! ॥ २० ॥
सेविजे प्रिय मुकुंद उगा हो ॥
कीर्तनीं अजि! तयासिच गा, हो! ॥
या क्षणी सुख म्हणाल जगा हो ॥
हे मृगांबु ठकणार मृगां हो. ॥ २१ ॥
टीकाकार जसे क्रमें रस दहा हे बोलिले श्रीधरें, ॥
श्लोकींचे रस त्या क्रमें कथियलें हे वामनें सादरें, ॥
ये येती कवणेरिती अनुभवा तो भाव यां प्राकृतां—॥
श्लोकीं आणि पदीं असा अवविया आधार जो संस्कृता. ॥ २२ ॥

**वामनपंडित.**

---

## एका अभागिनीस दोन शब्द.

उद्यानांतिल पथ मी क्रमिले, रमवाया गेलें ॥
दुःखित चित्ता इकडे तिकडे सरित्तिरीं वसलें ॥ १ ॥
मनीं नंतरी गत गोष्टींचे विचार उद्भवले ॥
अनुभव जगतीं आले त्यांनीं मस्तक भणभणलें ॥ २ ॥
असमा दृष्टि, प्रलय यातना, अन्याय जगतींचा—॥
उभीं राहिलीं नेत्रांपुढतीं, थरकांप जिवाचा ॥ ३ ॥

निश्चय ठरला जीव नको हा, सिद्ध मरायाला—॥
उभी ठाकलें, उडी घेतली जाया यमपुरिला ॥ ४ ॥
दैव मज परी अनुकुल नव्हतें,—तदनंतर कळलें ॥
कोणीं एका दिव्य-वरानें मजला वांचविलें ॥ ५ ॥
सन्मुख, शुद्धीवर मी येतां, दिव्य तरुण दिसला ॥
दर्शनमात्रें उपरति झाली, निश्चय मम ढळला ॥ ६ ॥
वदला मजला "प्रिय भगिनी! त्वां काय असें केलें ॥
कवणें तुजला या अविचारा प्रोत्साहन दिधलें ॥ ७ ॥
प्रथमदर्शनीं जगतीं गमतो अन्यायपसारा ॥
कालचक्र परि गरगर फिरतां न्याया ही थारा ॥ ८ ॥
संत अमान्या कृति न करावी थोर जनें जगतीं ॥
गतभावीशी दृष्टि असावी, ठेवावी सुमती ॥ ९ ॥
परोपकारीं चंदन झिजतो, व्यक्तिदुःख विसरी ॥
तारागण नभभूषण आहे कृति निरपेक्ष करी ॥ १० ॥
लोकहितार्थी जन्म वाहणें युद्धसिद्ध समरीं ॥
खलवृत्तींचा छल थोरांनां जगतीं पूज्य करी ॥ ११ ॥
दुःखकाल वा सौख्यकाल हा क्षणिक जगीं जाण ॥
काय एकली भूवर दुःखी? क्षण सुमनीं आण ॥ १२ ॥
तुजसम भगिनी अन्यायाला अमुप बळी पडले ॥
अनृत, माया, अनाचार वा यांनीं नागविले ॥ १३ ॥
मुक्ति तयां दे, सत्पथ दावीं शुद्धाचरणानें ॥
सहन करावीं माहिवर दुःखें सज्जन-थेरानें ॥ १४ ॥
शत्रुमित्र या उभयांठायीं समदृष्टि ठेव ॥
सत्पथ त्यजिला अशा जनांनां सन्मार्गी लाव ॥ १५ ॥
अबलातेजें सकलां दिपवीं, जग उद्धारीं गे ॥
जा तर विमले! जा गृहमार्गें, आत्मघात नलगे." ॥ १६ ॥

जय—दत्त.

## तान्हुल्या बघुनि जावें.

केश कुरळे रुळताति शिरःप्रांतीं ॥
रम्य तेणें बहु दिसे बालमूर्ती ॥
दृष्टि चंचल नासीक रेखलेलें ॥
गाल दिसती जणुं फूल फांकलेलें ॥ १ ॥
गौर काया बाळसें त्यांत आलें ॥
ओष्ठसंपुट घडविला जणुं प्रवालें ॥
दृश्य होते लोचनीं भृंगकांती ॥
कुटिल भुंवया निटिलासि शोभवीती ॥ २ ॥
मालतीच्या नव कळ्या एक केल्या ॥
दिसति तैशा तन्मुष्टि झांकलेल्या ॥
खुले जैसें शशिबिंब लांछनानें ॥
बाल-वक्ष-स्थल तसें स्तनांकानें ॥ ३ ॥
अर्ध विकसित सुमकली दिसे डोळां ॥
वदन तैसें लागतां हंसायाला ॥
रूप त्यानें तिकडचें चोरिलें तें ॥
स्मरण होतें मज म्हणुनि घडिघडीतें ॥ ४ ॥
नाम "माधव" तें ठेविलें तयाचें ॥
बहुत बाई तिकडच्या आवडीचें ॥
मनासारीखें दान दिलें देवें ॥
म्हणुनि म्हणत्यें "तान्हुल्या बघुनि जावें." ५ ॥

विहारी.

## पांचवी ( पक्की ).

### अभिमन्युविवाह.

अच्युतपदासि चिंतुनि सानुज धर्म स्ववेष घेऊनी ॥
सुदिनीं बसे नृपपदीं त्या मत्स्याच्या सभेंत येऊनी ॥ १ ॥
मागुनि विराट येउनि हांसोनि म्हणे "सभासदा कंका ॥
भद्रासनीं बसाया आजि तुज कसी न वाटली शंका" ॥ २ ॥
अर्जुन म्हणे "नृपा हा हरिच्या अर्धासनीं बसायाचा ॥
आहे प्रतापमहिमा विख्यात जगत्रयीं असा याचा ॥ ३ ॥
गंधर्वांसि हरि म्हणे याचींच यशें करूनि तांडव गा ॥
हा पुण्यश्लोक प्रभु सम्राट् सद्गुणसमुद्र पांडव गा" ॥ ४ ॥
मत्स्य म्हणे "पांडव हा तरि भीमप्रमुख बंधु जे चववे ॥
कोठें? कृष्णा कोठें? जीस क्षणहि न विसंबिती अवघे" ॥ ५ ॥
पार्थ म्हणे "सूद तुझा बल्लव मगधेंद्रकाय हा चिरिता ॥
करिता झाला सूतान्वयसागर भीमकाय हाचि रिता ॥ ६ ॥
हयपाळ जो नकुळ तो, गोपाळक तोचि होय सहदेव ॥
अर्जुन बृहन्नडा मी भिडला ज्या चापपाणिसह देव ॥ ७ ॥
सैरंध्री हे कृष्णा, मेले कीचक इला अनादरिते ॥
हे किति हरमुरज उदधि व्हावे क्षोभें इच्या अनाद रिते ॥ ८ ॥
अज्ञातवास दुर्घट परि निर्विघ्न त्वदाश्रयें घडला ॥
होतों सुखरूप तुझ्या गर्भांत श्रम न लेशही पडला" ॥ ९ ॥
उत्तरहि पांडवांतें वर्णुनि कळवी पुन्हा स्वजनकास ॥
कीं "हेचि घालणारे व्यसनीं तारावया स्वजन कास" ॥ १० ॥
भूप म्हणे "त्वां अर्जुन पूजावा सर्वकाळ भीमहि म्यां ॥
न असह्य, हरिजनाच्या सोडुनियां गर्व काल भी महिम्या ॥ ११ ॥

वत्सा काय वदों रे धर्मात्मा धर्म हा असा मान्य ॥
म्यां ताडिला ललाटीं अक्षें अपराध हा असामान्य ॥ १२ ॥
सचिवांहीं म्यां त्यांही प्रार्थावा धर्मराज, कन्या या ॥
द्यावी धनंजयाला पोटीं घालावयासि अन्याया" ॥ १३ ॥
उत्तर म्हणे "बहु बरें नकळत अपराध घडति, परि साचे ॥
साधु क्षमी यशस्कर, घनहि सुभूषेंत पडति परिसाचे" ॥ १४ ॥
भेटे विराट राजा त्या पांचां पांडवास गुरुसाच ॥
व्यसनांत आश्रयपद अन्नप्रद होय वृद्ध गुरु साच ॥ १५ ॥
धर्मासि म्हणे "बाऽगा साधो जोडा नसेचि या दिवसा ॥
स्वपदीं मच्चित्तींही संपादुनि सुकृतजयदयादि वसा ॥ १६ ॥
तूंचि बळी स्वजनासह तरलासि न वायुनंदन वनौका ॥
वरिति सुमति सत्संगति उतराया वार्धि मंद नव नौका ॥ १७ ॥
तारुनि परासि तरती हरिजन जें वर्णिलें असें कविनीं ॥
तें दाविलें मज तुम्हीं कुरुकुळसंततिसरोजिनी-रविनीं ॥ १८ ॥
राज्यादि सर्व दिधलें तुज म्यां हें आपुलें असें म्हण गा ॥
शशिचूड नको न म्हणे धुतऱ्याचें फूल वाहत्या भणगा ॥ १९ ॥
धर्मा धनंजयवधू होउ म्हणे धन्य भाग्य मत्तनया ॥
देसील मान वचना तूंचि प्रभु अन्य भाग्यमत्त न या" ॥ २० ॥
पाहे धर्म धनंजयवदनातें तेधवां, नर वदे तो ॥
तें परिसिते म्हणति सुख याहूनि हरिवेणुचा न रव देतो ॥ २१ ॥
प्रेम तुझें आम्हांवरि ऐसेंचि दयासुधानदा राहो ॥
अभिमन्युची वधू हो ती माझी बा बुधा न दारा हो ॥ २२ ॥
कैंवि वरावी? वर्तत होती कीं एकवर्ष कन्यासी ॥
हरिजनकथेंत शिरतां न विशंकावे शुकादि संन्यासी ॥ २३ ॥
तो साधुजनां तोखद ओखदसा होय खळजनां भाचा ॥

योग्य तुला जामाता बहिश्वर प्राण जळज-नाभाचा" ॥ २४ ॥
मत्स्य म्हणे "बा धर्मा-वंद्य तुझें नंदना वना शील ॥
त्रिजगदघातें तुमचें पुण्यलताकन्द नाव नाशील ॥ २५ ॥
देवा सौभद्रार्थ स्वीकारावी तुम्हींच कन्या हो ॥
घ्या पदरीं हे सन्तति या संबंधें जगांत धन्या हो" ॥ २६ ॥
धर्म म्हणे "बहु उत्तम हें मज अश्लाघ्य काय हो नातें ॥
मिळतां सुवर्णमुद्रा अर्थी इच्छील काय होनांतें ॥ २७ ॥
धाडूनि दूत धर्में आप्तांला हा विवाह जाणविला ॥
अभिमन्यु राम कृष्ण द्रुपद स्वकुमारवर्ग आणविला ॥ २८ ॥
आणुनि संपत्ति दिल्या श्रीकृष्णें भक्तनायका सारा ॥
तो आटतांचि आला भेटाया मेघ काय कासारा ॥ २९ ॥
अभिमन्युविवाहोत्सव जग निववी, जेंवि चंद्र पुनिवेचा ॥
धर्म म्हणे "हूं कनकें मणि बहु वस्त्रान्नराशिहूनि वेचा ॥ ३० ॥
नटनर्तकीगणातें धर्म म्हणे "रामकृष्ण गानाचा ॥
नृत्याचा रस शिवसे जाणाति जे त्यांपुढेंचि गा नाचा" ॥ ३१ ॥
भीम म्हणे "वाढा हो स्वस्थपणें भूमिदेव जेवा जी ॥
चालूं नका बसाया घ्या व्हावे जे महेभ जे वाजी" ॥ ३२ ॥
राम म्हणे "घालाव्या कुडक्या चारीहि याच कानीं कीं ॥
मुनि भूषवितां भासे मूर्तस्वर्वृक्ष याचकानीकीं ॥ ३३ ॥
सहदेव नकुळ अर्जुन अच्युत बळ भीम धर्म नव्याही ॥
त्या नात्यासि न मिरविती, ते गमति विराटबंधु, न व्याही ॥ ३४ ॥
श्रोतेहो वर्णावें किती, मज गप्पी असें वदाना कीं ॥
स्वल्प उपप्लव्यपुरीं उत्सव, बहु होय हो तदा नाकीं ॥ ३५ ॥
वदवि मयूराकरवीं श्रीराम विराटपर्व चवथें बा ॥
स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा ॥ ३६ ॥
रामघन सत्प्रसादाऽमृत जों जों बहु वळोनि वर्षतसे ॥
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करून हर्षतसे ॥ ३७ ॥

**मोरोपंत.**

## कुंतीसंदेश.

स्वरथीं चढोनि भगवान् मग जाय पुसावयासि आतेला ॥
तेंचि वदूं, कोण रसिक गोघृत सोडुनि करील आ तेला? ॥ १ ॥
सांगे सुयोधनाचें मत संक्षेपें यदूद्वह सतीतें ॥
धर्मासि निरोप पुसे सुतमार्दव आठवूनि हसतीतें. ॥ २ ॥
कुंती म्हणे "वद असें त्या मत्तनयासि कमळनयना, कीं ॥
परिसोत पूर्वज तुझा प्रेमें सुरगीत अमळ नय नाकीं ॥ ३ ॥
वाटे सुभटें पुत्रें मेळविला विप्रसेवनीं नव ट ॥
वर्षेष्णसहजटिल वर, तरि काय बहुत तसे वनीं न वट ॥ ४ ॥
वर्णिति रिपूंत समरीं दाखवितां बाहुबळ जना भाट ॥
ब्रह्म नामीं दुसरा योग्य, क्षत्रा न, जलजनाभा ट ॥ ५ ॥
जें सिंधुराजविजितस्वसुतातें बोलिली सती विदुला ॥
तें परिस सांगत्यें तुज यदुकुळकमळाकराचिया विधुला ॥ ६ ॥
विदुला म्हणे "अहा रे क्लीबा मंदा कसा पळालास ॥
कां वांचलासि, अयशस्कर ऐसा तूं न कां गळालास ॥ ७ ॥
अरि हरिल राज्य, मग तूं वरिशिल वृत्यर्थ काय माधुकरी ॥
सुखकर सुकर्म टाकुनी असुखकर कुकर्म कोण साधु करी ॥ ८ ॥
जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सहपर्वजें तुजा तातें ॥
परमाऽनुचित पलायन कैसें केलें तुवां कुजाता तें ॥ ९ ॥
मरण विहित, न पलायन, भीती धर्मज्ञराजकन्या या ॥
अन्या याहुनि अधिका घडल्याही न गणतीच अन्याया ॥ १० ॥
साधूंसि बाहुजांचा मत विजय जसा, तसाचि वध मत, रे ॥
निजधर्माश्रित न बुडे, निजधर्मच्युत कधीं न अधम तरे ॥ ११ ॥
अधमा तुवां मरावें क्षणहि न बुडवूनि मान वांचावें ॥
काळा, यासम अन्यहि जे असतिल, त्यांहि मानवां चावें" ॥ १२ ॥

तो संजय तीस म्हणे "पुत्राच्या इच्छितीस कां मरणा ॥
वांछिति शमा अकामप्राज्ञ, इतर इच्छिती सकाम रणा ॥ १३ ॥
रडसील सस्नुषा कीं मज जरि देइल परासुता समर ॥
न म्हणेल स्वप्नींही शतपुत्राही परा सुतास मर" ॥ १४ ॥
"जी व्यर्थ उभयलोकाऽनुपयुक्त अपत्य वाढवी, ती तें ॥
स्पष्ट करी वात्सल्य, ज्ञाते जन म्हणति 'गाढवी' तीतें ॥ १५ ॥
निजलासि काय? उठ रे, जय पावतसे सदा समरशील ॥
उत्साह टाकितां तूं दैन्यें सांऽगन सदास मरशील" ॥ १६ ॥
संजय म्हणे "नमस्ते जननि, जन निशाकरें जसा निवतो ॥
बोधें तसा निवालों न हितकर गुरूपदेशसा शिव तो" ॥ १७ ॥
विदुलोक्त करी संजय जिंकुनि समरांत सिंधुराजाला ॥
सिंहीला तोचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरा जाला ॥ १८ ॥
सांग स्वसख्यासि असें झाली त्वत्सूतकीं गगनवाणी ॥
कीं "कुंति, हा अरि वधुनि पद साधिल, तुज सुखा मग न वाणी॥१९॥
होतिल सकळखळवधीं हरिहरमुख या बुधा सुरस हाय ॥
चित्तीं म्हणेल याच्या कीर्तिरसें जितसुधासुरस हाय" ॥ २० ॥
तें सत्य असो, तेंही जें युद्ध पुरांऽतका महेशासीं, ॥
मद्वीरसूत्वहि, श्रीस्त्रीकीर्त्यऽपहारकाम हे शासीं" ॥ २१ ॥
भीमासि म्हण "द्यूतीं नेलें जिंकूनि वित्त भीमा जें ॥
तें न स्मरें; न तुमच्या वनवासालाहि चित्त भी माजें ॥ २२ ॥
सलतें मनांत दुष्टें वोढुन नेली सभेंत कृष्णा तें ॥
स्मरली, त्वांहि उपेक्षा करितां, हरितां निरीस, कृष्णातें ॥ २३ ॥
त्या स्मरणें मन पडलें तापीं बहु, जेंवि तळमळत डागें ॥
हृदयें मोह उघडिला जैसा ग्रीष्मांत तळमळ तडागें" ॥ २४ ॥
दावावें यश जोडुनि कुळजानें सुप्रसन्नवदन कुळा ॥

प्रथम पुसोनि कुशल मग जगदीशा तूं असेंचि वद नकुळा ॥ २५ ॥
अयशस्कर तोक पळहि मळवाया धाम वा न रांगावें ॥
जरि न गमेचि, तरि सुखें चित्ररचितरामत्रानरां गावें ॥ २६ ॥
हें क्षत्रियासि समुचित, ऐसाचि निरोप सांग सहदेवा ॥
जो पांचांत यशस्कर, तो माझा पुत्र मूर्तमह देवा ॥ २७ ॥
कृष्णेसि सांग कृष्णा तिळभरिहि तुजें उणें नसो शील ॥
त्वां साहिलें, असें पळमात्रहि सर्वसहा न सोशील ॥ २८ ॥
सति तव सभाप्रवेशीं रामेंहि विलोकिलें परश्वश्रू ॥
निर्लज्जा कठिना मी, मरतांच तदा भली पर श्वश्रू ॥ २९ ॥
त्वां रक्षिलें, न झाले क्षम रक्षायासि मत्तनयनातें ॥
असते क्षम चरणनखा स्पर्शों देते न मत्तनयनातें ॥ ३० ॥
जरि बुडविलीस माझ्या पुत्रांही व्यसनगर्तलीनाहीं ॥
तरि न विटलीस, यापरि सत्वें कोणीहि वर्तली नाहीं ॥ ३१ ॥
किंबहुना सांग तयां समयीं जें काय चांगलें कांहीं ॥
कृष्णा, मन्मत हें, कीं यश रक्षावें, न आंग, लेंकांहीं ॥ ३२ ॥
बा गा म्हण बाहूंतें पुरवाया स्वजनकाम हा भागा ॥
मागायाचें तुज हें नाहीं म्हणसील का महाभागा ॥ ३३ ॥
पाहों नको मजकडे बा निजबिरुदावलीकडेचि पहा ॥
काय स्तनार्थिशिशुच्या शब्द उचित सांत्वनीं पडे 'चिप' हा ॥ ३४ ॥
नमुनि निघे, किमपि प्रभु न वदे, त्यावरुनियां असें वाटे ॥
कीं 'कृत्वा दर्शयते प्राज्ञ' असा भाव, कीं गळा दाटे ॥ ३५ ॥

मोरोपंत.

## प्रातःकाळची सहल.

होता आल्हादप्रद समय उषःकालिंचा किती नामी ॥
गेलों होतों तेव्हां निज **रमणीसह** वनीं फिराया मी ॥ १ ॥
होता सुखवित अंगा वाहुनियां शीत मंदसा वारा ॥
पसरी दाहि दिशा जो सुगंध लुटुनी फुलांतला सारा ॥ २ ॥
शोभे पूर्वदिशेच्या कुंकुमतिलकासमान जें भाळीं ॥
पावे उदय मनोरम बिंब रवीचें असें तया काळीं ॥ ३ ॥
बघुनि जयातें मोदें मधु गीतें विहग लागले गाया ॥
मृदुल करस्पर्शानें झाल्या ज्याच्या प्रसन्न दिग्जाया ॥ ४ ॥
झालीं विकसित सुमनें आला पाहूनि आपला बंधू ॥
चमकति ज्यावर भारी सुंदर मोत्यासमान दंवबिंदू ॥ ५ ॥
हरिततृणांवरि लतिकापर्णांवरि मृदु फुलांवरी तेंवी ॥
जे चमकति दंवबिंदू शोभा त्यांची किती मुखें गावी ॥ ६ ॥
होता निज तेजें जो खुलवित तारासमूह गगनातें ॥
तो भूवरि अवतरला दंवबिंदूच्या मिषें मना वाटे ॥ ७ ॥
किंवा रवि-सिंहानें तिमिरद्विप परम मत्त जो वधिला ॥
मौक्तिकसमूह त्याच्या जणुं हा गंडस्थळांतुनी गळला ॥ ८ ॥
हलवी मंद समीरण कोमल वेलीवरील सुमराजी ॥
जमले जेथें त्यांच्या मधुकर गंधास होउनी राजी ॥ ९ ॥
मधुनि मधुनि बागडते कोठें स्वच्छंद पंक्ति हरिणांची ॥
फुलपांखरें मनोरम उडति कुठें भिन्नभिन्न वर्णांचीं ॥ १० ॥
ऐशी निसर्गशोभा अवलोकन करित चालकों दोघें ॥
ता एक रम्य ओढा मार्गी आम्हांस आडवा लागे ॥ ११ ॥
तेव्हां प्रियेस वदलों "वनलक्ष्मीचें दिसे इथें ठाणें ॥
डोळे भरूनि पाहूं स्थल हें, नलगे गडे! पुढें जाणें ॥ १२ ॥

रांगे जसा छबुकडा बालक, हा वाहतो तसा ओढा ॥
आहे तत्सम याचा सरिता-जननीकडे किती ओढा ॥ १३ ॥
नाचत नाचत कोठें, कोठें उंचावरोनि वेइ उड्या ॥
राही अचल कुठें हा, कोठें स्वच्छंद खेळतो फुगड्या ॥ १४ ॥
जातां धरावयाला चक्रापरि तान्हुला फिरे जैसा ॥
तैसा पहा इथें हा जाई खडकास घालुनी वळसा ॥ १५ ॥
निर्मळ जल बघुनी हें वाटे मुखदर्शनार्थ वनदेवी ॥
निर्मी दिव्य मुकुर हा गगनश्री ज्यापुढें उणी व्हावी ॥ १६ ॥
तीरस्थ वृक्ष-राजि प्रतिबिंबित हो कुठें जलामाजी ॥
कोठें कोठें सुंदर पाण्यावर विखुरलीं फुलें ताजीं ॥ १७ ॥
पाहुनि तयांस वाटे प्रातःकालीं हिमार्त हें बाल ॥
पाहुनि वनदेवी दे सुंदर ही पांघरावया शाल ॥ १८ ॥
बघ हे विहंग इकडे खेळति याच्यासवें किती मोदें ॥
कोणी बघती यातें रिझवाया मधुर गान-रव-नादें ॥ १९ ॥
फडफडवुनि निज पक्षा कोणी बहु उंच उडविती पाणी ॥
उठविति तरंग सलिलीं टोंचुनियां चंचु आपल्या कोणी ॥ २० ॥
उडाति जलावर कोणी पुनःपुन्हां घे तयांत कोणि बुड्या ॥
निजपक्षां शुचि करिति कोणी येवोनि वाळुवरि उघड्या ॥ २१ ॥
विविध कुसुम-फल-पादप तीरावरि दाट हे किती असती ॥
सिकता-कण रवि किरणें कोठें रत्नासमान लखलखती ॥ २२ ॥
सर्वत्र जाय भरुनी निरुपम सौंदर्य सृष्टिचें येथें ॥
पाहोनि ज्यास सुंदरि पडतो अनिवार मोह नयनांतें ॥ २३ ॥
शुद्धानंदनिधाना स्थाना या वाटतें न सोडावें ॥
गाउनि गाणीं येथें गमतें तुजसह निजायु कंठावें ॥ २४ ॥

**दत्तात्रय भिमाजी रणदिवे.**

## नीतिशतक.

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, ॥
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें, ॥
न जाणे न नेणे अशा पामराला, ॥
बुझावूं शकेना विधाता तयाला ॥ १ ॥

बळानें काढूं ये मणि मकरदाढेंत दडला, ॥
महासिंधूलाटातरण करुं येई भुजबळा, ॥
महासर्पातेंही सुमसम धरूं ये निजशिरीं, ॥
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ २ ॥

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि घडे ॥
तृषार्ताची तृष्णा मृगजळजळें जाण विघडे, ॥
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी, ॥
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ ३ ॥

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो, ॥
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया धांवतो, ॥
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो, ॥
जो 'मूर्खासि सुभाषितें वश करूं' ऐसें ह्मणी बोलतो. ॥ ४ ॥

विनिर्मिलें झांकण अज्ञतेचें, ॥
स्वाधीन हें पद्मभवें फुकाचें, ॥
मूर्खासि जें मौनचि फार साजे, ॥
सभेसि त्यांच्या बहु जाणते जे. ॥ ५ ॥

जधीं कांहीं कांहीं 'हरि,' 'कवि,' असे शब्द शिकलों, ॥
तधीं 'मी सर्वज्ञ.' द्विपसम मदें याच भरलों; ॥
जधीं 'कांहीं नेणे' म्हणुनि वदले पंडित मला, ॥
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला. ॥ ६ ॥

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा, ॥
पद्मावीण जलें निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा, ॥
दात्याला धनलोभ, नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं, ॥
दुष्टाचा पगडा महीपतीगृहीं, हीं सात शल्यें मनीं. ॥ ७ ॥

दुबळिकेंत पसा यव इच्छितो, ॥
प्रभुपणीं धरणी तृण मानितो ! ॥
म्हणुनियां कृपणत्व उदारता, ॥
घडतसे समयोचित तत्वता. ॥ ८ ॥

वित्पकालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व वरवें, ॥
सभे पांडित्याचा प्रसर, समयीं शौर्य मिरवे, ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जें, ॥
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे ॥ ९ ॥

वानोत निंदोत सुनीतिमंत, ॥
चळो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं, ॥
सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥ १० ॥

न चोराला लाधे, प्रगट न दिसे, दे सुख सदा, ॥
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेशहि कदा, ॥
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असे, ॥
असे ज्याचें त्याशीं प्रतिभटति जे पामर पिसे. ॥ ११ ॥

जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा, ॥
संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा? ॥
पद्माचा जो तंतु तो वारणाला, ॥
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला. ॥ १२ ॥

झाला क्षीण बहु क्षुधेस्तव, जरी कीं व्यापिला वार्धकें, ॥
आली कष्टदशा, घडो मरणही, कीं तेज गेलें निकें, ॥
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा? ॥
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तकशुभग्रासींच ज्याला स्पृहा. ॥ १३ ॥

सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेच ना, ॥
घडो मरण, नावडे खलजनांप्रति प्रार्थना, ॥
विपत्तिसमयींहि जो प्रकटवीच ना दीनता, ॥
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता? ॥ १४ ॥

ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं, ॥
कीं जेंहीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं, ॥
लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी वानिती, ॥
चित्तीं तोषहि पावती, सुजन ते नेणों किती नांदती? ॥ १५ ॥

महीपृष्ठीं केव्हां, अवचट पलंगीं पहुडतो, ॥
क्षुधेतें शाकान्नें, अवचट सदन्नें निवटितो, ॥
कधीं कंथाधारी, अवचट सुवस्त्रीं मिरवितो, ॥
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो. ॥ १६ ॥

दुर्मंत्रें नृप, संगतिस्तव यती, कीं पुत्रही लालनें, ॥
वेदानध्ययनें द्विजाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें ॥
नासे शील, न पाहतां कृषि, मदें मा, लाज मद्यें फुका, ॥
शाठ्यें मित्रपण, प्रवासगमनें स्नेह, प्रमोदें रुका. ॥ १७ ॥

लज्जेनें जड, दांभिक व्रतिपणें, कापट्य शौचें गणी, ॥
शौर्यें निर्दय, आर्जवें लडवड्या, कीं दीन सद्भाषणीं, ॥
मानेच्छा तरि मूर्ख, कीं बडबड्या वक्ता, निकामी भला, ॥
ऐसा तो गुण कोणता खलजनीं नाहींच जो निंदिला! ॥ १८ ॥

राहो जाति रसातलीं, सुगुण हे राहोत कीं खालते, ॥

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा, ॥
पद्मावीण जलें निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा, ॥
दात्याला धनलोभ, नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं, ॥
दुष्टाचा पगडा महीपतीगृहीं, हीं सात शल्यें मनीं. ॥ ७ ॥

दुबळिकेंत पसा यव इच्छितो, ॥
प्रभुपणीं धरणी तृण मानितो ! ॥
म्हणुनियां कृपणत्व उदारता, ॥
घडतसे समयोचित तत्वता. ॥ ८ ॥

विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें, ॥
सभे पांडित्याचा प्रसर, समयीं शौर्य मिरवे, ॥
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जें, ॥
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे ॥ ९ ॥

वानोत निंदोत सुनीतिमंत, ॥
चळो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं, ॥
सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥ १० ॥

न चोराला लाभे, प्रगट न दिसे, दे सुख सदा, ॥
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेशहि कदा, ॥
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असे, ॥
असे ज्याचें त्याशीं प्रतिभटति जे पामर पिसे. ॥ ११ ॥

जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा, ॥
संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा ? ॥
पद्माचा जो तंतु तो वारणाला, ॥
वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला. ॥ १२ ॥

झाला क्षीण बहु क्षुधेस्तव, जरी कीं व्यापिला वार्धकें, ॥
आली कष्टदशा, घडो मरणही, कीं तेज गेलें निकें, ॥
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा? ॥
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तकशुभग्रासींच ज्याला स्पृहा. ॥ १३ ॥

सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेच ना, ॥
घडो मरण, नावडे खलजनांप्रति प्रार्थना, ॥
विपत्तिसमयींहि जो प्रकटवीच ना दीनता, ॥
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता? ॥ १४ ॥

ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं, ॥
कीं जेंहीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं, ॥
लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी वानिती, ॥
चित्तीं तोषहि पावती, सुजन ते नेणों किती नांदती? ॥ १५ ॥

महीपृष्ठीं केव्हां, अवचट पलंगीं पहुडतो, ॥
क्षुधेतें शाकान्नें, अवचट सदन्नें निवटितो, ॥
कधीं कंथाधारी, अवचट सुवस्त्रीं मिरवितो, ॥
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो. ॥ १६ ॥

दुर्मंत्रें नृप, संगतिस्तव यती, कीं पुत्रही लालनें, ॥
वेदानध्ययनें द्विजाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें ॥
नासे शील, न पाहतां कृषि, मदें मा, लाज मद्यें फुका, ॥
शाठ्यें मित्रपण, प्रवासगमनें स्नेह, प्रमोदें रुका. ॥ १७ ॥

लज्जेनें जड, दांभिक व्रतिपणें, कापट्य शौचें गणी, ॥
शौर्यें निर्दय, आर्जवें लडवड्या, कीं दीन सद्भाषणीं, ॥
मानेच्छा तरि मूर्ख, कीं बडबड्या वक्ता, निकामी भला, ॥
ऐसा तो गुण कोणता खलजनीं नाहींच जो निंदिला! ॥ १८ ॥

राहो जाति रसातलीं, सुगुण हे राहोत कीं खालते, ॥

शैलाग्राहुनि शील सत्वर पडो, सौजन्य अग्नींत तें, ॥
शूरत्वावरि आदळो अशनि का, हें सर्वही नावडे, ॥
अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हे बापुडे. ॥ १९ ॥
पेटीमाजि निरोधला न सुटका ज्याला, भुकेला फणी, ॥
तों केलें बिल मूषकें अवचितां तो आंत गेला क्षणी ! ॥
त्यातें भक्षुनि सर्प तत्कृतपथें निश्चिंत गेला पहा ! ॥
ऐसें कर्म अतर्क्य, यास्तव तुम्ही कीं स्वस्थचित्तें रहा. ॥ २० ॥

आस्फालितांहि स्वकरें न राहे ॥
चेंडू, जसा तो उसळेचि पाहें; ॥
विपत्तियोगें पडले जरी कां, ॥
तें स्थैर्य नोहे तरि साधुलोकां. ॥ २१ ॥

चेंडू पडे आणि उठे तसाची, ॥
दृष्टांत हा सत्पुरुषांस साची; ॥
मृत्पिंड जो त्या उठणेंच नाहीं, ॥
दृष्टांत हा केवळ दुर्जनां ही ! २२ ॥

जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच, ॥
जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच, ॥
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी तो, ॥
हा लाभ पूर्वसुकृताविण केंवि होतो? ॥ २३ ॥

संपत्कालीं कोंवळें सज्जनाचें ॥
होतें चित्त ज्ञाति पंकेरुहाचें, ॥
आपत्कालीं शैलही आदळो कां, ॥
धाकेना जें, गाजवी धैर्यडंका. ॥ २४ ॥

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा, ॥
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा; ॥

ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं, ॥
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं? ॥ २५ ॥

क्षीरानें दिधले स्वकीय गुणही नीरास आत्माश्रयें, ॥
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें! ॥
झाला ताप विशिष्ट, अग्निवदनीं तें दुग्ध जेव्हां पडे, ॥
तेव्हां धांवुनि तोय शीतल करी, मित्रत्व हें चोखडें! ॥ २६ ॥

मलिन रुधिरमांसावेगळें हाड दैवें ॥
अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे; ॥
क्षुधितहि गजहंता जंबुकातें न मारी, ॥
अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी. ॥ २७ ॥

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे, ॥
वर्णी बरेच गुण झांकुनियां कुकर्मे, ॥
दे आपणास असतां, व्यसनीं त्यजीना, ॥
सन्मित्रलक्षण असें वदताति जाणा. ॥ २८ ॥

तृणें मृगाला, सलिलें झषाला, ॥
संतोष हे वृत्ति महाजनाला, ॥
तयांस निष्कारण तीन वैरी, ॥
किरात कैवर्तक दुष्ट भारी. ॥ २९ ॥

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहांतरा, ॥
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी, ॥
तें स्वातिस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें, ॥
जाणा उत्तममध्यमाधम दशा संसर्गयोगें टिके. ॥ ३० ॥

पुष्पापरी दोंपरिचीच साची ॥
हे वृत्ति संभावित जे तयांची; ॥

लोकांचिये एक शिरीं सजावें, ॥
वनींच कीं एक सुकोनि जावें. ॥ ३१ ॥

मौनें मूक दिसे, वदे तरि महावाद्या, स्वपार्श्वी फिरे ॥
तेव्हां धीट, तसा विवेकच नसे जैं चालतां अंतरें, ॥
क्षांतीनें तरि भ्याड, शांति न धरी तैं गांवढा, यापरी ॥
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं! ॥ ३२ ॥

नम्रपणेंच महोन्नत, जे गुण वर्णुनियां परकीय जनाचे ॥
सांगितल्याविण दाविति कौशल सर्वजनांप्रति जें स्वगुणांचें, ॥
स्वार्थ परार्थहि साधिति, जिंकिति शांतिबळें मुखरत्व खलांचें ॥
संत महाद्भुतभाजन यापरि सेवन कोण करी न तयांचें? ॥ ३३ ॥

तैं कां दुर्गुण, लोभ जैं? पिशुनता जैं, कां महापातकें? ॥
काशाला तप, सत्य जैं? मन मुरे जैं, कां सुतीर्थादिकें? ॥
काशाला जन, जैं भलेपण असे? कां भूषणें, कीर्ति जैं? ॥
सद्विद्या जरि, कां धनें? मरण कां, दुष्कीर्ति लोकींच जैं? ॥ ३४ ॥

खल्वाट चंडकिरणें अतितप्त झाला, ॥
छायार्थ तालतरुमूलसमीप गेला; ॥
तत्काल थोर पडलें फळ, तो निमाला! ॥
ये जेथ दैवहत, येइल तेथ घाला. ॥ ३५ ॥

भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें, ॥
ज्ञानाला शम, त्या शमास विनय, द्रव्यास दातृत्व तें, ॥
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता, ॥
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्वता. ॥ ३६ ॥

हे तों सत्पुरुष स्वकार्य त्यजिती, अन्यार्थही साधिती, ॥
हे तों मध्यम जे निजार्थ करुनी अन्यार्थ संपादिती, ॥

हे तों राक्षस जे स्वकार्यविषयीं अन्यार्थ विध्वंसिती, ॥
जे कां व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण कीं दुर्मती? ॥ ३७ ॥

खरें वचन बोलवी, जडपणास कीं मालवी, ॥
महोन्नतिस डोलवी, दुरित मारुनी चालवी, ॥
मनीं सुख अमोल वी, यश जगत्रयीं कालवी, ॥
अनेक गुण पालवी, सुजनसंग तो भूलवी. ॥ ३८ ॥

वांछा सज्जनसंगमीं, गुरुकुलीं वंदारुता, नम्रता, ॥
निंदेचें भय, तुष्टता परगुणीं, स्वस्त्रीसुखीं लुब्धता, ॥
विद्याभ्यास, महेशभक्ति, खलसंसर्गीं अनासक्तता, ॥
चित्ताचा जय, या गुणांस निधि जे, त्यां वंदिजे तत्वता ॥ ३९ ॥

तृष्णेतें निवटीं, क्षमेस जवटीं, गर्वादिकांतें पिटीं, ॥
सत्यातें उमटीं हृदंबुजपुटीं, सेवीं दया गोमटी, ॥
विद्वत्स्नेहतुटी नको करुं, भले त्यांच्या गुणांतें लुटीं, ॥
वंशीं कीर्तिवटी उभारिं, अरिषड्वर्गासि तूं आपटीं. ॥ ४० ॥

श्रीखंडाच्याच काष्ठेंकरुनि शिजवितो पेंड वैडूर्यपात्रीं, ॥
किंवा तो अर्कमूलास्तव कनकहलें नांगरीतो धरित्री, ॥
केळी तोडूनि टाकी त्वरित चहुंकडे पेरितो कोद्रवातें, ॥
जो या येऊनि लोकीं सुकृत न करितां आचरे दुष्कृतातें. ॥ ४१ ॥

वनीं, रणीं, शत्रुजलाग्निसंकटीं, ॥
महार्णवीं पर्वतवासदुर्घटीं, ॥
निजो, बसो, आणि फिरो अरण्यें, ॥
त्या त्या स्थलीं रक्षिति पूर्वपुण्यें. ॥ ४२ ॥

अब्धीमाजि बुडो, प्रयत्न करुनी हेमाद्रिशृंगीं चढो, ॥
शत्रूतें रगडो रणीं, क्रयकृषिव्यापारकर्मीं भिडो, ॥

विद्या सर्व पढो कडोविकडिच्या, व्योमास लंघो, उडो, ॥
जें होणार चुकेचि ना विधिवळें कोणी रडो ना रडो. ॥ ४३ ॥

आलस्य जें कार्यविघातकारी. ॥
असूं नये तो रिपु या शरीरीं. ॥
उद्योग सद्बंधु तया न टाकीं, ॥
त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं ॥ ४४ ॥

वनचरांसह शैलवनांतरें ॥
निजसुखें फिरणें, तरि तें बरें; ॥
जरि घडे सहवासचि पामरीं, ॥
तरि जळो असणें सुरमंदिरीं. ॥ ४५ ॥

द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश, ॥
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश; ॥
जो घे न भोग, जरि पात्रकरीं न दे ही, ॥
त्याच्या धनास मग केवल नाश पाहीं. ॥ ४६ ॥

असे जयाला धन तोचि पंडित, ॥
कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत, ॥
तो मान्य, तो सुंदर, तो विचक्षण; ॥
धनाश्रयें राहति सर्वही गुण. ॥ ४७ ॥

अमूल्य रत्नीं सुर ते न धाले, ॥
हालाहला देखुनियां न भ्याले, ॥
सुधेविणें, यास्तव जे समर्थ, ॥
न निश्चितार्थाविण ते कृतार्थ. ॥ ४८ ॥

श्रुतेंचि कीं श्रोत्र न कुंडलानें, ॥
दानेंचि कीं पाणि न कंकणानें; ॥

साजे तसा देहहि हा न आनें, ॥
परोपकारेंचि न चंदनानें. ॥ ४९ ॥
जयांचें असे पुण्य कीं सावकाश, ॥
विशेषें जनीं शोभती ते कवीश; ॥
जयांचा यशोदेह आकल्प राहे, ॥
जरामृत्युवार्ता जयाला न साहे. ॥ ५० ॥
ब्रम्ह्यानें लिहिलें ललाटफलकीं जें द्रव्य ज्याला असे, ॥
तें लाधे मरुमंडलीं, अधिकता मेरूस गेल्या नसे. ॥
सेवीं धैर्य, धनांध त्यांप्रति वृथा दावूं नको दीनता; ॥
कूपीं कीं जळधींत कुंभ जल घे, जें मापिलें तत्वता. ॥ ५१ ॥
तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना ॥
दावी धन्यास जठरार्थ, कसें पहाना? ॥
दे आळवूनि जरि हस्तिप 'बापभाई!' ॥
घे तोचि घांस गजराज, कशी बढाई? ॥ ५२ ॥
प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा, ॥
नृपा! तूं करीं फार सांभाळ याचा; ॥
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें ॥
अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें. ॥ ५३ ॥
केव्हां सत्य वदे, वदे अनृत ही, केव्हां वदे गोड ही, ॥
केव्हां अप्रिय ही, दयालु हि असे, केव्हां करी घात ही, ॥
जोडी अर्थहि जे यथेष्ट समयीं, कीं वेच ही आदरी, ॥
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी. ॥ ५४ ॥
आरंभीं जे फार, शेखी न कांहीं; ॥
आधीं थोडी; जे क्रमें फार पाहीं; ॥
छाया पूर्वार्धापरार्धा दिनाची, ॥
तैशी मैत्री दुर्जनाची, भल्याची. ॥ ५५ ॥

दे दान गुप्त; उपकार करी, न बोले; ॥
मानी प्रमोद जरि मान्य घरास आले; ॥
दावी न गर्व विभवें; गुण घे पराचे, ॥
खड्गाग्रतुल्यविषमव्रत हें भल्याचें. ॥ ९६ ॥
कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें, ॥
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें; ॥
जाणोनि हें, सुजन, ज्या दुबळीक आली, ॥
त्यांशीं कदा न करिती सहसा टवाळी. ॥ ९७ ॥
आली जरी कष्टदशा अपार, ॥
न टाकिती धैर्य तथापि थोर; ॥
केला जरी पोत बळेंचि खालें, ॥
ज्वाला तरी ते वरती उफाळे. ॥ ९८ ॥
दारिद्य ज्यांजवळि अप्रिय बोलण्याचें, ॥
भांडार ज्यांजवळि वाग्रसमाधुरीचें; ॥
स्वस्त्रीपरायण, अनिंदक जेच तेहीं, ॥
भूभाग हे विलसती अतिरम्य पाहीं. ॥ ९९ ॥
बरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें, ॥
महासर्पाच्या कीं वदनिं तरिही हात धरणें, ॥
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें, ॥
जळो तें तें लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें. ॥ ६० ॥
त्याला वन्हि जलापरी, जलधि हा कीं ओहळाचे परी; ॥
मेरु स्वल्प शिळेपरी, मृगपती तो ही कुरंगापरी; ॥
कीं तो सर्प फुलापरी, विषजळें पीयूषवृष्टीपरी; ॥
होतें सर्वहि यापरी, वसतसे सच्छील ज्याचे शिरीं. ॥ ६१ ।

**वामनपंडित.**

---

## कालक्षेप.

नरतनू अति दुर्लभ यास्तव, ॥
हरिहरां, त्यज सर्व भया, स्तव. ॥
उकलली न बसेल पुन्हां घडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १ ॥
जंव तुला जडली न जरा महा, ॥
तंव नरा! भजरे भज राम हा; ॥
न कळतां यम घालिल रे उडी! ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ २ ॥
बघुनि साधु भवांबु तरे कसा, ॥
शरण जाउनि त्या उतरें कसा; ॥
भवनदींतुनि दाविल तो थडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ३ ॥
भरंवसा न धरीं घडिचा पहा, ॥
कठिण मृत्यु गळ्यावरि चाप हा; ॥
म्हणुनि शीघ्र उठें करिं तांतडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ४ ॥
हित तुझें समजे न कसें तुला? ॥
शरण जाइं भवार्णवसेतुला; ॥
सतत सत्कविवाक्सुमनें खुडीं, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ५ ॥
निशिदिनीं बहु भूतदया वरीं, ॥
सुकृतधी ठसवीं हृदयावरीं; ॥
हरिकथामृत पाहुनि दे बुडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ६ ॥

भवनदींत महा कलि भोंवरा, ॥
मजशिं उद्धरिं देइं विभो! वरा; ॥
विनविं हेंचि करीं हरि सांगडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ७ ॥
करिं सदा उपकार जनांवर, ॥
न करि तो मतिमंद जनावर; ॥
तुजसवें नच येइल ही कुडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ८ ॥
पथिक दीनजना करिं सोय रे, ॥
तरि तुझे जनविश्वही सोयरे; ॥
सुगति कीर्ति तुला मग रोकडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ९ ॥
झटुनि निस्पृह उद्यम कीं करीं, ॥
मग रमा सहजीं तव किंकरी; ॥
निजयशें जगतीं चढवीं गुढी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १० ॥
नरतती रतती विषयांवरी, ॥
अचल वृत्ति धरीं मन आवरीं; ॥
चढवुनी शुकवृत्ति वरी कडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ ११ ॥
धरिं मनीं सम कांचन ढेंकळा, ॥
तरिच साधुपणास चढे कळा; ॥
न टिकती दुरितें मग बापुडीं, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १२ ॥
गुरुजनासि विरुद्ध नको करूं, ॥

स्मर खुळें अटकेंतिल कोंकरूं; ॥
सबळ त्वत्समजाहुनि ही रुढी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १३ ॥
फिरुनि काल सरे किति हे मही, ॥
नच मिळे क्षण देउनि हेमही; ॥
यम तुला वर दाविल चोपडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १४ ॥
पडुनि बिंदु सरोवर सांचतें, ॥
जग म्हणे दिसतें किती साच तें; ॥
जुळुनि सांखळ होत कडी कडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १५ ॥
वश करीं भजनें निगमागमा, ॥
बहु सुखें करिं साधुसमागमा, ॥
हरिपदा हरिनामचि ही शिडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १६ ॥
तुज भुके पुरतीलच नाचणे, ॥
फुकट कां जगतीं मग नाचणें; ॥
पुरुनि राहिल देहहि झोंपडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १७ ॥
अजि कपाळ दुखे अजि ताप हा, ॥
समय एक घडी न रिता पहा; ॥
कितिक सांगसि पोकळ ह्या नडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १८ ॥
तुज मनस्सरिता जरि नावरे, ॥
तरि करीं हरिभक्तिच नाव रे; ॥

न ढळतां नच होइल वांकडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ १९ ॥
प्रथम तूं मन निर्मळ राख रे, ॥
मग असो तनुला जरि राख रे; ॥
हरि बघे नच सुंदर कातडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ २० ॥
परधना लुटुनी नर कातरे, ॥
खचित जाइल तो नरकांत रे; ॥
नजर ठेवुं नको कधि वांकडी, ॥
फुकट तूं दवडीं न कधीं घडी. ॥ २१ ॥

आठल्ये.

---

## आर्याकेकावली.

श्रीरामा! तूं स्वामी असशिल माझ्या शिरावरी जागा. ॥
आम्हांसि तुझ्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजी जागा. ॥ १ ॥
बहु जन्म विसरलों तुज, परि तूं आम्हांसि विसरला नससी. ॥
अंतर्बाह्य कृपाळा! सर्वां जीवांसि वेष्टुनी अससी. ॥ २ ॥
कल्पद्रुम तूं रामा! ज्यास जशी भावना, तसा फळसी. ॥
भोगिति दुःखें जीव स्वगुणें, तूं निर्दयत्व नातळसी. ॥ ३ ॥
'सत्संगतितेंचि धरा, सच्छास्त्रश्रवण आदरेंचि करा.' ॥
म्हणसी 'मग मी बुडतां देइन भवसागरीं तुम्हांसि करा.' ॥ ४ ॥
सत्योपदेशवाक्यें ऐशीं तुझीं ऐकिलीं, परंतु मन ॥
आटोपेना रामा! म्हणुनि तुला करितसें सदा नमन. ॥ ५ ॥
आतां प्रभो! दयाळा! मज दीनावरि करूनियां करुणा, ॥
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो; उगवु दे कृपाअरुणा. ॥ ६ ॥

म्हणउनि नाम तुझें या मुखांत राहो सदाहि मधुरतम. ॥
रत मन जेथें मुनिंचें, ज्यांचें गेलें समस्त दूर तम. ॥ ७ ॥
सेवक तुझा म्हणवितों श्रीरामा! राघवा! सख्या! म्हणतों ॥
होसी उदास तरि हो, होत नसें मी उदास आपण तों. ॥ ८ ॥
'संसारसागरीं तूं तारक' ऐसेंचि संत वदतात. ॥
वदती तदीय नामें, देतो दासास तो स्वपद तात. ॥ ९ ॥
केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि, तरि नसे थारा. ॥
आपुलिया थोरपणावरि ठेवुनि दृष्टि, दीन हा तारा. ॥ १० ॥
संकट वारुनि रामा! निजगुणकीर्तन करावया योजीं. ॥
आपुलिया थोरपणें रामा! मजला स्वकिंकरीं मोजीं. ॥ ११ ॥
सीतापते! रघुपते! विश्वपते! भूपते! वदान्यपते! ॥
इंद्रादिकीर्ति, तुझिया कीर्तिपुढें, तुच्छ, सर्वदा लपते. ॥ १२ ॥
रामा! धांव, रघुपते! धांव, विभो! धांव, राघवा! धांव; ॥
कौतुक काय पहासी? आळवितां यापरी तुझें नांव. ॥ १३ ॥
नांव तुझें नावचि या संसारांभोधिला तरायासी. ॥
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी? ॥ १४ ॥
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी? ॥
बा! जीवदान दे गा! प्रभो! उपेक्षा करूं नको माजी. ॥ १५ ॥
कलिमाजि क्षुद्र नृप प्रजेसि देती धनार्थ बहु ताप. ॥
पापप्रसक्त लोभी न पहाती धर्म, माय, कीं बाप. ॥ १६ ॥
खळ जे हे सत्पीडक, यांची तुज काय राघवा! भीड? ॥
त्वद्दास तव समक्षचि गांजिति, येणें कशी नये चीड? ॥ १७ ॥
सिंहासमक्ष त्याच्या बाळाला जाचितील जरि कोल्हे, ॥
तरि मग अशास पंचानन मृगपति कोण जाणता बोले? ॥ १८ ॥
अपराधी सेवक तरि, दंडावा स्वामिनेंचि हें युक्त. ॥

उक्त श्रवण करुनियां, करिं मजला संकटांतुनी मुक्त. ॥ १९ ॥
हा काम रामराया! पुरवावा, कल्पवृक्ष तूं साचा ॥
ज्ञाता, सर्वगत, प्रभु, आत्मा, प्रिय निर्निमित्त दासाचा. ॥ २० ॥
मन हेंचि फार इच्छी, कीं आतां सेवणें तुझे पाय, ॥
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय? ॥ २१ ॥
आळचि घेउनि मी शिशु आळवितों, निष्ठुर त्वदुर; बाळीं ॥
आळ निवारुनि मातें आळस टाकूनि, धांव कुरवाळीं. ॥ २२ ॥
पाळक तूं विश्वाचा, बाळकसा तोंड पसरितों बा! मी. ॥
व्याळकराळकठिणतर काळ कसा वारिसी न हा? स्वामी! ॥ २३ ।
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं; ॥
जनपीडाहर्ता तूं, श्रीरामा! मुख्य विश्वकर्ता तूं. ॥ २४ ॥
स्तुति करुनि तुझी तुजला आम्हीं अज्ञान काय बा! रिझवूं? ॥
गाउनि अमृतगुणांतें हृदयींचे ताप आपले विझवूं. ॥ २५ ॥
'शाहणपणें न रिझसी, मूर्खपणें न खिजसी' भले म्हणती, ॥
प्रेमळ भलताहि असो, करिसी त्याची स्वसेवकीं गणती. ॥ २६ ॥
चित्त अनावर रामा! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते. ॥
मधुलिप्तक्षुरधारा चाटी, ते जीभ तत्क्षणीं चिरते. ॥ २७ ॥
तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही अनर्थ मज घडला. ॥
सावध तरी निसरड्या मार्गीं, विचकूनि दांत मुख, पडला. ॥ २८ ॥
आधार तूं जनाचा; बाधा हरणार एक तूं दक्ष; ॥
साधावया यशातें बा! धांव; तुला नमस्कृती लक्ष. ॥ २९ ॥
जलदनिभा! बलसिंधो! खलमथना! सूर्यकुलमणे! कृपण ॥
मी विकळ जाहलों बहु; काय तुझें लोपलें दयाळुपण? ॥ ३० ॥
मन हें घातक, वेडें, विषयव्याळासवें करी क्रीडा. ॥
पीडाहि पावतें, परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा. ॥ ३१ ॥

या कोडग्या मनाला विषयांची काय वाटती गोडी? ॥
खोडी तुझ्या प्रतापावांचुनियां राघवा! न हें सोडी. ॥ ३२ ॥
दे अभयदान देवा! सेवारत मी तुझा विभो! भाट. ॥
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट. ॥ ३३ ॥
आहे प्रसाद मजवरि, म्हणुनचि वदनासि येतसे नाम. ॥
हें जरि मुखा न येतें. होता कैंचा मनासि विश्राम? ॥ ३४ ॥
गंगेला जाउनियां गांवखरीचा मिळे जंई ओढा, ॥
तइं ते न म्हणे 'मार्गे, हा कश्मळ शिवतसे, धरा, ओढा.' ॥ ३५॥
तूं करुणाघन रामा! भक्तमयूरासि तूंचि सुख देसी. ॥
संनिध असोनि बापा न करीं या किंकरासि परदेशी. ॥ ३६ ॥
बहु गोड गुण तुझे; ते ऐकावे आदरें, स्वयें गावे; ॥
या वेगळे मनोरथ नसती; ते तूज काय सांगावे! ॥ ३७ ॥
माते! सीते बाई! प्रार्थावें नृपतिला तुवां आंगें, ॥
सुख दुःख तुला ठावें; मजविषयीं उचित तें स्वयें सांगे. ॥ ३८ ॥
संतांसि तरि प्रेरा; जडतारक ते तुम्हांहुनी न उणें. ॥
भूतीं बहु सदयहृदय पाघविती सहज अखिल आत्मखुणें. ॥ ३९ ॥
कालिमाजि पुंडलीकक्षेत्रीं सितपक्षकार्तिकाषाढी ॥
संत अमृतरस पाजुनि म्हणती, 'घे, हे प्रपा, रहा, वाढी.' ॥ ४० ॥
वैकुंठाचें हें विठ्ठलपदमंडित पुंडलीकसुक्षेत्र. ॥
तेथें हरिगुणकीर्तन, येथेंही साधु साश्रु जननेत्र. ॥ ४१ ॥
तूं तो येथेंचि उभा; अंतीं आम्हांसि ठेविसी कोठें? ॥
तरि आपुल्या सख्याला पोटीं म्हणतों न बोलतां ओठें. ॥ ४२ ॥
'भक्त प्रेमाचा मी परम भुकेलों असें' असें कळवी ॥
कटिवरि कर ठेवुनियां उभा; खरा तर्क हा न दुर्बळ वी. ॥ ४३ ॥

विषय पहातां सादर, तरि जातों म्हणुनियां उभा, रुसतो. ॥
हितबोधग्रहणास्तव करुणाब्धि क्षोभला भला दिसतो. ॥ ४४ ॥
'मी साक्षी, या सर्वी अखंडदंडायमान, लिप्त नसें. ॥
शरणागतास भेटें उभाउभीं; कळवितों स्वतत्व असें.' ॥ ४५ ॥
तूं सोय जाणसी बहु, दीनाचा सोयरा खरा, सुभगा! ॥
राखिसि लाज जनाची; हें संसारांत जोडिलें शुभ, गा! ॥ ४६ ॥
श्रीरामचंद्र! राघव! रघुवीर! असेंचि आळविन तुजला. ॥
संकट वारुनि, घडवीं माझ्या हातून या महा ऋतुला. ॥ ४७ ॥
त्वद्गुणकीर्तन करितां, स्तंभादिक अष्ट भाव उपजावे; ॥
जावे अनात्मधर्म; क्रोधादि मनोविकार वरजावे. ॥ ४८ ॥
श्रीरामा! जय रामा! जय जय रामा! विभो! घनश्यामा! ॥
सज्जनमनोभिरामा! दुष्टविरामा! परात्पराधामा! ॥ ४९ ॥
भक्तमयूर दयाघन तूं रामा! भवदवार्तविश्रामा! ॥
साष्टांग नमन तुजला, भुजलालितनिजजना! गुणग्रामा! ॥ ५० ॥

मोरोपंत.

REFBK-0000916